# मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथांचा तौलनिक अभ्यास

**(Meghna Pethe va Monika Gajendra Gadkar yanchya Kathancha Taulanik Abhyas)**

**एम.ए. (मराठी) पदवीसाठी सादर केलेली संशोधन प्रबंधिका**

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**

**मराठी अध्ययनशाखा**

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

**गोवा विद्यापीठ**


अभ्यासक

**सलोनी गंगाराम महाले**

हजेरी क्र. 22P0190025

ABC ID 919850312145

पी. आर 201902204

मार्गदर्शक

**विनायक बापट**

(सहायक प्राध्यापक)

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

मराठी अध्ययनशाखा


गोवा विद्यापीठ

**शैक्षणिक वर्ष 2023 – 2024**

# MEGHNA PETHE VA MONIKA GAJENDRA GADKAR YANCHYA KATHANCHA TAULANIK ABHYAS

**Submitted in partial fulfilment of Masters Degree**

**MA in Marathi**

## MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION

**Marathi Discipline**

Shenoi Goembab School of Language & Literature

**Goa University**

by


## Saloni Gangaram Mahale

Seat No: 22P0190025

ABC ID: 919850312145

PRN: 201902204


Under the supervision of


**Vinayak Bapat**

(Assistant Professor)

**Marathi Discipline**

Shenoi Goembab School of Language & Literature


**Goa University**

**2023 – 2024**

**DECLARATION BY STUDENT**

I hereby declare that the data presented in this Dissertation report entitled, "**मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथांचा तौलनिक अभ्यास**" is based on the results of investigations carried out by me in the Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University under the Supervision of Vinayak Bapat and the same has not been submitted elsewhere for the award of a degree or diploma by me. Further, I understand that Goa University or its authorities will be not be responsible for the correctness of observations/experimental or other findings given the dissertation.

I hereby authorize the University authorities to upload this dissertation on the dissertation repository or anywhere else as the UGC regulations demand and make it available to any one as needed.

Saloni G. Mahale

Signature and Name of Student

Seat no:22P0190025

Date: 16/04/2024

Place: Goa University

**COMPLETION CERTIFICATE**

This is to certify that the dissertation report "मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथांचा तौलनिक अभ्यास" is a bonafide work carried out by Ms Saloni Gangaram Mahale under my supervision in partial fulfilment of the requirements for the award of the degree of Master of Arts in the Discipline Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University.

16/4/24

Vinayak L. Bapat

Signature and Name of Supervising Teacher

Date: 16/04/2024

GOA UNIVERSITY SHENOI GOEMBAS SCHOOL OF LANGUAGES & LITERATURE TALEIGAON PLATEAU

Signature of Dean of the School

School stamp

Date: 25/04/2024

Place: Goa University

# मनोगत

मी तौलनिक साहित्य म्हणजे काय हे बी ए पर्यंत कधीच ऐकले नव्हते, विद्यापीठात आल्यानंतर ज्यावेळी आम्हाला प्रबंधिकेचे विषय निवडायला सांगितले त्यावेळी एक दिवस डॉ. सुनिता उम्म्रस्कर मॅडमनी वर्गात येऊन आम्हाला तौलनिक साहित्याभ्यास विषयी ओळख करून दिली. मी अगोदर सानिया या लेखिकेच्या कथांचा अभ्यास करायचा ठरविला होता. परंतु तिच्या साहित्यावर आगोदर अभ्यास झालेला होता. म्हणुन मी तो विषय निवडला नाही. शेवटी मला प्रा. पूर्वा वस्त मेडमनी आधुनिक काळातील स्त्री लिखित कथांचा तौलनिक अभ्यास असा विषय सुचविला.

प्रस्तुत प्रकरणात "मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथांचा तौलनिक अभ्यास" हा विषय अभ्यासासाठी घेतला आहे. स्त्रीवादी दृष्टिकोनातून समकालिन कालखंडातील स्त्रीया आपल्या कथांतून कशा प्रकारे स्त्रीवाद मांडतात याचा तौलनिक अभ्यास विविध घटकांच्या आधारे करण्यात आलेला आहे. या अभ्यासाला प्रारंभ करण्यापासून आजपर्यंत अनेक जणांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले आहे. या सर्वांची मी कृतज्ञ आहे.

मी "मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथांचा तौलनिक अभ्यास" असा विषय निवडण्याचे ठरविले. या विषया संदर्भात आपल्या मराठी विभागातील प्राध्यापिका पूर्वा वस्त मेडमनी या विषया संदर्भात सविस्तर ओळख करून दिली त्यामूळे या विषया संदर्भात माझ्या मनात उत्सुकता निर्माण झाली व शेवटी हाच विषय निवडण्याचे मी ठरविले. त्यामुळे मी एकूणच पूर्वा वस्त मॅडमचे आभार आहे. प्रा. विनायक बापट मला या संशोधनात मार्गदर्शक म्हणून लाभले. त्यांनी मला संशोधन पूर्ण करण्याकरिता मदत केल्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

तौलनिक साहित्याच्या सैद्धांतिक भागा विषयीची सविस्तर ओळख करून दिल्याबद्दल मी मराठी विभागातील प्रा. चिन्मय गैसास यांची आभारी आहे. त्याचप्रमणें मी डॉ. हेमंत अय्या व प्रा. जयेश गावकर सरांनी मला माझ्या संशोधनात मदत केल्या बद्दल मी त्यांची आभारी आहे. प्रा. विनायक बापट मला या संशोधनात मार्गदर्शक म्हणून लाभले. त्यांनी मला संशोधन पूर्ण करण्याकरिता मदत केल्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. त्याचप्रमाने मी माझ्या कुटुंबाचे व माझ्या मित्र मैत्रिणीचे आभारी आहे.

# मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथांचा तौलनिक अभ्यास

## अनुक्रमणिका


| अनु. क्र | विषय | पृष्ठ संख्या |
| --- | --- | --- |
| Declaration | | |
| Completion certificate | | |
| मनोगत | | |
| प्रस्तावना | | 1-5 |
| १ | तौलनिक साहित्य अभ्यास संकल्पना व स्वरूप | 6-24 |
| २ | मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथांचा अश्विनिष्ठ तौलनिक अभ्यास | 25-48 |
| ३ | मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या लेखनातून दिसून येणारा स्त्रीवाद व स्त्री जाणिवांचा तौलनिक अभ्यास | 49-60 |
| ४ | मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेचे तौलनिक दृष्टीने भाषिक वैशिष्ट्यांमधील साम्यभेद. | 61-74 |
| ५ | निष्कर्ष समारोप | 75-82 |
| परिशिष्ट | | 83-87 |
| संदर्भ सूची | | 88-89 |

# प्रस्तावना

गोमंतकीय मराठी कथेची लिखित परंपरा कृष्णदास शामा यांच्या “श्रीकृष्णचरित्रकथा” १५२६ या ग्रंथापासून मानली जाते. १९६० नंतर भारतीय स्त्रीवादी साहित्याचा उगम झाला. त्यात महत्त्वाच्या ठरल्या त्या ‘स्त्रीवादीकथा’.१९६० या स्त्रीवाद आणि १९९० नंतरचा ‘स्त्रीवाद’ यात फरक पडलेला दिसून येतो. १९६० च्या कथेत सर्वच पुरुषांना आरोपीच्या पिजऱ्यात उभे केले जाते. नव्वदोत्तरी ‘स्त्रीवादी साहित्य’ स्त्री संवादी आहे असे मला वाटते.१९६० नंतरच्या स्त्रियांच्या कथा लेखनामध्ये प्रिया तेंडुलकर,वसुधा पाटील, सरीता पदकी, मेघना पेठे, सानिया, तारा वनारसे, गिरजा कीर, उर्मिला शिरूर,अरुणा साबणे, मोनिका गजेंद्रगडकर, नीरजा अशा अनेक महत्त्वाच्या स्त्री कथाकार उदयास आल्या.१९६० नंतर च्या काळात मेघना पेठेच्या लेखनाला महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. मेघना पेठे यांच्या कथा स्त्री केंद्रित आहे. भोवतालची  माणसे समजून घेणे, हे त्यांच्या कथालेखनातून दिसून येते. मेघना पेठेच्या कथेतील स्त्री पुरुष पात्रे सुशिक्षित, आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र असलेली दिसून येतात तसेच वैचारिक दृष्ट्याही स्वातंत्र्याला महत्त्व देताना दिसून येतात. मानवी नातेसंबंधाच्या विविध तऱ्हा मेघना पेठे मांडताना दिसतात. एकमेकात मिसळलेले पण तरीही स्वतःचे अस्तित्व जाणवून देणारे, कथासंग्रहातील प्रत्येक कथेत नाते दर्शवतात. मोनिका गजेंद्र गडकर यांनी १९९० च्या दरम्यान बदलत्या स्त्री जाणीवावर भाष्य केलेले दिसून येते.

वसंत बापट यांनी त्याची साधी-सोपी व्याख्या करताना म्हटले आहे, “तौलनिक सहित्याभ्यास म्हणजे तुलनेच्या साह्याने एकापेक्षा अधिक साहित्याचा अभ्यास”1 या व्याख्येला  जोडून त्यांनी या अभ्यासाची सध्यार्म्य, वैधर्म्य , उदगम आणि प्रभाव ही चार अंगेही सांगितली आहेत. या ठिकाणी बापट यांनी महत्त्वाची गोष्ट नोंदविली आहे. ती म्हणजे, तौलनिक साहित्याभ्यासासाठी एकापेक्षा अधिक साहित्याची उपस्थिती आवश्यक असते. या साहित्यांमधील साम्य, भेद याबरोबरच त्यातील एक साहित्यकृती दुसऱ्या साहित्यकृतीच्या उद्भवासाठी म्हणजेच निर्मितीसाठी कारणीभूत आहे काय, त्यातील एका साहित्यकृतीवर दुसऱ्या साहिय्कृतीचा प्रभाव आहे काय, हे पाहणे या अभ्यासात अपेक्षित असते. तौलनिक साहित्य अभ्यास ही एक स्वतंत्र विद्याशाखा असली तरी मूलत: तिचे साहित्यशास्त्र वेगळे नाही. अर्थातच प्रस्तुत अभ्यासालाही एकाच कालखंडातील दोन स्त्रियांच्या कथांचा तौलनिक अभ्यास केला जाईल.

मेघना पेठे  यांचा जन्म ४ डिसेंबर १९५८ साली मुंबईत झाला. त्यांचे शालेय शिक्षण दादरच्या बालमोहन विद्यामंदिरात आणि महाविद्यालयीन शिक्षण सेंट झेवियर्स महाविद्यालयात झाले.१९७९ साली त्यांनी बीए पदवी संपादन केली. त्या रिझर्व बँक ऑफ इंडियात नोकरी करतात. वाचकाला त्यांची ओळख कथाकार कादंबरीकार म्हणूनच आहे. त्या प्रयोगशील व सकस कविता लेखन करीत.त्यांनी मेघनांच्या कविता नावाचे स्वतःच्या सुंदर हस्ताक्षरात लिहिलेले पुस्तक त्यांनी स्वतः प्रकाशित केले.'हंस अकेला' हा त्यांचा कथासंग्रह १९९७ मध्ये प्रकाशित झाला.त्यांचा हंसा अकेला कथासंग्रह खूप गाजला तो कथाच्या वेगळेपणामुळे 'आंधळयाच्या गाई' ( २०००)हा दुसरा कथासंग्रह वैशिष्ट्यपूर्ण ठरला. त्याची 'नातीचरामि' कादंबरी 2004 साली प्रकाशित झाली. मोनिका गजेंद्रगडकर यांचा जन्म ९ ऑक्टोंबर १९६५ साली पुण्याला झाला. त्यांचे शिक्षणही पुणे येथे झाले. समाजशास्त्र विषयात बीए पदवी घेतली व मराठी विषयात एम ए परीक्षेत त्या प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या.मुक्त पत्रकारितेपासून त्यांनी लेखनाला प्रारंभ केला.'वेचलेले जीवन' ही पहिली कथा (१९९३) च्या 'स्पंदन' दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली त्यानंतर त्यांच्या अनेक कथा व दीर्घकथा मौज, दीपावली, अक्षर,कालनिर्णय आदी दिवाळी अंकातून प्रसिद्ध झाल्यामुळे प्रकाशन तर्फे त्यांचे 'भूप' (२००४) आणि 'आर्त' (२००८) हे दोन कथासंग्रह प्रकाशित झाले.त्याचप्रमाणे 'शिल्प' कथासंग्रह (२०११) 'त्रिपर्ण ' दीर्घ कथासंग्रह (२०२२)'उगम' कादंबरी 'शब्दांचा झुला' ललित लेख संग्रह हे काही साहित्य प्रकार त्यांचे प्रसिद्ध झाले.

**संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा**

संशोधन करिता मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथांचा अभ्यास निवडलेला आहे. या दोन्ही कथाकरांच्या अनेक साहित्यकृती आहे पण फक्त कथेवर संशोधन करणार आहे. त्यांच्या अनेक कथा दिवाळी अंकातून प्रसिद्ध झाल्या त्यांचा विचार या संशोधनात करण्यात येणार नाही परंतु हंस आकेला, आंधळयाच्या गाई, भूप, शिल्प, आर्त, त्रीपर्ण  ह्याच कथा संग्रहाचा अभ्यास करणार आहे.

**संशोधन विषयक समस्या**

१९६० नंतर स्त्रियांच्या कथालेखननामध्ये प्रिया तेंडुलकर, मेघना पेठे, सानिया, गिरजा, उर्मिला शिरूर, मोनिका गजेंद्रगडकर, नीरजा अशा अनेक महत्त्वाच्या स्त्रीकथाकार उदयास आल्या. संशोधन करीता मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर या लेखिकांच्या कथांचा तौलनिक अभ्यास करणार आहे. १९६० नंतरच्या स्त्रीयांच्या लेखनाचा तौलनिक साहित्याभ्यास झालेला नाही आहे. या अभ्यासासाठी लागणारी पुस्तके उपलब्ध नाही आहे.

संशोधन कार्याची उपयुक्तता/आवश्यकता

१९९० नंतरच्या काळातली स्त्री आणि तिच्या जाणिवा समजून घेण्याच्या दृष्टीने हा विषय आवश्यक आहे.आजच्या स्त्री लेखिकाकडून कथा या वाङमय प्रकारांमध्ये होणारे प्रयोग समजून घेण्यासाठी हा विषय महत्त्वाचा आहे.स्त्रीच्या अंतर्मनातील भावना जाणून घेणे. कथाच्या शीर्षकातून प्रतीकात्मकता आहे ती जाणून घेणे,सहजपणे जे काही आपण साहित्यकृतीत वाचत असतात ते या कथेमधून जाणून घेणे.स्त्री जीवनातील वाङ्मयीन व सांस्कृतिक परिवर्तने अधोरेखित होतात.

**संशोधन कार्यामागची उद्दिष्टे**

१. १९९० नंतरच्या साहित्यातील मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांचे स्थान समजून घेणे.
२. मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथा लेखनामध्ये दिसून येणाऱ्या जीवन जाणिवातील साम्यभेद समजून घेणे.
३. मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर या स्त्री लेखिकांच्या लेखनातील स्त्रीवाद व स्त्री जाणिवातील स्वरूप यामधील साम्यभेद जाणून घेणे.
४. मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर यांच्या लेखनाचे वाङमयीन मूल्यमापन करत असताना लेखन शैलीतील साम्यभेद तपासणे.
५. तौलनिक अभ्यास पद्धतीचे स्वरूप समजून घेणे.

**गृहीतकांची मांडणी**

१. मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर या दोन्ही लेखिका बदलत्या समाज वास्तवावर भाष्य करतात पण आशयावर भेद जाणवतो.
२. मेघना पेठे व मोनिकागजेंद्र गडकर यांच्या कथा या महानगरीय स्वरूपाच्या जाणवतात.
३. मेघना पेठेचे लेखन स्त्रीवादी स्वरूपाचे जाणवते व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या लेखनामध्ये स्त्री जाणिवा चित्रित करण्याचा प्रयत्न दिसतो.
४. दोन्ही लेखिका आधुनिक कालखंडातल्या असल्यामुळे दोन्ही लेखिकांच्या कथेमध्ये इंग्रजी व हिंदी शब्दांचा वापर जाणवतो.
५. मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर या दोन्ही लेखिकांच्या कथालेखन शैलीमध्ये भेद जाणवतो.
६. मेघना पेठेच्या कथा या स्त्रीकेंद्रीत ठरतात पण मोनिका गजेंद्र गडकरांच्या स्त्रीकेंद्री ठरत नाही एकूणच मानवी जीवनाला आणि स्वभावातील व्यक्ती मिश्रता समजून घेण्याचा प्रयत्न करतात.

**संशोधन पद्धती**

मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर या दोन्ही स्त्री लेखिका एकाच कालखंडातल्या असल्यामुळे त्यांनी कथा हा साहित्यप्रकार  कसा हाताळलेला आहे हे समजून घेणे. प्रबांधिका लेखन करण्यासाठी वर्णनात्मक व तौलनिक पद्धतीचा वापर संशोधनात होणार आहे.

**१. वर्णनात्मक संशोधन पद्धती**

वर्णनात्मक संशोधन पद्धतीत वर्तमान परिस्थितीतील माहितीचे संकलन करून त्यांचे विश्लेषण केले जाणार. या संशोधन पद्धतीत  मते, अभिवृत्ती, जनसांख्यिकीय  माहिती, वैशिष्ट्ये, गुणधर्म, व्यवहार, साम्य व भेद,स्त्रीच्या अंतर्मनातील जाणीवा, वेदना,भीती, बारीक सारिक तपशील जाणून या विविध लक्षणांचा अभ्यास केला जाईल.

**२. तौलनिक संशोधन पद्धती**

तुलनात्मक संशोधनात विविध घटकांचा तौलनिक दृष्टिकोनातून अभ्यास केला जातो. या संशोधनात एकाच कालखंडातल्या दोन स्त्री लेखिकांच्या कथांचा तौलनिक अभ्यास केला जाईल.

**संशोधनाचा आराखडा**

**प्रकरणांची मांडणी**

**मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर या लेखिकांच्या कथांचा तौलनिक अभ्यास**


| |
|---|
| प्रकरण १. तौलनिक साहित्य अभ्यास संकल्पना व स्वरूप |
| प्रकरण २. मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथांचा अश्विनिष्ठ तौलनिक अभ्यास |
| प्रकरण ३. मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या लेखनातून दिसून येणारा स्त्रीवाद व स्त्री जाणिवांचा तौलनिक अभ्यास |
| प्रकरण ४. मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेचे तौलनिक दृष्टीने भाषिक वैशिष्ट्यांमधील साम्यभेद. |
| प्रकरण ५. निष्कर्ष समारोप |

# प्रकरण १

# तौलनिक साहित्याभ्यास: संकल्पना व स्वरूप

# तौलनिक साहित्याभ्यास:संकल्पना व स्वरूप

## प्रास्ताविक

आधुनिक काळातील एक महत्त्वाची अभ्यास पद्धती म्हणून तौलनिक अभ्यासपद्धतीकडे पाहिले जाते. तौलनिक साहित्याभ्यास हा पारंपरिक अभ्यासापेक्षा वेगळा नाही. तौलनिक साहित्याभ्यासाला इंग्रजी मध्ये Comparative literature studies असे म्हटले जाते. 'तुलना' ही तौलनिक साहित्याभ्यासात आधारभूत आहे. तुलनेच्या आधाराने केलेला साहित्याचा अभ्यास तो 'तौलनिक साहित्याभ्यास' असे म्हटले जाते. मध्ययुगीन युरोपामधील प्रबोधनयुगामध्ये युरोपीय प्राकृत (Native) आणि ग्रीक व रोमन साहित्य यांच्या संदर्भात तुलनात्मक विचार करण्यात सुरुवात झाली. इतिहासातील सामाजिक घडामोडींमध्ये तौलनिक साहित्याभ्यासाचा उगम झालेला आहे. लोकभाषेतील लिखित व मौखिक साहित्याचा आणि ग्रीक आणि रोमन या अभिजात साहित्याचा तौलनिक साहित्याचा अभ्यास सुरू झाला. १८ व्या शतकात जॉन ड्रायडनी आपल्या निबंधात फ्रेंच आणि इंग्लिश नाटकांची तौलनिक चर्चा केली व १९ साव्या शतकात फ्रेंच व जर्मन साहित्याचा 'मादाम स्ताईल' या फ्रेंच विदुषीने तौलनिक विचार केला. अशा प्रकारे तौलनिक साहित्याभ्यासाला युरोपात सुरुवात झाली.

तौलनिक सहित्याभ्यासाला फ्रान्समध्ये फार महत्त्वाचे स्थान आहे. फ्रेंच अभ्यासकांची एक वेगळी पद्धती आहे असे जगातील तौलनिक साहित्याभ्यासकांना मानतात. जर्मनीमधील शिलर आणि श्लेगल या सारख्या विद्वानांमुळे तौलनिक साहित्याभ्यासाला सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले, व त्यांच्यापेक्षाही जास्त जर्मन महाकवी ग्यटेमुळे. ग्यटेची कल्पना ही तौलनिक साहित्याभ्यासाच्या कल्पनेशी जवळच्या नात्याने बांधलेली आहे. 'तौलनिक साहित्य' या संज्ञेचा प्रथम वापर मॅथ्यू अरनल्ड यांनी इ. स.१८४८ मध्ये आपल्या बहिणीला लिहिलेल्या पत्रात त्यांने 'युरोपच्या तुलनेने पाहता इंग्लंड साहित्यक्षेत्रात मागासलेले आहे' असे म्हटले आहे. त्यांच्या पत्रात असलेला 'comparative literature' हा शब्द लक्षणीय आहे. 'एशियाटिक सोसायटी' ची स्थापना इ.स १७८४ मध्ये कलकत्ता येथे विलियम जोन्स यांनी सुरुवात केली. त्या माध्यमातून

संस्कृतीचा अभ्यास व भारतीय भाषा साहित्य अभ्यास सुरू झाला. काही अभ्यासकांद्वारे भारतीय आणि युरोपीय साहित्याचा तौलनिक अभ्यास सुरू झाला. उदा. बक्कीमचंद्र चट्टोपाध्याय

बक्कीमचंद्र चट्टोपाध्याय यांनी 'शाकुंतल, मिरांडा आणि डेस्डीमोना' हा तौलनिक विवेचन करणारा लेख लेखन करून तौलनिक साहित्याभ्यासाला भारतात सुरुवात केली आहे. तौलनिक साहित्याभ्यास हा विषय अनेक विद्यापीठामध्ये अध्ययनासाठी आहे. १८८६ मध्ये comparative literature या प्रसिद्ध झालेल्या ग्रंथात प्रो. प्रॉजनेट या पंडिताने या विद्याशाखेच्या व्याप्तीची आणि कार्यपद्धतीची शास्त्रीय मांडणी प्रथमच केलेली आहे.

## १.१ तौलनिक साहित्याभ्यासाचा इतिहास

तौलनिक साहित्याभ्यासाचा इतिहास स्पष्ट करत असताना त्या मधे तौलनिक साहित्याभ्यासाची युरोपीय पार्श्वभूमी व तौलनिक साहित्याभ्यासाची भारतीय पार्श्वभूमी स्पष्ट करणे आवश्यक आहे. 'तौलनिक साहित्य' या संज्ञेचे स्पष्टीकरण, इतिहास, विकासात्मक वाटचाल, विविध संप्रदाय तसेच भारतीय तौलनिक साहित्यातील प्रवाह यांचा आढावा यात घेण्यार येत आहे.

### १.१.१ तौलनिक साहित्याभ्यासाची युरोपीय पार्श्वभूमी

तौलनिक साहित्याभ्यासाचा वापर प्रथम अठराव्या शतकात जॉन ड्रायडनच्या 'Essay on Dramatic Poessy' या निबंधापासून एक अभ्यासपद्धती, समीक्षापद्धती म्हणून, साहित्याकडे पाहण्याचा एक दृष्टीकोन तयार झाला. फ्रेंच आणि इंग्लिश रंगभूमीच्या अभिजात आणि सौंदर्यवादी नाटकांच्या 'गुणावगुणांची' या निबंधात त्यांनी चर्चा केली आणि या समीक्षापद्धतीची त्यांनी सुरवात केली. म्हणूनच त्यांना या पद्धतीचा जनक असे मानले जाते. या अभ्यासशाखेला विद्यापीठीय क्षेत्रात प्रतिष्ठा मिळवून मॅथ्यू अर्नोल्ड यांनी दिली, काव्याचे प्राध्यापक म्हणून उद्घाटनाचे भाषण करीत असताना मॅथ्यू अर्नोल्ड यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठात तौलनिक साहित्य या विषयाची चिकित्सा केली.

### १.१.२ तौलनिक साहित्याभ्यासाची भारतीय पार्श्वभूमी

भारतीय संदर्भात तौलनिक साहित्याचा विचार करताना 'भारतीय तौलनिक साहित्य' असे नामकरण करण्याऐवजी 'तौलनिक भारतीय साहित्य' असा क्रम बदलण्याचा तुलनाकारांचा प्रयत्न दिसून येतो. १९९३ मध्ये कंपॅरिटीव्ह लिटरेचर असोसिएशन ऑफ इंडियाच्या वतीने दिल्ली विद्यापीठात भरलेल्या आंतरराष्ट्रीय तौलनिक साहित्य परिषदेमध्ये परदेशातून आलेल्या तौलनिक साहित्याच्या अभ्यासकांनी भारतीय तौलनिक साहित्याबाबत फ्रेंच संप्रदाय, अमेरिकन संप्रदाय, जर्मन संप्रदाय आणि रशियन संप्रदाय याचप्रमाणे भारतीय संप्रदाय हा साहित्यात प्रस्थापित केला पाहिजे. तौलनिक भारतीय साहित्यात आशय चित्रांच्या, आकृतीबंधांच्या आणि प्रवृत्तीच्या अंतर्निहित यावर भर दिला जातो.

तौलनिक भारतीय साहित्यात वेगवेगळ्या भाषांमध्ये एकाच राष्ट्रीय साहित्याचा अभ्यास केला जातो तर पाश्चात्त्य साहित्यात वेगवेगळ्या राष्ट्रीय साहित्याचा अभ्यास केला जातो. भारतात तौलनिक साहित्याची सुरुवात कलकत्त्याच्या जाधवपूर विद्यापीठाने केली आहे व दक्षिण भागामध्ये मद्राई कामराज विद्यापीठात केली आहे. विसाव्या शतकात तौलनिक साहित्याचा श्री गणेशा 'कुंभारसंभव' तसेच 'मिरांडा आणि डेस्टीमोना' 'शाकुंतला आणि पॅराडाईज लॉस्ट' हे लेख लिहून बकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी केला आहे.

**१.१.३ तौलनिक साहित्याचे विविध संप्रदाय**

**१.१.३.१ फ्रेंच संप्रदाय**

तौलनिक साहित्याची प्रतिष्ठापना पहिल्यांदाच फ्रान्समध्ये झाली व त्याचे गांभीर्यपूर्वक उपयोजन फ्रान्समध्येच झाले आहे. मादाम द स्ताईल, स्टेंदल अशा तुलनाकारांनी फ्रान्समध्ये तौलनिक साहित्याची पद्धतशीर मांडणी केली आहे. मादाम द स्ताईल, स्टेन्दल गुइयारद, वाईनस्टाईन, कारे ह्या अभ्यासकांना पहिल्या पिढीचे तुलनाकार असे मानले जाते. ते उदारमतवादी आणि आंतरराष्ट्रवादी होते. अठराव्या शतकातील उग्र राष्ट्रवादी अभिजात वाङ्मय परंपरांना ते नकार देत होते. या तुलनाकारांच्या मते "तौलनिक साहित्य ही साहित्येतिहासाची शाखा असून त्याव्दारे आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास केला जातो. तसेच 'जेथे ऐतिहासिक संबंध असतात तेथेच तौलनिक साहित्य असते" असे मानून या पिढीने 'प्रभाव विश्लेषणाला

अंनिश्चित तसेच अस्पष्ट मानंल."[१] एतियम्बल, जेन, पिशवाच, रुसो या अभ्यासकांना दुसऱ्या पिढीचे तुलनाकार असे मानले जाते. फ्रेंच संप्रदायाचा कणा हा 'प्रभाव संकल्पना' असा आहे. तौलनिक साहित्यात 'दोन लेखकांची समांतर तुलना करण्यापेक्षा एका लेखकाचे साहित्य कोणत्या माध्यमातून दुसऱ्या लेखकापर्यंत पोचले याचे ऐतिहासिक पुरावे शोधण्यावर या पिढीने भर दिला.'

### १.१.३.२ जर्मन संप्रदाय

अमेरिकन संप्रदाय आणि फ्रेंच संप्रदाय यांच्यातील दुवा म्हणजे जर्मन संप्रदाय. फ्रेंच आणि जर्मन तुलनाकारांच्या दृष्टिकोनातून बऱ्याच गोष्टींचा साम्य आढळतो. अमेरिकन तुलनाकार हेन्री रेमाकच्या मते, "तौलनिक साहित्य या विद्याशाखेकडे पाहण्याच्या फार अविचल अशा फ्रेंच व अमेरिकन मार्गात, दृष्टिकोणात एक मध्यस्थ आणि कदाचित शांतिदूत बनण्याचे जर्मन तौलनिक विद्याव्यासंगाचे दैव असावे."[२] जी बॉयर, इर्विन कोपेन या तुलनाकारांनी जर्मन संप्रदायाची मांडणी केली आहे. 'स्वागत अभ्यास' आणि 'प्रतिसाद परिणाम' या माध्यमातून वाङ्मयेतिहासाची मांडणी आणि सौंदर्यमीमांसा करण्यावर हा संप्रदाय भर देतो. पुरावे गोळा करून प्रभावाचा मागोवा घेणारा हा फ्रेंच संप्रदाय आहे व संहितेशी एकनिष्ठ राहण्याचा आग्रह धरून अन्य कलांच्या सहाय्याने साहित्य व प्रकाश टाकण्यास उत्तेजन करणारा हा अमेरिकन संप्रदाय आहे व या दोघांचे  मध्यम मार्ग हे जर्मन संप्रदाय आहे.

### १.१.३.३ अमेरिकन संप्रदाय

एरिक ऑरबॉक, लिओ स्पिटझर व अर्नस्ट रॉबर्ट ब्युर्टिस या विद्वानांच्या गटाने अमेरिकेत तौलनिक साहित्याची स्थापना केली व पुढे रेन वेलेक, हॅरी लेविन, डेविड मालोन अशा अमेरिकन तुलनाकारांनी या संप्रदायाची वैचारिक मांडणी केली. फ्रेंच संप्रदाय ऐतिहासिक संबंधांना प्रधान मानतो तर अमेरिकन संप्रदाय अशा संबंधांना साहित्यबाह्य संदर्भाची रेलचेल मानतो. अलीकडचा संप्रदाय असे अमेरिकन संप्रदायाला म्हटले जाते. अनेकतावाद आणि बहुसंस्कृतीवाद हा अमेरिकन जीवनशैलीप्रमाणे स्थानिक साहित्याच्या अमेरिकन संप्रदायाचा पाया आहे. चरित्रात्मक आणि इतिहास या संशोधनाच्या पलीकडे गेले पाहिजे असा

हा संप्रदाय सांगतो. संहिता व लेखकाच्या लेखन प्रक्रिया यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे असे हा संप्रदाय सांगतो. अमेरिकन संप्रदाय हा साहित्याच्या तौलनिक अभ्यासात अन्य कलांचाही सहजपणे समावेश करतो.

### १.१.३.४ पूर्व युरोपातील संप्रदाय

रशियन तौलनिक साहित्याचा श्री गणेशा ए. एन. वेसेलोव्हस्की यांनी एकोणिसाव्या शतकात केला. त्यांनी दिलेली व्याख्याने 'ऐतिहासिक काव्यमीमांसा' या ग्रंथात प्रसिद्ध झाली. त्यांनी मोठ्या साहित्य परंपरेतील लेखकांचा प्रभाव लहान लेखकांवर कसा पडतो याची चिकित्सा केली. त्यानंतर व्ही. एम्. झिर्मुन्स्की, आय. जी. न्युपोका, ए. एन्. वुश्मीन, बी. एल्. सीश्कोन इत्यादी सिद्धांतवादी समीक्षकांनी विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात तौलनिक साहित्याच्या क्षेत्रात कार्य केले. त्यामुळे हा संप्रदाय तयार झाला.

### १.१.३.५ भारतीय संप्रदाय

फ्रेंच संप्रदाय,अमेरिकन संप्रदाय,जर्मन संप्रदाय  याचप्रमाणे 'भारतीय संप्रदाय' तौलनिक साहित्यात प्रस्थापित झाला. तौलनिक भारतीय साहित्यामध्ये आशयसूत्राच्या, आकृतीबंधाच्या आणि प्रवृत्तीच्या अंतर निर्मितीत एकतेवर भर दिला जातो. वेगवेगळया भारतीय भाषांमधील परस्परिक संबंधाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने एक बांधणी तयार करणे हे भारतीय तौलनिक साहित्याचे उद्दिष्ट आहे.अनेक विद्यापीठामध्ये पदवी मिळवण्यासाठी तौलनिक साहित्याभ्यास हा एक स्वतंत्र पेपर अभ्यासक्रमासाठी नेमलेला दिसतो.

## १.२ तौलनिक साहित्याभ्यासातील व्याख्या

मराठीत 'तौलनिक साहित्य' ही संज्ञा इंग्रजीतील 'Comparative Literature' या  संज्ञेसाठी वापरली जाते. प्रारंभी पासून ती गुंतागुंतीची ठरलेली आहे. वेगवेगळया अभ्यासकांनी 'तौलनिक साहित्याभ्यास' या विषयी आपआपल्या व्याख्या केल्या आहे.

- **एम.एफ. ग्युयर्द**

तौलनिक साहित्य म्हणजे “आंतरराष्ट्रीय वाङ्मयीन संबंधाचा इतिहासच होय.”[३]

- **पॉल वॅन टेगहेम**

"तौलनिक साहित्याचा अत्यावश्यक हेतू म्हणजे निरनिराळ्या साहित्यांच्या एकमेकांशी असलेल्या संबंधांचा अभ्यास हाच होय."[४]

- **हेन्री एच. एच. रेमाक**

"तौलनिक साहित्य म्हणजे विशिष्ट देशाच्या बंदिस्त सीमे पलीकडचा अभ्यास होय. त्यात एकीकडे साहित्यामधील परस्परसंबंधांचा, तर दुसऱ्या बाजूला कला (म्हणजेच चित्र, शिल्प, वास्तुरचना, संगीत), तत्त्वज्ञान, इतिहास, सामाजिक शास्त्रे (म्हणजे राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र), विज्ञान, धर्म वगैरे अशा ज्ञान व श्रद्धाक्षेत्रांचा अभ्यास असतो. थोडक्यात, ही एका साहित्याची दुसऱ्या एका किंवा अनेक साहित्यांशी आणि वाङ्मयाची इतर मानवी आविष्कारक्षेत्रांशी केलेली तुलना असते."[५]

- **एस्. एस्. प्रावर**

"एकापेक्षा अधिक भाषांतील साहित्यकृतींची (साहित्यशास्त्र आणि समीक्षा यांवरील ग्रंथांसह) वैधर्म्य, साधर्म्य, मूलस्रोत किंवा प्रभाव यांचा शोध घेत केलेली समीक्षा म्हणजेच तौलनिक साहित्याभ्यास होय; तसेच दोन किंवा अधिक भिन्नभाषिक समाजांमधील वाङ्मयीन संबंध आणि आदानप्रदान यांचाही अभ्यास त्यात अंतर्भूत आहे."[६]

- **वसंत बापट**

तौलनिक साहित्याभ्यासामध्ये एकापेक्षा अधिक साहित्यांचा विचार अपरिहार्य आहे.

"साधर्म्य आणि वैधर्म्य, उद्गम आणि प्रभाव या चार अंगांनी घेतलेला तुलनात्मक शोध"अशी आहे.[७]

- **आनंद पाटील**

"तौलनिक साहित्य म्हणजे अभ्यासकाच्या समकालीन संस्कृतिसापेक्ष स्वत्वाच्या प्रादेशिक आधाररेषा प्रथम पक्क्या आखून, सांस्कृतिक राष्ट्रीयता व भाषांच्या सीमा छेदणारी, वाङ्मय आणि इतर कला, साहित्य आणि शास्त्रे- विज्ञाने, साहित्य आणि नवीजुनी ज्ञानक्षेत्रे तसेच मानवी

अभिव्यक्तीच्या पद्धती यांच्या परस्परव्यामिश्र संबंधांनी अनेक विद्याशास्त्रीय दृष्टिकोन वापरून विविध पातळ्यांवर केलेली तुलनात्मक चिकित्सा."[८]

- **चंद्रशेखर जहागिरदार**

  "तौलनिक साहित्याभ्यासात अंतर्भूत असणारे प्रमुख संकल्पनात्मक घटक म्हणजे तौलनिक साहित्याची व्याख्या व व्याप्ती, आशयसूत्र, सिद्धांत, प्रभाव, स्वीकार, पुनरुज्जीवन, वाङ्मयप्रकार सिद्धांत, वाङ्मयीन चळवळी, संप्रदाय व कालखंड, अनुवाद मीमांसा, संरचना व शैली आणि तौलनिक वाङ्मयेतिहास हे होत."[९]

वरील विविध व्याख्या पाहून आपल्याला कल्पना येते की तौलनिक साहित्य हे किती गुंतागुंतीचा आहे. वेगवेगळ्या व्याख्या पाहून तौलनिक साहित्याच्या संदर्भात आपल्याला मतमतरांची कल्पना येते.

**तौलनिक साहित्याभ्यासाची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येणे शक्य आहे.'तौलनिक साहित्य म्हणजे एका पेक्षा अधिक साहित्याची कालखंडाच्या आधारे, विषयाच्या आधारे, भावनेच्या आधारे, कथानकाच्या आधारे, शैलीच्या आधारे भाषिक अंगाने इत्यादी मुद्द्यांच्या आधारे केलेली तुलना म्हणजे तौलनिक साहित्य.'**

**१.३ तौलनिक सहित्याभ्यासातील स्वरूप व वैशिष्टे**

तौलनिक साहित्य ही लक्षवेधक अशी अभ्यास पद्धती आहे. तौलनिक साहित्यांचा उगम पाश्चिमात्य देशात झालेला आहे म्हणून स्वरूप लक्षात घेत असताना पाश्चिमात्य अभ्यासकांची मते मतांतरे विचारात घ्यावी लागतात.

तौलनिक साहित्याभ्यासाचे स्वरूप स्पष्ट करत असताना डिओनिझ डायरेश्चिन यांनी दोन भागात त्याचे स्वरुप मांडले आहे.

**अ) “तौलनिक साहित्याभ्यास सामान्यतः साहित्यप्रक्रियेच्या विशिष्ट आणि सर्वसाधारण नियमांचा अभ्यास करतो. प्रथमतः विशिष्ट नियमांतर्गत निरनिराळ्या वाङ्मयप्रकारांच्या उगमांचा अभ्यास, तर लेखनशैलींच्या अभ्यासाचा समावेश वैश्विक अभ्यासांतर्गत होतो.”**

**(आ) “तौलनिक साहित्याभ्यास म्हणजे अशी साहित्यप्रक्रिया, जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सहसंबंधांचा आविष्कार, त्यातील दुवे व साम्यस्थळे दर्शविते आणि ज्यात विश्वसाहित्य उत्क्रांतवस्थेत असते.”**

तौलनिक साहित्याभ्यास पद्धतीत अभ्यासकांच्या या काही विधानांमुळे प्रमुख वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकला जातो. तौलनिक साहित्याम्यास ही वाङ्मयेतिहासाची एक शाखा आहे, तौलनिक साहित्य अभ्यासपद्धतीत केवळ साहित्यकृतींची तुलना अभिप्रेत नाही, तर लेखकांच्या वाङ्मयनिर्मितीमागील प्रेरणा आणि त्यांचे जीवनानुभव यांचादेखील अभ्यास अभिप्रेत आहे. ही अभ्यासपद्धती दोन वाङ्मयपरंपरांचा अभ्यास करते आणि त्यातील साम्याचा शोध घेते, वाङ्मयाचा अभ्यास, अभिव्यक्ती-पद्धतीचा अभ्यास एवढ्यापुरतेच या अभ्यासपद्धतीचे क्षेत्र मर्यादित नाही कला, शास्त्र, धर्म, तत्त्वज्ञान आदी अभिव्यक्ती-पद्धतीचाही त्यात समावेश आहे. या अभ्यासपद्धतीत दोन वाङ्मयांतील संबंधांचा तसेच स्थानिक आणि वैश्विक साहित्य यांचाही अभ्यास केला जातो. वाङ्मयातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दुवे व साम्यस्थळे यांचा शोध घेऊन वाङ्मयाचा परिपूर्ण अभ्यास तौलनिक साहित्याभ्यासात केला जातो. एकंदर, दोन किंवा अधिक भिन्न भाषिक साहित्यांच्या भाषा, प्रदेश, राष्ट्र यांच्या मर्यादांना उल्लंघून जाणारा आंतरप्रांतीय व आंतरराष्ट्रीय वाङ्मयीन, सांस्कृतिक व मानवीय अंतःसंबंधांचे पारस्परिक स्वरूप व वैशिष्ट्ये उलगडून दाखविणारा विवेचनपूर्ण तटस्थ अभ्यास म्हणजे तौलनिक साहित्याभ्यास होय. एकापेक्षा अधिक भाषांतील साहित्यकृतींची साधर्म्य, वैधर्म्य, प्रेरणा आणि प्रभाव यांचा शोध घेत केलेली समीक्षा, तसेच दोन किंवा अधिक भिन्न भाषिक समाजातील वाङ्मयीन संबंध आणि आदान-प्रदान यांचाही अभ्यास तौलनिक साहित्याभ्यासात समाविष्ट आहे.

एकोणिसाव्या शतकातच्या सुरुवातीला तौलानिक साहित्याची वैशिष्ट्यपूर्ण पद्धत म्हणून ती उदयास आली. तौलनिक साहित्याभ्यास हा फक्त भाषाभिन्नतेचा उदाहरण मराठी साहित्य बंगाली साहित्य, हिंदी साहित्य, इंग्रजी अशा भिन्न भिन्न भाषिक साहित्यांचा आपण कल्पना करतो परंतु भिन्नता एका भाषिक साहित्यातही असू शकते. विश्लेषण, रसग्रहण आणि मूल्यमापन हे साहित्य समीक्षेचे तीन घटक आहेत.तुलना करण्यासकरिता एकापेक्षा अधिक साहित्याची आवश्यकता तौलनिक साहित्याभ्यासात असते. तोलणे, मोजणे किंवा साम्यभेद असा 'तुलना' या शब्दाचा अर्थ आहे. यामुळे तुलना हे नाम तयार झाले आहे. तुलना या शब्दांमध्ये मूळ धातुक क्रियापद 'तुळ'णे हा आहे. तुलना या शब्दाचा इंग्रजी शब्द "comparison" आहे हा शब्द "to compare" या क्रियापदापासून बनलेला आहे मानवी मनाचा सहजस्वभाव तुलना करणे असा आहे.

दोन साहित्यकृतींची तुलना करत असताना संशोधन करणारा संशोधक त्या साहित्यकृतीतून प्रसंग, संवाद, शैली, घटना, पात्र, प्रादेशिक चित्रण इ. साहित्य घटक यांची संशोधक कलाकृतीशी तुलना करीत असतो. व यातून साम्य,भेद, प्रभव, प्रभाव याविषयी माहिती मिळते. सखोल अभ्यास करणे हा तौलनिक सहित्याभ्यासाचा मुख्य उद्देश आहे. घटकाचे स्वरूप स्पष्ट करत असताना तुलनेमध्ये अभ्यासकाला समानतेचे मूळ शोधता आले पाहिजे. समकालिन लेखीकांच्या कलाकृतीचा अभ्यास करत असताना त्यामध्ये कालखंड, स्त्रीवाद, पुरुष सत्ता,ग्रामीण चित्रण, राजकारण, परदेश चित्रण, असे भिन्न भिन्न घटक आले तर समान व भिन्न घटकांच्या मागे कालखंडाचा प्रभाव त्यांचे जीवन चित्रण असे मूळ घटक दिसून येतात.

समकालीन लेखकांच्या लेखनामध्ये सुद्धा समान गुणधर्म आढळतात तर काही भिन्नता सुद्धा दिसून येते. काही घटकामुळे ते असमान असतात व येथे समानता असते परंतु ते पूर्णपणे समान नसतात व ते तुलनेने वेगळे करता येते. तुलना करत असताना सुसंगती असावी लागते विसंगत तुलना कलाकृतीला वेगळा अर्थ देते व त्यामुळे संशोधक काय म्हणू इच्छितो ते चांगल्या प्रमाणे मांडू शकत नाही. त्याचा हेतू स्पष्ट होत नाही.

तौलनिक पद्धतीमध्ये तुलना कशाची करावी, कोणाची कशाशी करावी हे सर्वात महत्त्वाचे असते. वर वरच्या गोष्टी शिवाय अंतरिक गोष्टी, समान भिन्न गुण वैशिष्ट्ये अभ्यास करणे महत्त्वाचे असते. कालखंड, भाषा, संस्कृती अशा वेगवेगळया मुद्द्यांच्या आधारे तौलनिक अभ्यास होऊ शकतो. तुलना करण्यासाठी काहीतरी समान घटक असेल तरच तुलना होऊ शकते.

**१.२.१ तुलनात्मक अभ्यास आपण वेगवेगळया मुद्यांच्या आधारे करू शकतो.**

**कालखंडाच्या आधारे**

कालखंडाच्या आधारे म्हणत असताना विविध कालखंडामध्ये विविध प्रवाह व विविध प्रवृत्ती येतात. कालखंडानुसार प्रत्येकाची विचारसरणी बदलते. जसे वैचारिक बदल घडतात, प्रवाहात बदल घडतात प्रवृत्तीत बदल घडतात त्याप्रमाणे कालखंडाच्या अनुसार साहित्याची तुलना करताना बदल घडू शकतात.

**विषयाच्या आधारे**

प्रत्येक साहित्याचा विषय हा वेगवेगळा असतो. एकच एक विषय घेऊन कोणी साहित्य लिहीत नाही. त्यामुळे एखाद्या सामाजिक, ऐतिहासिक आध्यात्मिक अशा विषयाला अनुसरून तौलनिक अभ्यास करू शकतो.

**भावनेच्या आधारे**

भावनेच्या आधारे असं म्हणत असताना प्रवृत्ती प्रवाह बदलल्यामुळे व्यक्तिगत तसेच सामूहिक पातळीवर भावनांचे वैचारिक बदल झालेले असते. त्यातून निर्माण होणाऱ्या भावना ह्या वेगवेगळया असतात. त्याप्रमाणे प्रत्येक विषय किंवा विचार यानुसार भावनांमध्ये बदल होतात. त्याच अनुषंगाने प्रत्येकाचा साहित्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो. म्हणून भावनांच्या आधारे सुद्धा तौलनिक अभ्यास करता येऊ शकतो.

**आशयसूत्रांचा अभ्यास**

वेगवेगळ्या लेखकांच्या साहित्यातील आशय कमी-अधिक प्रमाणात वेगवेगळे असू शकतात. परंतु काही वेळा भाषा वेगळी असूनसुध्दा आशय मात्र एकसारखे असतात, तेव्हा अशा विषयांच्या आधारे तुलनात्मक अभ्यास केला जाऊ शकतो.

कथानकाच्या आधारे, शैलीच्या आधारे, वाङ्मयप्रकारांचा अभ्यास ,भाषान्तरित साहित्याचा अभ्यास, वाड्मयीन स्वीकार वाङ्मयीन प्रवाह व चळवळी यांचा अभ्यास अशा वेगवेगळ्या मुद्‌द्यांच्या आधारे तौलनिक साहित्याभ्यास केला जाऊ शकतो.

प्रस्तुत संशोधनात स्त्रीवाद, पात्र चित्रण, भाषिक वैशिष्ट्य, निवेदन शैली, विषय, आशय, वातावरण या मुद्‌द्यांच्या आधारे तौलनिक अभ्यास केला जाणार आहे.

**१.३.१ प्रभाव व प्रभव**

**प्रभाव**

“भिन्न भिन्न साहित्यांत समान अथवा समांतर विकास आढळू लागतो अथवा विशिष्ट साहित्याला नवी दिशा मिळाल्याचे दृश्य दिसू लागते. साहजिकच तौलनिक साहित्याभ्यासा- मध्ये 'प्रभावमीमांसा' हा महत्त्वाचा विषय ठरला आहे.”[१०]

प्रभाव नेहमीच साक्षात किंवा प्रत्यक्ष असतो असे नाही तो अप्रत्यक्ष असू शकतो तसेच तो विखुरलेला घुसरघुसर असाही आढळतो. प्रभाव या संकल्पनेचा ढोबळ अर्थाने विचार केला तर एखाद्या व्यक्तीचा एखाद्या वस्तूचा आपल्यावरती पूर्णतः प्रभाव होतो. त्याला प्रभाव असे म्हणतात. प्रभावविरहित व्यक्ती समाजामध्ये पाहायला मिळत नाही. साहित्यामध्येही वेगवेगळे प्रभाव प्रयोग होत असतात म्हणून ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी इत्यादी असे अनेक प्रवाह पाहायला मिळतात.

प्रभाव अनेक प्रकारचा असू शकतो. शाब्दिक, अशाब्दिक, वाङ्मयीन, अवाङ्मयीन, सांस्कृतिक-सामाजिक, भाषिक इत्यादी संस्कृती भिन्नता असूनही साहित्यामध्ये साधर्म्य आढळते. एकमेकांशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध असल्यामुळे एका साहित्याचा दुसऱ्या साहित्यावर किंवा लेखकावर प्रभाव पडत असतो.

लेखक भाषा, शैली, रचना, मनोवैज्ञानिक इत्यादी प्रभाव वैशिष्ट्यांचा स्वीकार करत असतो. प्रभाव पडण्यासाठी 'प्रभावक' हा घटक महत्त्वाचा असतो.

**प्रभव**

प्रभव म्हणजे एखाद्या कुठल्यातरी घटकाचा आपल्या वरती होणारा परिणाम. एखाद्या व्यक्तीच्या विशिष्ट सवयीचा जर आपल्या वरती परिणाम झालेला असेल तर तो प्रभवात येतो. त्यामुळे प्रभाव आणि प्रभव हे एकमेकांशी संबंधित आहे, प्रभव व प्रभाव म्हणजे समाज व व्यक्ती मधील संबंध. साहित्य मध्येही वेगवेगळे प्रभाव असतात म्हणूनच ग्रामीण, स्त्रीवाद,दलित, आदिवासी, महानगरीय असे वेगवेगळे साहित्य प्रवाह दिसून येतात.

प्रभव व प्रभाव याचा विचार एकत्र करावा लागतो. प्रभावातून प्रभव ही सज्ञा तयार होते. प्रभावक आणि प्रभव व प्रभाव यांचा संबंध म्हणजे दोन साहित्य कृतीमध्ये समानता आढळणे.

**१.३.२ तौलनिक साहित्याची तीन महत्त्वाची क्षेत्रे**

- **आकलन**
- **आस्वाद**
- **मूल्यमापन**

**१. आकलन**

समीक्षेमध्ये साहित्याचे आकलन हे कसं केलं जातं ते अपेक्षित आहे. त्याचे नेमकं स्वरूप काय असतं या अनुषंगाने जेव्हा आम्ही विचार करतो तेव्हा समीक्षा व्यापार करत असताना जेव्हा आपण डोकावतो त्यावेळी आकलन ही त्याची पायरी आहे. आकलन होण्यासाठी त्या साहित्यकृतीची आपल्याला समीक्षा करावी लागते. ती साहित्यकृती आपण काळजीपूर्वक वाचली पाहिजे म्हणजेच काय तर आपण सर्वसामान्य वाचकापेक्षा एक वेगळा दर्जा म्हणजे समीक्षक म्हणून

एखाद्या साहित्यकृतीचा आपल्याला वाचन करायचं असतं व ते वाचन हे कोणत्या प्रकारचं आहे याचं स्वरूप पाहिल्यानंतरच आपल्याला आकलन ही जी एक संकल्पना आहे याचं स्वरूप आपल्याला सहजपणे कळत. कुठलीही साहित्यकृती ही आपण एक समीक्षक या नात्याने आपण त्या साहित्यकृतीचे वाचन करतो ते वाचन करत असताना त्या साहित्यकृतीचे स्वरूप तिचे घटक जीवनानुभव, घटना, प्रसंग, वर्णन यासंदर्भात आपण अंदाज बाळगतो आणि जेव्हा ती साहित्यकृती वाचून पूर्ण होते त्यावेळी त्या साहित्यकृतीतील घटक कळायला लागतात साहिहित्यिकृतीच आपण जेव्हा वाचन करतो ते आकलनासाठी. म्हणून आकलन याचा अर्थ असा आहे की साहित्यकृतीचे जे काही अंतरंग आहे हे आपल्याला कळायला लागतं. आकलनामध्ये एक भाषिक व रूढ समीक्षा पद्धतीने साहित्यिकांच्या साहित्यकृतींच्या आणि साहित्य प्रवाहांच्या मर्यादा पाडतात.

उदा. ‘‘नामदेवांच्या हिंदुस्तानी व मराठी काव्यरचनांचा तौलनिक अभ्यास केल्यावर त्यांच्या आध्यात्मिक अनुभूती विषयीच्या शंकांना कशी उत्तरे मिळून जातात आणि आपली आकलन कसे स्वीकार होते याविषयी शोध झालेला आहे.’’[११]

‘‘विद्रोहाची कविता: कवितेचा विद्रोह' या लेखात विद्रोही मराठी कवितेविषयी चर्चा करताना "देशातल्या भिन्न भिन्न भाषांच्या जगात एका नव्या पिढीचा उदय" कसा झाला होता, त्याचे व्यापक पृष्ठचित्र रेखाटून त्या पार्श्वभूमीवर विद्रोही मराठी कवितेचे आकलन त्यांनी मांडले आहे.’’[१२]

‘‘मनोहर ओक, वसंत दत्तात्रेय गुर्जर, नामदेव ढसाळ या मराठी कवींचे आकलन नीटपणे होण्यासाठी त्यांच्या बरोबरीने लीलाधर जगूडी, चेराबंडा राजू, मलय रायचौधरी, नवारुण भट्टाचार्य या अमराठी कवींच्या कवितांची तौलनिक चिकित्सा करून त्या आधारे विद्रोही कवितेसंबंधीचे निष्कर्ष काढले आहेत.’’[१३]

**२. आस्वाद**

साहित्यकृतीचा आपल्याला आस्वाद घ्यायचा असेल तर ती साहित्यकृती आपण पुन्हा पुन्हा वाचली पाहिजे. अधिक वाचन करत असताना आपण आस्वादात रमत असतो. वाचनाने

साहित्यकृतीचे आकलन होते हे आकलन जितक्या जास्त प्रमाणे होईल तितकाच तिचा आस्वाद आपल्यावर परिणामदायक ठरतो. आस्वादासाठी आकलन आणि आकलनासाठी वाचन हे सूत्र आहे म्हणून साहित्याच्या आकलनावरच आस्वाद अवलंबून असतो. जास्तीत जास्त साहित्यकृतीचे आकलन करत असताना आपल्याला अडचण येत नाही परंतु तौलनिक साहित्य यांच्या आस्वादामध्ये तरी भर घालावी लागते.

उदा.''कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचे पहिलेच नाटक 'सवाई माधवराव यांचा मृत्यू' ही एक श्रेष्ठ कलाकृती आहे. तिच्यातील नाट्य आणि त्याचा विकास आपण पृथक्क्षणे पाहू शकतो. पण शेक्सपियरच्या 'हॅम्लेट'मधील नायक आणि 'ऑथेल्लो' मधील खलनायक यांना एकत्र आणण्याच्या कल्पनेतून हे नाटक स्फुरले, हे समजल्यावर 'हॅम्लेट', 'ऑथेल्लो' आणि 'सवाई माधवराव यांचा मृत्यू' या तीन नाटकांची एकत्र तौलनिक समीक्षा केली, तर या नाटकातील व्यक्तिरेखांचा अभ्यास अधिक प्रगल्भतेने आणि परिपूर्णतेने करता येतो.''[१४]

**३. मुल्यमापन**

समीक्षकाचे आकलन आणि आस्वाद जेवढे विविध स्वरूपाचे असेल किंवा आस्वाद जेवढा सखोल स्वरूपाचा असेल तेवढे त्याचे मूल्यमापन जे आहे ते बीचुक आणि प्रमाणित असतं. मूल्यमापन जर वर-वरचं असेल तर समीक्षाकाराने त्या साहित्यकृतीला न्याय दिला नाही असं म्हणता येईल. मूल्यमापनामुळे साहित्याचा दर्जा ठरतो आधुनिक समीक्षा आणि साहित्य विचारांमध्ये मूल्यमापन ही अतिशय महत्त्वाची पायरी मानली जाते.अपरिहार्यता,स्वभाव्यता, स्वभाविकता ही मूल्ये सर्वच काळाशी बांधलेली आहे ती सर्व मूल्य काळानुसार बदलत असतात तर काही मूल्य शाश्वत असतात.

उदा. ''मोरोपंत हे पंडित कवी कारागिरीत रमणारे, कृत्रिमतेच्या वाटेने गेलेले, कवित्वापेक्षा पांडित्याचे प्रदर्शन करण्यात धन्यता मानणारे असे होते, असे आपल्या समीक्षकांनी ठरवून टाकलेले असते. मोरोपंतांनी लिहिलेली (रचलेली!) एकशेआठ रामायणे हा त्यांच्या पांडित्यप्रलापाचा प्रकर्ष मानला जातो. पण त्याच एकशेआठ रामायणांमध्ये 'सीतारामायण', 'हनुमंत रामायण' आणि 'सद्‌गुरू

रामायण' ही तीन रामायणे असतात. 'सीतारामायणा'त सबंध रामायण सीता आपल्या मुखाने, प्रथम पुरुषी निवेदन पद्धतीने सांगते. 'हनुमंत रामायणा'त हनुमान रामायणाचे निवेदन करतो, तर 'सद्‌गुरू रामायणा'त राम, लक्ष्मण, सुग्रीव, हनुमान, बिभीषण हे पाळीपाळीने एकेका कथाभागाचे वर्णन करतात. मोरोपंतांच्या काव्यरचनेचा भारतीय साहित्याच्या स्तरावर तौलनिक अभ्यास करून एखादा समीक्षक आपल्याला सांगतो की संपूर्ण भारतीय साहित्याच्या इतिहासात प्रथमपुरुषी निवेदन पद्धती अशा तऱ्हेने पहिल्यांदा मोरोपंतांनीच या तीन रामायणांत, आणि तीसुद्धा इतक्या समर्पक रीतीने वापरलेली आहे, तेव्हा मोरोपंतांच्या कवित्वाचे आपले सगळे मूल्यमापनच बदलून जाते. त्याचबरोबर, प्रथम पुरुषी निवेदन पद्धती पाश्चात्य साहित्याच्या प्रभावाने भारतीय साहित्यात अवतरली, हा जुना सिद्धांतही जमीनदोस्त होतो."[१५]

**समारोप**

तौलनिक साहित्य हे तौलनिक साहित्याभ्यास या संज्ञेचे संक्षिप्त रूप आहे. वेगवेगळ्या भाषेतील साहित्याचा अभ्यास करण्याकरिता तौलनिक साहित्याभ्यास ही संकल्पना फार महत्त्वाची ठरते. दोन लेखकांमधील कालखंडाचा अभ्यास,कथानकाचा अभ्यास, भाषिक अंगाने अभ्यास, इत्यादी अशा वेगवेगळ्या प्रभावांचा अभ्यास करण्यासाठी तौलनिक साहित्याभ्यासाची पद्धतीची गरज पडते. एका साहित्यकृतीचा अभ्यास करताना त्याचा आशय, विषय, भाषा, प्रभाव, प्रभव, साम्य भेद समजून घेऊन त्याच्या आधारे तौलनिक दृष्टीने त्याचे मूल्यमापन करणे म्हणजेच एक तौलनिक साहित्याभ्यासाची एक महत्त्वाची पद्धत आहे.

**निष्कर्ष**

१. तौलनिक साहित्याभ्यासाचा वापर प्रथम अठराव्या शतकात जॉन ड्रायडनच्या 'Essay on Dramatic Poessy' या निबंधापासून एक अभ्यासपद्धती, समीक्षापद्धती म्हणून, साहित्याकडे पाहण्याचा एक दृष्टीकोन तयार झाला.

२. कथानकाच्या आधारे, शैलीच्या आधारे, वाङ्मयप्रकारांचा अभ्यास ,भाषान्तरित साहित्याचा अभ्यास, वाङ्मयीन स्वीकार वाङ्मयीन प्रवाह व चळवळी यांचा अभ्यास अशा वेगवेगळ्या मुद्द्यांच्या आधारे तौलनिक साहित्याभ्यास केला जातो.

३. प्रभावातून प्रभव ही सज्ञा तयार होते.

४. आकलन आस्वाद व मूल्यमापन ही तौलनिक साहित्याची तीन महत्त्वाची क्षेत्रे आहे.

**संदर्भसुची**

१. पाटील आनंद तौलनिक साहित्य नवे सिद्धांत आणि उपयोजन साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९८ पृ १०६

२. पाटील आनंद तौलनिक साहित्य नवे सिद्धांत आणि उपयोजन, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९८ पृ १०९

३. पाटील आनंद तौलनिक साहित्य नवे सिद्धांत आणि उपयोजन, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९८ पृ.४०

४. पाटील आनंद तौलनिक साहित्य नवे सिद्धांत आणि उपयोजन, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९८ पृ. ४०

५. पाटील आनंद तौलनिक साहित्य नवे सिद्धांत आणि उपयोजन, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९८ पृ.४१

६. पाटील आनंद तौलनिक साहित्य नवे सिद्धांत आणि उपयोजन, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९८ पृ. ४२

७. बापट वसंत तौलनिक साहित्याभ्यास मौज प्रकाशन: २९२ पहिली आवृत्ती : सप्टेंबर, १९८१ पृ.२७

८. पाटील आनंद तौलनिक साहित्य नवे सिद्धांत आणि उपयोजन', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९८ पृ.४३-४४

९. बापट वसंत तौलनिक साहित्याभ्यास, मौज प्रकाशन: २९२ पहिली आवृत्ती : सप्टेंबर, १९८१

१०.चंद्रशेखर जहागिरदार, तौलनिक साहित्यभ्यास तत्त्वे आणि दिशा, (प्रा. म. द. हातकणंगलेकर गौरव ग्रंथ), संपा. चंद्रशेखर जहागिरदार, कोल्हापूर, सौरभ प्रकाशन, १९९२ पृ.१३

११. मिरजकर निशिकांत तौलनिक साहित्य अरुण पारगावकर, प्रतिमा प्रकाशन १३६२, सदाशिव पेठ, औदुंबर अपार्टमेंट नवा विष्णुमंदिर चौकाजवळ, पुणे - ४११०३० दूरध्वनी : ०२०-२४४७८९०८, मो. ९८५०९५०७०४ पृ २५

१२.मिरजकर निशिकांत तौलनिक साहित्य अरुण पारगावकर, प्रतिमा प्रकाशन १३६२, सदाशिव पेठ, औदुंबर अपार्टमेंट नवा विष्णुमंदिर चौकाजवळ, पुणे – ४११०३० दूरध्वनी : ०२०-२४४७८९०८, मो. ९८५०९५०७०४ पृ २५

१३.मिरजकर निशिकांत तौलनिक साहित्य अरुण पारगावकर, प्रतिमा प्रकाशन १३६२, सदाशिव पेठ, औदुंबर अपार्टमेंट नवा विष्णुमंदिर चौकाजवळ, पुणे - ४११०३० दूरध्वनी : ०२०-२४४७८९०८, मो. ९८५०९५०७०४ पृ २६

१४.मिरजकर निशिकांत तौलनिक साहित्य अरुण पारगावकर, प्रतिमा प्रकाशन १३६२, सदाशिव पेठ, औदुंबर अपार्टमेंट नवा विष्णुमंदिर चौकाजवळ, पुणे - ४११०३० दूरध्वनी : ०२०-२४४७८९०८, मो. ९८५०९५०७०४ पृ २६

१५.मिरजकर निशिकांत तौलनिक साहित्य अरुण पारगावकर, प्रतिमा प्रकाशन १३६२, सदाशिव पेठ, औदुंबर अपार्टमेंट नवा विष्णुमंदिर चौकाजवळ, पुणे - ४११०३० दूरध्वनी : ०२०-२४४७८९०८, मो. ९८५०९५०७०४ पृ २७ -२८

१६.चंद्रशेखर जहागिरदार तौलनिक साहित्यभ्यास तत्त्वे आणि दिशा (प्रा. म. द. हातकणंगलेकर गौरव ग्रंथ), संपा. चंद्रशेखर जहागिरदार, कोल्हापूर, सौरभ प्रकाशन, १९९२

१७.बापट वसंत तौलनिक साहित्याभ्यास मौज प्रकाशन: २९२ पहिली आवृत्ती : सप्टेंबर, १९८१

१८.पाटील आनंद तौलनिक साहित्य नवे सिद्धांत आणि उपयोजन, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९८

१९. मिरजकर निशिकांत तौलनिक साहित्य अरुण पारगावकर, प्रतिमा प्रकाशन १३६२, सदाशिव पेठ, औदुंबर अपार्टमेंट नवा विष्णुमंदिर चौकाजवळ, पुणे - ४११०३० दूरध्वनी : ०२०-४४७८९०८, मो. ९८५०९५०७०४

२०.अडसूळ प्रा. श्रीकृष्ण आनंदपर्व तौलनिक साहित्य आणि संस्कृती समीक्षा, प्रकाशक :आनंद ग्रंथसागर प्रकाशन ८९, गीतानंद, अरूणोदय हौ. सोसायटी, शाहू पार्क, राजेंद्रनगरजवळ, कोल्हापूर-४१६००४ मो. ९४०४१४०९९५

२१.प्रभुदेसाई डॉ. वि. वा. आजचे मराठी साहित्य प्रकाशन भा. ल. कुलकर्णी साहित्य प्रसार केंद्र, सीलावडीं, नागपूर १२.

२२. वा.पु. गिंडे 'शेक्सपिअर आणि मराठी नाटक तौलनिक साहित्याभ्यास' शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर

# प्रकरण २

# मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथांचा आशयनिष्ठ तौलनिक अभ्यास

# मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथांचा आशयनिष्ठ तौलनिक अभ्यास

**प्रास्ताविक**

मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर यांनी नवोदत्तरी काळात कथालेखन केले. मेघना पेठे यांनी १२ कथा लिहिल्या. मेघना पेठे यांनी समुद्र चहुकडे पाणी, एक दिवस स्ट्र चा, होव्हावे लागे, कोल्ह्याचं लगीन, स्मरणाचा उत्सव जागून, छाया माया काया... या सात कथांचा संग्रह 'हंस अकेला' या नावाने नोव्हेंबर १९९७ मध्ये प्रसिद्ध केला. व एक ननैतिक बघ्या, आएँ कुछ अब्र..., अठरावा उंट , सहोदरा ऽ, आस्था आणि गवारीची भाजी. या पाच दीर्घ कथांचा संग्रह 'आंधळयाच्या गायी...' २००० मध्ये प्रसिध्द केला.

मोनिका गजेंद्रगडकर यांनी एकुण २२ कथा लिहिल्या. मोनिका गजेंद्रगडकर यांनी देणं, अनोळखी, आधार, नाळ, अर्थ,भूप या सहा कथांचा संग्रह 'भूप' या नावाने २००४ मध्ये प्रसिद्ध झाला. श्रद्धा, बाबाची आई, रुटस, संक्रमण, नातं, जन्म या सहा कथांचा संग्रह 'आर्त' या नावाने मार्च २००८ मध्ये प्रसिद्ध झाला. शरीर, अमलताश, व्रण, शिल्प, तीर, धर्म, परिशिष्ट या सात कथांचा संग्रह 'शिल्प' मे २०११ मध्ये प्रसिद्ध झाला. व वंश, फ्लेमिंगो, सारांश या तीन दीर्घ कथांचा संग्रह 'त्रिपर्ण' या नावाने २०२३ मध्ये प्रसिद्ध झाला.

मेघना पेठे यांच्या कथेतून स्त्रियांच्या जीवनावर आधारलेली वर्णन दिसून येते तर मोनिका गजेंद्र गाडेकर यांच्या कथेत नातेसंबंधाचे चित्रण केलेले दिसून येते. मेघना पेठे यांच्या कथेतून दिसून येणारी स्त्री-पुरुष पात्रे सुशिक्षित, आर्थिक दृष्ट्या स्वातंत्र्य असलेली आणि बदलते सामाजिक वास्तव यांचे भान असणारी व सामाजिक बदलांना सामोरे जाणारी आहे. स्त्रीच्या शरीर आणि मानवी अनुभवांचे मोकळे चित्रण मेघना पेठेनी आपल्या कथेतून केलेले आहे. मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथा स्त्रीकेंद्री ठरत नाही तर एकूणच मानवी जीवनाला आणि स्वभावातील व्यक्तीमिश्रता समजून घेण्याचा प्रयत्न करतात. मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथा या महानगरीय स्वरूपाच्या जाणवतात.

## २.१. मेघना पेठे यांच्या कथेतील आशयविश्व

मेघना पेठे यांच्या कथांचे आशय विश्व स्पष्ट करत असताना ते वेगवेगळ्या मुद्द्यांच्या आधारे केले जाणार आहेत.

**१. एकटेपणाची जाणीव**

मेघना पेठे ही आधुनिक काळातली अत्यंत महत्त्वाची कथा लेखिका आहे. 'एकटेपणा' हा मेघना पेठे यांच्या कथांचा अनुभव विषय आहे. घर आणि मुलं यांच्यामध्ये राहून सुद्धा ती व्यक्ती एकाकी जगतात यांचे चित्रण मेघना पेठे यांनी आपल्या कथेत केलेले आहे. ही माणसे जगाच्या दृष्टीने तरी एकाकी नसली तरी स्वतःच्या मनाशी एकटी असतात. मेघना पेठे यांचे महत्वाचे अशयसूत्र म्हणजे एकाकीपण आहे.

'समुद्र चाहूकडे पाणी' या कथेतील नायिका आहे जी स्वतःचे घर सोडून आलेली आहे. कौटुंबिक चौकट मोडून स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतलेली अविवाहित अशी स्त्री आहे. आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी आहे. नायिका आहे ती घर सोडून एकटी राहते. ती ज्या कॉलनीत राहते त्या कॉलनी मधील सर्व माणसांच चित्रण, कॉलनीच चित्रण त्यामूळे ही कथा आणखी चांगली झालेली आहे. आपल्या एकटेपणाला घालविण्याकरिता ती वेगवेगळ्या उपक्रमात भाग घेते. तिला एकटेपणामुळे आयुष्यात खूप काही सहन करावं लागलं. तीच्या आयुष्यात अनेक अर्थहीन अश्या गोष्टी घडल्या त्यामूळे तिला अधिकच एकटेपणा वाटत होता. या सर्वामध्ये एकाकीपणाचा आधार फक्त लव होता.

'सी सॉ..' या कथेमध्ये सुधा नायिकेला एकाकीपणाची जाणीव झालेली आहे.

"आपण व्यक्ती नव्हतोच कधी. खरं तर माणूसही जेमतेमच होतो. स्वतःच्या त्याच ओळखीवर आता हे शिक्कामोर्तब झालं"[१] व "रात्री, बेरात्री, दिवसा, दुपारी... बोलणं कधी नाहीच. सांगणंसवरणं नाही, समजावणं नाही, चुचकारणंसुद्धा नाही. फक्त हुकूम. नव्या मालकाचे हुकूम"[२] या दोन वाक्यावरून समजतं की एका स्त्रीच्या मनाची झालेली अवस्ता कशी झालेली आहे. ती काहीच बोलू शकत नव्हती. एकटेपणा सहन करावा लागत असे. तिच्या आयुष्यात बंधेलपणाचे आयुष्य आलेले दिसून येते. लग्नानंतर ही ती एकटेपणाचे आयुष्य जगताना दिसते. तिला मुलगा झाल्यावर ती त्याच्या आधारावर आयुष्य जगते. परंतु आशु मोठा झाल्यावर तो कामासाठी निघून जातो व त्यामुळे ती परत एकटी पडते.

'होआवे लागे' या कथेमध्ये केसकर बाईच्या एकाकीपणा विषयी मांडलं आहे. तिला झालेलं एकाकीपण काव्यात्म रूपात चिंतन केलेलं आहे.

"रात्री नसते विविध भारती, ना ताज्या बातम्यांचा पेपर...

रात्री नसते लोकलच्या दिशेने ढकलायची क्षणांची ढकलगाडी

रात्री नसतो सोबतीला गर्दीचा वास, शार्टकट्सचे विचार,

वाढत्या महागाईच्या चिंता, विषमतेचे 'डंख... एकच एक लांब

रस्ता असतो रात्री असत असण्याचा..."[३]

'छाया माया काया' या कथेमध्ये विभा ही एकटी आयुष्य जगताना दिसते. घरापासून दूर गेलेल्या विभाचे चित्रण या कथेत आलेले आहे. तिचं प्रेम अशोकवर होतं परंतु ती नागेश सोबत आईच्या सांगण्यावरून लग्न झाली होती. ती शेवटी एकाकी राहण्याचा निर्णय घेते.

'एक दिवस स्ट्र चा' या कथेमध्ये स्ट्र च्या आयुष्यात आलेला एकटेपणा दिसुन येतो. ह्या कथेतील स्ट्र हा एकाकी असतो तो आपल्या इच्छा आकांक्षा विसरलेला आहे व फक्त नाटकाच्या वेड्यात एकाकी आयुष्य जागतो.

'आस्था आणि गवारीची भाजी' या कथेमध्ये मिथिला या पत्राच्या एकाकी आयुष्य जगण्याच चित्रण आलेलं आहे. अनिरुद्धला ती नकार देवून एकटी आयुष्य जगण्याचा ती प्रयत्न करते. तिला चाळीस वर्ष झाल्यानंतर एकाकीपणा नको सा वाटतो परंतु कोणतेही उपाय नसल्यामुळे ती एकाकी जगते.

'अठरावा उंट' या कथेमध्ये घराचा आधार न मिळाल्याने झालेली एकटेपणा कथेत दिसून येतो.

'स्मरणाचा उत्सव जागून' या कथेमध्ये नवऱ्याने नाकारल्यामुळे झालेला एकटेपणा दिसून येतो.

आर्थिक सुखात असून सुधा माणसाला असलेले एकाकीपण हे कथेंचे केंद्रस्थान ठरते.

**२. मानवी सहवासाची आस**

‘होआवे लागे’,‘सी सॉ’,‘समुद्री चाहूकडे पाणी’, ‘छाया माया काया’ या कथामधून स्त्रीला झालेली मानवी सहवासाची आस दिसून येते. मानव हा जन्माला येताना एकटाच येतो व जाताना पण एकटाच जातो. परंतु जीवन जगत असताना घर कुटुंब समाजामध्ये तो जगत असतो व काही वेळा विभक्त कुटुंब पद्धतीमुळे त्याला एकाकी जीवन जगायचे लागते त्यामुळे तो जोडीदार शोधण्याचा प्रयत्न करतो म्हणून मानवी सहवासाची आस हे आशय सूत्र मेघना पेठेच्या कथांमध्ये येते.

‘होआवे लागे’ या कथेमध्ये वर्तक  जो असतो त्याला बायकोने आपल्यावर अधिकार गाजवलेला नको असतो. त्यामुळे तो कामावरच्या केसकर या बाईशी आकर्षित होतो. केसकर जेव्हा गर्भवती होते त्यावेळी वर्तक हार्ट अटॅक आल्यामुळे मरण पावतो. व तो आपलं अस्तित्व केसकरच्या पोटात ठेवून जातो. गिझरे हा अपंग माणूस केसकरच्या ऑफिसमध्ये काम करणारा आहे व सुरुवातीला तो केसकरला नाकारतो परंतु काही वेळाने केसकर ही त्याला आपलीशी वाटू लागते आणि तो तिला स्वीकारतो. गिचरेला माहित असतं की वर्तकच्या मुळे केसकर गर्भवती आहे परंतु तो केसकर सोबत आपल्या नव्या आयुष्याला सुरुवात करतो.

**३. स्त्रीचे दुय्यम स्थान**

‘आस्था आणि गवारीची भाजी’ या कथे मधील उषा हे मुख्य पात्र आहे. कौटुंबिक बंधनात बांधलेल्या उषाचे चित्रण आलेले आहे तिच्या अनेक इच्छा आकांक्षा अपुऱ्या राहतात आणि त्या लग्नानंतर पुऱ्या होईल अशी आशा ती बाळगते. स्त्रियांच्या गरजांच्या समस्या बद्दल बोलणारा अनिरुद्ध आपल्या पत्नीच्या हक्काबद्दल विचार करत नाही. मुलीला संसार सांभाळावा म्हणून अनेक गोष्टी शिकवल्या जातात. मुलीला नेहमी तिच्या मर्यादित राहावं लागतं.

‘सहोदरा’ या कथेमध्ये बहिण भावाच्या नात्याचं चित्रण आलेल आहे. या कथेतील नायिका ही मुलगी असल्यामुळे तिला दुय्यम दर्जाची वागावणूक मिळते. मुलगा हा ‘वंशाचा दिवा’ आहे असं मानलं जातं. घरात कोणतीही नवीन वस्तू आणली की ती अगोदर मुलाला वापरायला दिली जाते. वापरून झालेल्या जुन्या वस्तू मुलीला वापरण्यासाठी दिल्या जातात. मुलगी कितीही कर्तृत्वान असली तरी तिला घराचा वारस समजले जात नाही. मुलाला दुःख  होईल अशा प्रकारचे कोणतेही काम केले जात नाही. मुलगी दुसऱ्याच्या

घरी जाते ही धारणा कृती पाठीमागे असते. पुरुषी समाज व्यवस्थेमुळे आदींलला मिळालेले वरचे स्थान आणि 'वंशाचा दिवा' म्हणून घरातल्या सगळ्या व्यक्ती त्याच्याशी चांगल्या वागतात. घराण्याचे नाव करण्यासाठी मुलगा हवा असतो. मुलीने कोणती चूक केली तर ते समाजाला मात्र मान्य नसतं.

"घरात दिवा लावायला तर पोरगाच हातुया" म्हणून मुलाला मुलीपेक्षा अधिक जपले जाते. "हा' असला पाहिजे. प्रत्येक घरात हा असला पाहिजे. हीऽ काऽय असली नसली सारखीच. मरताना हा पाणी घालणार तोंडात"[४] म्हणून मुलगा पाहिजे. प्रत्येक घरामध्ये मुलगाच असला पाहिजे अशी एक समजूत आहे. मुलगा हा मुलीपेक्षा श्रेष्ठ ठरतो कारण तो 'वंशाचा दिवा' असतो असे मानले जाते.

'अठरावा उंट' या कथेतील नायिका सुजाता आहे. घरापूर्तेच मर्यादीत तिचे अस्तित्व आहे. तिच्या नवऱ्याच्या दृष्टीनं ती बिनकामाची आहे. तिच्या नवऱ्याच्या मते बायको ही शोभेची वस्तू आहे. सुजाता ही नानाच्या इच्छेविरुद्ध लग्नं झाल्यामुळे ती आता नवऱ्याच घर सोडू शकत नव्हती.

**<u>कुरप दिसणाऱ्या स्त्रिया</u>**

मेघना पेठ यांच्या कथातील स्त्रिया रूपसौंदर्याच्या अभावी जाणाऱ्या आहे. बहुतेक स्त्रिया काळ्या, जाड ओठ, कुरूप, दात पुढे असणाऱ्या अशा आहेत. त्यांना आपण दिसायला चांगले दिसत नाही याची सुद्धा जाणीव आहे. आपण अविवाहित राहिलो याचे दुःख त्यांना आहे. कोणी जोडीदार मिळाला तर त्या आपली लैंगिक भूक भागवू इच्छिताना दिसतात. उदा.

'समुद्र चाहूकडे पाणी' या कथेमध्ये स्त्री आपलं स्वतःचं वर्णन करत असताना म्हणते की

'मी आपली चार दोन consistent मुरम चेहऱ्यावर वागवत, नाकाच्या आजूबाजूला तेलकट होत, न जाडी, न बारीक, न आधुनिक, न पारंपारिक, न बावळट, चमत्कारिक अशी दिवसें दिवस होते.'[५]

अशाप्रकारे ती स्वतःचे वर्णन करते.

'होआवे लागे' या कथेमध्ये ची नायिका आहेत ती दिसायला फार चांगली नाही. केसकरचं वर्णन या कथेमध्ये अशाप्रकारे केलेलं आहे. उदा.

'आईने खाल्लेला पपया न बांधता हट्टाने जन्माला आलेली, काळीभोर सामान्य रूपाची, कुठल्याच कौतुकाची ध्वनी नसलेली, आईने उदासपणे वाढवलेली....केसकर'[६]

घरामध्ये सुद्धा तिला कुरूप म्हटलं जायचं त्याचप्रमाणे ऑफिसमध्ये सुद्धा तिला कुरूप म्हटलं जायचं. गिझरे हा तीला कोकिळा म्हणून हाक मारायचा.

'आए कुछ अब्र' या कथेमध्ये सुद्धा जी स्त्री आलेली आहे ती दिसायला कुरूप असल्याकारणाने तिचं लग्न होत नाही ती म्हणते

'काटकुळे आहोत आपण, सावळे, ओठांवर लव, गालांवर मुरुमांचे व्रण, आपले एवढेसे उभार, तेही या सिल्कच्या पसाऱ्यात गायब...... याला वाटेल का आपल्याला कवेत घेऊन कुरवाळावंस? आपल्याबद्दल अनावर लालसा वाटावी, काहीतरी निर्णायक उडी घ्यावी अंधारात, असं compelling जबरदस्त आकर्षण आपल्या कव्हरात तर खास नाही[७] अशाप्रकारे ती आपले स्वतःचे वर्णन करते.

एकंदरीत रूप सौंदर्याच्या जवळजवळ अभाव असणाऱ्या अशा या कथा आहे. त्या कुरूप आहेत म्हणून त्या दुःखी होत नाही परंतु त्यातूनच सुख शोधून आपलं जीवन सुखात जगताना दिसतात.

**४. घरापासून दुरावलेली**

'होआवे लागे' या कथेमधील नायिका केसकर ही घरापासून दुरावलेली आहे. केसकर ही नको असताना जन्माला आलेली मुलगी आहे व त्यामुळे तिचा तिरस्कार केला जातो. केसकरला घरापासून प्रत्येक व्यक्तीचा आधार हवा असतो परंतु तो तिला मिळत नाही त्या कारणाने ती नोकरीसाठी खेड्यातून शहरामध्ये जाते.

'छाया माया काया' या कथेमधील प्रभाच्या लग्नाला पंचवीस वर्षे होऊन सुद्धा तिला घर आपलं असं वाटत नाही. तिला वाटतं की घर म्हणजे कुणाचा कुणाशी संबंध नसणारा. नुकत्या मातीच्या विटा म्हणजे घर आहे. घराची अशी अवस्था असल्यामुळे प्रभा घरापासून दूर जाऊ पाहते.

'स्मरणाचा उत्सव जागून' ही कथा अनिरुद्ध व रमाकांच्या आयुष्यावर आधारलेली आहे. आईने अनिरुद्धाला डॉक्टर होण्यासाठी खूप आधार केला परंतु रमाकांतला घराचा आधार न मिळाल्यामुळे तो त्याचे स्वप्न पूर्ण करू शकला नाही. रमाकांतलाही अनिरुद्ध प्रमाणे डॉक्टर व्हायचे होते. त्याला त्याच्या आईवडिलांकडून प्रेम मिळत नव्हते त्यामुळे रमाकांत घरापासून दुरावलेला आहे.

'कोल्ह्याचे लगीन' या कथेत सुद्धा आशितोष नावाच्या पात्राला घर आपले असे वाटत नाही. लहानपणीच आशितोषला समजते की आईला आपला तिरस्कार वाटतो. म्हणून तो एकटा राहण्याचा निर्णय घेतो.

'एक दिवस 'स्ट्र' चा' या कथेमधील नायक 'स्ट्र'आहे. त्याला घरातून प्रेम आधार मिळतो परंतु तो नाटकात नाव कमावण्यासाठी एकटे राहण्याचा ठरवतो.

'आये कुछ अब्र' या कथेतील नायिका वडिलांचे विचार न पटल्यामुळे घर सोडण्याचा निर्णय घेते.

'एक ननैतिक बघ्या' या कथेतील नायक बिट्टू आपल्या वडिलांच्या मृत्यूनंतर घराचा आधार नष्ट झाल्यामुळे तो भटकू लागतो.

'समुद्र चाहुकडे पाणी' या कथेतील नायिका आपलं घर सोडून फ्लॅटमध्ये राहायला येते. ती त्या फ्लॅटमध्ये एकटीच राहते आणि एकटेपणा घालवण्यासाठी ती वेगवेगळे उपाय करते. तिच्या आयुष्यात घडणाऱ्या अनेक घटनामुळे ती अधिकच एकटी बनून जाते.

५.**शरीरसुखाची आस**

पुरुषाला स्त्रीबद्दल त्याचप्रमाणे स्त्रीला पुरुषाबद्दल शरीर आकर्षण वाटते. सुरुवातीच्या लेखिका स्त्री पुरुष शरीर संबंधाबद्दल फारसे लिहित नव्हत्या. शरीर सुखाची आस ही एक सहज मानवी मनातील प्रवृत्ती आहे.

'समुद्री चाहूकडे पाणी' या कथेतील नायिकेला नेरुरकराबद्दल शरीर आकर्षण वाटते. पुरुषांना ती नकोशी वाटणारी बायी आहे. तिला नेरुरकरला पाहिल्यानंतर शरीर सुखाची भावना तिच्या लक्षात येतात.

‘कोल्ह्याचे लगीन’ या कथेमधील मंजुळाबाई ही आशितोषच्या घरी भांडी घासायचे काम करते. घरापासून दुरावलेला आशुतोष आपल्या आईच्या प्रेमळ स्पर्शासाठी आसुसलेला आहे. परंतु त्याला त्याच्या आईची तीड येते कारण तिने त्याच्या पांगळया भावाला लहानपणी मारून टाकला होता त्यामुळे तो घर सोडून मुंबईला आला होता. मंजुळाच्या दृष्टीने आशुतोष कडून घेतलेले शरीरसूख हे आनंद आहे. आशुतोषला दुपटेपणाची आस देणारा व मंजुळाला आपल्या मुलाची आठवण देणारा असा हा अनुभव होता. ही एक सहज घडणारी अशी घटना आहे आणि ती नैसर्गिक आहे.

‘होआवे लागे’ या कथेमध्ये गिझरेला नीलिमा कान्हेरे बद्दल शरीर आकर्षण वाटते व केसकरला वर्तका विषयी आकर्षण वाटतं.

‘छाया माया काया’ या कथेतील नायिकेला अशोक विषयी तिला शरीर आकर्षण वाटते. पण लग्न झाल्यानंतर तिज्याशी नागेश एकरूप न राहिल्यामुळे तिला शरीर सुख मिळत नाही.

‘आऐ कुछ अब्र’ या कथेतील नायिकेला सुद्धा शरीरसुखाची इच्छा पुरी करावीशी वाटते.

‘आस्था आणि गवारीची भाजी’ या कथेतील मी तिला सुद्धा आपल्या शरीर सुखाची आस पूर्ण करते.

एकंदरीत मेघना पेठे यांच्या कथा लेखनाचे महत्त्वाचे असे आशय सूत्र म्हणजे शरीर सुखाची आस असे म्हणू पाहता येते.

६. **काव्यात्मक कथा लेखन**

मेघनांच्या कथा लेखनामध्ये काव्यात्मक भाषेचा वापर केलेला दिसून येतो. उदा.

“ चौदाव्या मजल्यावरुन लॉग शॉटमध्ये दिसणारा किनारा, नि त्यावरुन सरकणारी टिंबासारखी माणसं, सोंगट्यासारखी वाहनांची रांग, सारं सारं फ्रेमच्या बाहेर गेलं आणि फ्रेममध्ये उरला समुद्राचा एक ओबडधोबड क्लोजप. जणू आजूबाजूची माणसं तिच्या लेखी नाहीशीच झाली. फक्त समुद्र, समुद्राचा करडा काळा कार्डबोर्ड भिजून मग वाळून मग वेडावाकडा कडक झालेला. त्याच्या बाजूबाजूने शहरातल्या

दिव्याची लखलखती रांग. जाहिरातींचे लाल, हिरवे, पिवळे निळे बोर्ड, जणू निरनिराळ्या रंगांच्या ज्वाळांनी त्याला वेढले आहे. कुठल्याही क्षणी तो पेट घेईल. कुठल्याही क्षणी..... आणि भुरभुरत जळत जाईल. आकाशाला त्या आगीची झळ लागेल, आणि स्फोटात क्षणार्धात कोसळलेल्या छतासारखे ते स्फोटक आकाशही कोसळून त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या होतील. त्याबरोबर त्याला लटकलेलं ते सूर्याचं मंद, तांबूस झुंबरही. चक्काचूर, चूर काचांचे बोचरे जखमी करणारे बारीक तकडे, पेटत्या कार्डबोर्डची हलकी राख सर्व दूर उडणारी. छताचे केविलवाणे ढलपे, स्फोटानंतरही बराच काळ कोसळत राहणारे आणि या सर्व विनाशी ढिगाऱ्यातून लोळागोळा झालेल्या एका रक्ताळलेल्या पक्ष्याने पंखाची मंद, तडफडती हालचाल करीत खुरडत उडल्यासारखे करावे, पुन्हा ढिगाऱ्यात कोसळावे, पुन्हा वर झेपवावे, पुन्हा......"[८]

"केसकरही आपले वर्णन करत असताना काव्यात्म करते. उदा

सकाळी उठोनी असत असावे..

आईसह किंवा आईशिवाय..

वर्तकांसह किंवा वर्तकांशिवाय..

मुलासह किंवा मुलाशिवाय..

पण आम्ही असणारच.. आम्ही असावेच..

आणि अंडे कावळयाच्या घरात टाकून भुर्रकन उडून जाणाऱ्या कोकिळेसारखी,

ती हलकी हलकी होऊन खोलीकडे जाण्यासाठी उठलो."[९]

'आस्था आणि गवारीची भाजी' या कथेमध्ये सुद्धा मिथिलेने काव्यात्मक वर्णन केलेले आहे. उदा.

तहान अशी लागली पाहिजे की जमिनीला कान लावून खळाळ ऐकू आला पाहिजे दुरच्या बारीक झऱ्याचासुध्दा तोसुध्दा शोधून आपल्या ओंजळीनं घोटभर पाणी पोटात जाईपर्यंत ती तहान टिकवून धरता आली पाहिजे आणि पायातलं बळही!'

सहोदरा या कथेत सुद्धा काव्यात्मक वर्णन केलेला आहे.उदा.

“फुलं, फळं, बिस्किटं, कार्डस्...

सूचना, इशारे, माहिती, वशिले, सल्ले...

अनुभव, आठवणी, अंदाज, अटकळी, मतं, गॉसिप्स...

श्रद्धा, अंधश्रद्धा, अंगारे, धुपारे, नवस, प्रार्थना, नीतिधैर्य, रडारड, आशावाद आणि आलिया भोगासी...

आणि मग गेले सगळे आपापल्या घरी... नित्यक्रमांच्या विळख्यात... म्हणजे

जाणारच की...

किती दिवस झाले? आजचा एकूण बाविसावा दिवस...”[१०]

‘ छाया माया काया’ कथेत सुद्धा काव्यात्मक वर्णन आलेल आहे.

“यमुनेच्या तिरि किति बुलबुल अस्तिल

यमुनेच्या तिरि किति बुलबुल अस्तिल

यमुनेच्या तिरि किति बुलबुल अस्तिल

वृक्षावरती होऽ

एक तरी, दोन तरी, तिन तरी असतिल

चार तरी, पाच तरी, सहा तरी असतिल

सात तरी, आठ तरी, नऊ तरी असतिल

दहा तरी बुलबुल होऽ

दहा तरी, नऊ तरी आठ तरी असतिल

सात तरी, सहा तारी, पाच तरी असतिल

चार तरी, तीन तरी, दोन तरी असतिल

एक तरी बुलबुल होऽ....''[१२]

अशा प्रकारे 'छाया माया काया', 'सहोदरा', 'आस्था आणि गवारीची भाजी', 'समुद्र चाहूकडे पाणी' अशा वेगवेगळ्या कथांमधून मेघना पेठेनी काव्यात्मक दृष्टीने वर्णन केलेले आहे.

### २.१.१ स्त्री-पुरुष नातेसंबंधाचे चित्रण

मेघना पेठेंनी 'हंस अकेला' व 'आंधळयांच्या गायी' या दोन्ही कथासंग्रहातून स्त्री-पुरुषांच्या वाट्याला येणाऱ्या एकाकीपणाची जाणीव व्यक्त करताना स्त्री-पुरुषांच्या नातेसंबंधाचे चित्रण केलेले आहे. मेघना पेठे यांनी फक्त पती पत्नीच्या संघर्षाचे चित्रण केलेले नाही परंतु मुलगा-आई भाऊ- बहिण अश्या प्रकारे स्त्री पुरुष नाते संबंधाचे सुद्धा चित्रण केलेले आहे. उदाहरण 'अठरावा उंट' व 'आस्था आणि गवारीची भाजी' या दोन्ही कथांमध्ये पती-पत्नीच्या नातेसंबंधाचे चित्रण केलेले आहे. 'सहोदरा' या कथेत बहीण भावाच्या नातेसंबंधाचे चित्रण केलेले आहे. कोल्ह्याचे लगीन या कथेमध्ये आई व मुलाच्या नातेसबंधाचे चित्रण केलेले आहे.

मेघना पेठे यांनी एकूणच मानवी नातेसंबंधाचा त्याच बरोबर स्त्री जाणिवांचा थेटपणे शोध घेतलेला दिसून येतो. भौतिक सुख असूनही मानसिक सुख न मिळाल्याने माणूस कसा एकाकी होतो याचे चित्रण मेघना पेठे यांनी केले आहे. ह्या दोन्ही कथासंग्रहात बहुदा कथा या पती पत्नी वर आधारित आहे. काही कथांमध्ये असं सांगितलं आहे की मुल बाळ असून सुद्धा ती पत्नी कशी एकटी जगते तिच्या जीवनात कसा एकाकीपणा येतो हे त्यांनी त्यांच्या कथातून चित्रित केलेले आहे.

पुरुषप्रधान व्यवस्थेमुळे स्त्रीला वस्तूमूल्य दिल्यामुळे स्त्री ही फक्त उपभोगण्याची वस्तू आहे किंवा स्त्रीला एक भोग वस्तू म्हणून पाहिले जाते. 'समुद्र चाहुकडे पाणी' या कथेमध्ये स्त्रीची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे विवाहबाह्य संबंध ठेवताना दिसते व त्यामुळे तिला कॉलनीतून बाहेर काढले जाते.

स्त्रियांच्या शरीराचे नियम हे पुरुषांपेक्षा वेगळे असतात त्यामुळे स्त्रियांना त्यांच्या मर्यादित राहावे लागते. परंपरेत पतीला श्रेष्ठ दर्जाचे स्थान प्राप्त झालेले असते परंतु स्त्रीला दुय्यम स्थान प्राप्त झालेले असते. महानगरात राहणारे पती पत्नी दोघेजण नोकरी करणारे असतात. त्यामुळे त्यांचा संघर्ष वाढत जातो. याचे चित्र मेघना पेठेंनी आपल्या कथा मधून केलेले आहे.

महानगरात राहणाऱ्या कुटुंबाचे चित्रण सुखी दिसले तरी ते तसे नसते. त्यांच्या नात्यांमध्ये दिखवणूक असते. स्त्रीला स्त्रीचे आणि पुरुषाला पुरुषाचे असे प्रत्येकाला प्रत्येकाचे जगणे बहाल करणारा असा आशय मेघना पेठेंनी मांडलेला दिसून येतो. पती-पत्नीच्या संघर्षामुळे ते कुटुंबापासून दुरावले जातात. पती-पत्नी एकमेकांना समजून न घेतल्या कारणाने हा संघर्ष निर्माण झालेला दिसून येतो.

स्त्री-पुरुष नातेसंबंधाचे चित्रण करत असताना मेघना पेठे यांनी फक्त पती-पत्नी मधील संघर्षा बरोबरच बहीण भावाचा संघर्षाबद्दलचे चित्रण केलेले आहे. बहिणीने भावाप्रमाणेच हुशार होऊन तिने त्याच्यासारखेच स्थान प्राप्त करायची तिची इच्छा असते.

**२.१.२ समाजवास्तवाचा वेध**

विविध विषयांचा समावेश मेघना पेठे यांच्या आशय सूत्रातून आढळतो. आधुनिक जगात जगत असताना मानवाला अनुभवलेल्या विविध समस्यांचा वेध घेणे हा त्यांच्या कथांचा मुख्य हेतू आहे. महानगरीय जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण केल्यामुळे त्यांच्या लेखनात वास्तवता आली आहे. समाज चौकटीत राहून सुद्धा माणूस दुकटा होत नाही आणि समाज चौकटी मोडून सुद्धा माणूस एकटेपणा सहन करू शकत नाही. या वास्तवाचे भान मेघना पेठे आपल्या कथाच्या माध्यमातून मांडताना दिसतात. सहजीवन, शरीर सुख, एकाकीपणा, स्त्रीचे दुय्यम स्थान, घरापासून दुरावलेली अशा वेगवेगळ्या विषयांचा आधार घेऊन मेघना पेठेनी लेखन केलेले आहे आणि महानगरी जीवनातले प्रत्यक्ष वास्तव त्यांनी त्यात चित्रित केलेले आहे. उदाहरण आपला नवरा कॉलनीतल्या अविवाहित स्त्रीशी संबंध ठेवतो हे वास्तव बायकोला माहीत असताना सुद्धा नेरुरकरची बायको नायिका आजारी असताना तिला डाळिंब भात नवऱ्याच्या हाती पाठवून देताना दिसून येते.

### ३.१ मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतील आशयविश्व

नागर जीवनात वेगवेगळी माणसे कशी वागतात, त्यांचे कुटुंबाशी समाजाशी नातेसंबंध कसे असते, त्या त्या वेळी त्यांची मानसिकता कशी असते हे सर्व विषय त्या आपल्या कथांमधून चित्रित करतात. विचारांची सखोलता ही भूप आणि आर्त या दोन्ही कथा संग्रहातून दिसून येते. भूप हा एक संगीतातला राग आहे. संगीताचा वापर मोनिका गजेंद्र गडकर आपल्या कथांमधून भावना व्यक्त करण्यासाठी करतात.

### १ . स्त्रीला झालेली कुचंबणा

स्त्रियांना मिळाले स्थान हे सतत दुय्यम असतं कारण अजूनही बऱ्याच कुटुंबामध्ये पुरुष सत्ता आहे. स्त्रीचे अनेक पातळयावर शोषण होत असते आणि अशा शोषणाची चित्रे मोनिका गजेंद्रगडकर आपल्या कथांमधून चित्रित करतात. मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथांमधून दिसून येते की स्त्रीची कुचंबणा ही शारीरिक आणि मानसिक पातळीवर असते.

‘देणं’ या कथेमधील नायिका निर्मला ही एम ए करण्यासाठी आलेली असते व ती गजाननच्या प्रेमात पडते. निर्मलाला झालेली कुचंबणा या कथेमध्ये दिसून येते. कोणत्याही बंधना शिवाय गजानन आणि निर्मला एकत्र राहणारे दोघी मात्र निर्मला जेव्हा गर्भवती होते त्यावेळी गजानन नव्या अंकुराला नाकारतो त्यावेळी ती कोंडीत सापडते. निर्मला स्वतःच्या मुलाच्या भविष्याबद्दल भयभीत होते कारण लग्नासारखे रुढी समाजाने घातली आहे. पुरुषाच्या पाठिंब्याशिवाय ती काहीच करू शकत नव्हती.

‘नाळ’ या कथेमधील नायिका सुमित्रा आहे व ती शारीरिक आणि मानसिक शोषणाला बळी पडलेली आहे. स्त्रीला फक्त उपभोगाची वस्तू म्हणून पाहिली जाते. शारीरिक संबंधातून झालेले ताण, स्त्रीचे होणारे शोषण त्याचा प्रतिकार न करता ती मार्ग शोधते. सुमित्रा स्वतःच्या मुलीच्या दृष्टीने सुद्धा व्यभिचारी मानली जाते. नवऱ्याकडून शारीरिक अत्याचाराला बळी पडणारी सुमित्रा आहे.

या कथेतील सुमित्राची आत्या वेडी झालेली आहे कारण तिचा नवरा तिला फक्त मासाचा गोळा असं म्हणून तिच्या स्त्रीत्वाचा नाकार करतो. यातून तिला झालेली मानसिक व शारीरिक शोषण मोनिका गजेंद्रगडकर आपल्या कथेंमधून चित्रित करते.

'श्रद्धा' या काथे मधील मधील धर्माचे शोषण केलेले दिसून येते. यशोदाने आपल्या मुलाकडूनच हे शोषण केलेले असते. कुटुंबातील असणारे तिचे स्थान तिला नाकारायला सांगतो व तो तिला बुर्खा घालायला व नमाज पढायला सांगतो. धार्मिकतेच्या नावाखाली यशोदा मानसिक व शारीरिक दृष्ट्या बळी पडतात.

बऱ्याच वेळा स्त्रीच्या शोषणाला स्त्रीच कारणीभूत असते.

'संक्रमण' या कथेतील मुख्य पात्र रेणु आहे. रेणुला  तिच्या आईकडूनच कुचंबना होत असतो.

'नातं' या कथेतील उमाला कुचंबणा झालेला दिसून येतो. माझ्या नवऱ्याचा अपघातात मृत्यू होतो जेव्हा ती गरोदर असते. पतीच्या मृत्यूनंतर तिला कुटुंबात कमी लेखले जाईल या विचाराने तीची मानसिकता कोंडली जाते.

'जन्म' या कथेमधील मालविका आपल्या मुलाला जन्म देऊ इच्छिते. मालविका ही अविवाहित बाई असते. समाजाच्या दृष्टीने ते चुकीचं असतं त्यामुळे तिला झालेले कुचंबणा दिसून येते.

'वंश'  या कथेमध्ये सुद्धा नायीकेला झालेला कुचुंबाण दिसून येतो.

**२. कुटुंब जीवनाचे चित्रण**

बदलत्या कुटुंब संस्थेचे चित्रण मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथांममधून दिसून येते.

'देणं' या कथेतील निर्मला डॉक्टर मेहंदळेच्या घरी राहायला जाते व त्यांच्या घरा विषयी ती नोकराकडून डॉक्टरांच्या कुटुंबाविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न करते त्याचप्रमाणे ज्यावेळी ती गजाननंला भेटते त्यावेळी ती गजानचा आणि त्याचे कुटुंब साकार होत जाते.

'अनोळखी' ही कथा कुटुंब संस्थेचे चित्रण करणारी आहे. ताराबाईंची मुलगी आणि मुलगा परदेशात स्थिरावलेली आहे. भारतीय समाज व्यवस्था आणि परदेशी समाजव्यवस्था याच चित्रण या कथेत

केलेले आहे. भारतीय समाज व्यवस्था ही अशी आहे की मुलांच्या लग्नानंतर सुद्धा त्यांच्या समस्या ह्या आपल्या समस्या समजल्या जातात परंतु परदेशात ढवळाढवळ केली आवडत नाही. अविवाहित असलेली नाती सुद्धा त्यांची गरोदर असतात. महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुलाचा बाप कोण असतो ते सुद्धा त्यांना माहीत नसतं. दोघे भाऊ बहीण असून सुद्धा त्यांच्यामध्ये ते नाते क्षीण झाल्याचे दिसून येते.

'शरीर' या कथेत सुद्धा कुटुंब संस्थेचे चित्रण आलेले आहे. मुसलमान लोक दोन लग्न करतात व त्या कुटुंबाचे चित्रण या कथेत आलेले आहे. सायरा ही पहिली पत्नी असते व तिला मुलं बाळ असतात. मुमताजला आई होण्याची खूप इच्छा असते परंतु ती ते होऊ शकणार नव्हती त्यामुळे तिला तिचा नवरा मारतो. स्त्रीला फक्त उपभोगण्याची वस्तू म्हणून पाहिली जाते हे या कथेतून दिसून येतं.

'वंश', 'फ्लेमिंगो', 'परीशिष्ट', 'शिल्प', 'व्रण' या कथांमध्ये सुद्धा कुटुंबाचे चित्रण आलेले आहे.

'नाळ' या कथेतील सुमित्रा ही आधुनिक काळातील असली तरी तिचा पती तिच्या व्यक्ती स्वतंत्र्याला किंवा तिच्या आकांक्षाला मान देत नाही. तिला फक्त शरीर उपभोगाचे साधन म्हणून पाहिले जाते.

'अर्थ' या कथेमधून एका घटनेने विस्कळीत झालेल्या कुटुंबाचे चित्रण दिसून येते. त्याचप्रमाणे 'भूप' ही कथा सुद्धा कुटुंबाच्या त्रिकोणात बांधलेली दिसून येते.

**३. कथांतून दिसून येणारी प्रेयसी, तरुण मुलगी व आई**

मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथांमध्ये वेगवेगळया स्त्री व्यक्तिरेखा दिसून येतात उदाहरण प्रेयसी, तरुण मुलगी आणि आई.

प्रेयसी म्हणत असताना 'देणं' या कथेमधील निर्मला पाठकच्या प्रेमात पडते. तो विवाहित असून सुद्धा लग्नाशिवाय निर्मला त्याच्यासोबत राहते. ती गर्भवती होते. पाठक वर लग्नाच्या जबाबदारी असल्याकारणाने तो ते मुल स्वीकारायला नाकारतो. ती त्या मुलाला जन्म देऊ इच्छिते. हा विचार ती स्वतंत्रपणे घेते. कुठल्याही परिस्थितीला मात देणाऱ्या अशा या व्यक्तिरेखा आहे.

अशाच प्रकारचे चित्रण ‘जन्म’ आणि ‘अनोळखी’ या कथेमध्ये सुद्धा येताना दिसते.

आजची स्त्री स्वतंत्रपणे विचार करू शकणारी आहे. व ती स्वतंत्रपणे आपला निर्णय घेणारी आहे. मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथांमधून ज्या स्त्रिया आलेल्या आहेत त्या बंडखोरी प्रवृत्तीच्या आहे. स्त्रीला स्वतःकडे पाहण्याचा विचार बदललेला आहे. हे या तीनही कथा मधून दिसून येत.

तरुण मुलगीचे चित्रण करत असताना वेगवेगळ्या पातळीवर तिचे चित्रण केले जाते.

‘नाळ’ या कथेमध्ये नेत्रा हे पात्र आईपासून दुरावलेला आहे व ती तिच्या आईच्या प्रेमासाठी आसूसलेले असे पात्र आहे.

‘संक्रमण’ या कथेमधील रेणू ती मुलगी असल्या कारणाने तिला घरात कमी दर्जा दिला जातो. रेणू ही कुटुंबात सर्व जबाबदाऱ्या पेलणारी अशी व्यक्तिरेखा आहे परंतु आईकडून तिला कमी लेखलं जायचं.

मुलगी असली तरी तिला कुटुंबामध्ये मिळालेले स्थान, व आई-वडिलांकडून मिळालेली वागणूक यामध्ये फरक असलेला दिसून येतो.

‘भूप’, ‘आर्त’ व ‘शिल्प’ या कथासंग्रहात आलेले आई हे पात्र काही वेळा प्रमुख म्हणून येतं.

‘अनोळखी’ या कथेमध्ये जे आई हे पात्र आलेलं आहे ते आपल्या मुलांना आपल्या कुटुंबाशी बांधून ठेवण्याचा प्रयत्न करताना दिसत.

आपल्या मुलीकडून दुरावलेली अशा आईचे चित्रण ‘नाळ’ या कथेमध्ये दिसून येत.

‘श्रद्धा’ या कथेमधील आई जेवढी हळवी आहे तेवढी कठोर असलेली दिसून येते. यशोदेचा मुलगा जो असतो तो धर्माच्या कट्टर विचारांचा असतो. ती त्याला अटकाव करते. ती सहन करते परंतु परिस्थिती ज्यावेळी तिच्या सहन भूतीच्या बाहेर जाते त्यावेळी ती शेवटी घर सोडून जाते.

मेघना पेठे यांच्या कथांमध्ये येणाऱ्या आईची रूपे वेगवेगळी आहे. उदा.

१. आपल्या प्रेमातून कुटुंबाला जोडणारी

२. आत्मभान आल्यामुळे घेतलेले निर्णय

३. मुलगा मुलगी म्हणून भेदभाव करणारी

४. प्रसंगाला कठोर वागणारी

५. कुमकुवत मुलाला परत एकदा जन्म देणारी

अशाप्रकारे मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथांमध्ये वेगवेगळा रूपाची स्त्री व्यक्तिरेखा आपल्याला दिसून येतात. प्रत्येक व्यक्तिरेखाच्या द्वारे महानगरातील आधुनिक वास्तवाच दर्शन घडतं. प्रेयसी, आई किंवा ती मग तरुण मुलगी असेना तिची वेगवेगळी रूपे आपल्याला या कथांमधून दिसून येतात.

**२.१.१ आधुनिक नातेसंबंधांचे चित्रण**

मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथा व्यक्तींमधली नातेसंबधामुळे दुरावलेल्या तर त्यामुळेच साधल्या गेलेल्या आहे. नातेसंबंधातून आलेला हताशपणा, एकटेपणा याचे चित्र याची चित्रण मोनिका गजेंद्रकडकर यांनी केले आहे. लेखिका आपल्या लेखनातून स्त्री-पुरुष नाते चित्रीत करत असताना पती-पत्नी,आई-वडील, भाऊ बहीण यांच्यामध्ये असणाऱ्या नातेसंबंधाचे सुद्धा चित्रण केलेले आहे. उदाहरण पती पत्नी यांच्या नाते संबंधाचे चित्रण करणारी 'नाळ' ही कथा आहे. स्त्रीकडे फक्त उपभोगाची वस्तू म्हणून पाहणारा तिचा पती आणि त्यातून सुमित्राची होणारी मानसिक आणि शारीरिक पिवळणुक दिसून येते. यामुळे सुमित्रा घर सोडून जाते परंतु त्यामुळे ती मुलीपासून दूर जाते. 'रुटस' या कथेमध्ये दोन भावांमधील आणि आई-वडिलांच्या नात्यातील ताण दिसून येतो. 'जन्म' व 'भूप' या दोन्ही कथांमध्ये आई-वडील मुलगा यांचे नातेसंबंधाची चित्रण केलेले आहे.

मोनिका गजेंद्रगडकर यांनी स्त्री-पुरुष नाते संबंध हा अतिशय सखोल पणे हाताळलेला दिसून येतो. नातेसंबंधातल्या अनुभवाविषयी त्या म्हणतात मानवी नात्यांमधलं उसवत जाणं माणसाच्या मृत्यूशीही कसं जोडलेलं असतं, हा धागा मला त्यात सापडला. एकूणच माणसा-माणसांत एकमेकांना समजून घेताना येणाऱ्या अडचणी, आड येणारे त्यांचे अहंम आणि त्यातून दुरावत जाणारी नाती, न सांधले जाणारे माणसांमधले पूल, त्यातल्या वेदना मला अस्वस्थ करतात. या नात्यांचे वेगवेगळे पैस मला खुणावत राहतात.

या नात्यांचा अखंड शोध घेण्याचं एक वेडच मला लागत गेलं आणि त्यातून वेगवेगळया अनुभवांचे पदर खुणावतही गेले.(मोनिका गजेंद्र गडकर यांनी मुलाखतीत असे म्हटले आहे)

**२.१.२ समाजवास्तवाचा वेध**

मोनिका गजेंद्रगडकरनीं आपल्या कथेतून शहरी मध्यमवर्गीय कुटुंबाची चित्रण केलेले आहे. कुटुंबातील ताण-तणाव, त्यांना आलेले समस्या, हे सर्व त्या आपल्या कथेतून मांडताना दिसतात. नोकरीसाठी किंवा शिक्षणासाठी परदेशात गेलेल्या तरुणांचे चित्रण त्या आपल्या कथांमधून करतात. परदेशात जाऊन तरुण आपली संस्कृती विसरतात आणि तिथल्या मानसिकतेमुळे एकटे पडतात. त्यांच्या संस्कृतीचे जीवन पण पोचवू शकतो ते तिथेच राहतात तर न पचणारे मागे येऊ पाहतात.

महानगरातील कुटुंब व्यवस्थातील वास्तव चित्रित करणाऱ्या अशा या मोनिका गजेंद्र गडकरांच्या कथा आहे. दोन पिढीतील अंतर ती सूचित करते. आंतरिक आणि बाह्य अशा दोन्ही कारणामुळे जुन्या व नव्या पिढीमध्ये टाळ निर्माण होतात. महानगरीय जीवनाची पार्श्वभूमी त्यांच्या लेखनात आहे. स्त्रीला झालेला कुचंबणा ती अधोरेखित करताना दिसते. कुटुंब पद्धती, यातून आलेला एकटेपणा स्वार्थामुळे निर्माण झालेला दुरावा याची मांडणी त्या आपल्या कथांमधून करतात. पुरुष सत्ता व्यवस्था व स्त्रियांनी केलेले शोषण अशी वास्तव दर्शवणारी विविध रूपे मोनिका गजेंद्र गडकर आपल्या कथांमधून मांडताना दिसतात.

**२.३ मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथेतील आशय विश्वातील साम्यभेद.**

मेघना पेठे यांच्या कथांमधून आढळणाऱ्या बहुतेक स्त्रिया या स्वतंत्र वृत्तीच्या आहे. त्यांना कोणाच्या बंधनात राहायला आवडत नाही. विविध कारणामुळे त्या एकट्या राहतात व ते एकटेपण त्यांनी स्वीकारलेले आहे. इतकेच नव्हे तर तो एकटीपण घालवण्याचा वेगळा पर्याय त्यांनी काढलेला आहे. बहुतेक स्त्रिया ही एकट्या राहण्याची निवड करत असताना घाबरतात परंतु काही अशा पण स्त्रिया आहे ज्यांनी आपलं पाऊल उचललेल आहे .मेघना पेठे यांच्या कथांमधील स्त्रिया बहुतेक वास्तवाशी जुळलेल्या, नोकरी करणाऱ्या आहे. त्यांच्या रूप सौंदर्याचे चित्रण कथांमधून दिसून येते. समाजामध्ये चालणाऱ्या नातेसंबधाबद्दल व शरीर सुखाबाबतीत ढोंगीबाजी विरुद्ध आवाज मेघना पेठेनी उठवला आहे. मोनिका

गजेंद्र गडकर यांच्या कथेमध्ये महानगरीय जीवनाची पार्श्वभूमी लेखनाला येते. महानगरीय जीवनातील ताण-तणाव, तिथले वास्तव चित्रीत करणारी या कथा आहे. कुटुंबात स्त्रीची होणारी कुचबणा त्यांच्या कथेतून दिसून येते. मेघना पेठेच्या कथांमध्ये मुंबईचे चित्रण आलेले आहे. मोनिका गजेंद्रगडकरांच्या कथांमध्ये परदेशाचे चित्रण आलेले आहे. मेघना पेठेच्या कथांमधून स्त्री ही आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी आहे व ती कुटुंबातून नोकरीसाठी दूर जाऊन एकटी जगत आहे. परंतु मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथांमधून बहुतेक स्त्रिया या आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी असून सुद्धा कुटुंबाच्या चौकटीत अडकलेल्या आहेत व त्या कुचंबणा सहन करतात.

### २.३.१ स्त्री पुरुष नातेसंबंधातील चित्रणात साम्यभेद

मेघना पेठेनी स्त्रीपुरूष नातेसंबध चित्रित करत असताना "स्त्री पुरुष नाते:माझी भूमिका" या लेखात म्हटले आहे की "आई – मुलगा, वडील- मुलगी, भाऊ- बहीण ही नाती वगळून इतर नात्याविषयी विचार करायचा आहे. म्हणजेच ज्या भिन्नलिंगी संबंधात INCEST TABO लागू नाही अशा नात्याचा विचार अभिप्रेत आहेत अशी नाती."[१३]

मेघना पेठे म्हणतात की नातेसंबंध टिकणे हे एक समयावच्छेदे करून सुरु राहतात. व याचे स्पष्टीकरण करत असताना त्या म्हणतात की याचे कारण स्पष्ट आहे अर्थात तेही कागदावरच पण त्याचे कागदावरील स्पष्टीकरण असे आहे. "एकाच व्यक्तीच्या भिन्न भिन्न गरजा दोन भिन्न ठिकाणी पूर्ण होत असतात यात गृहीत तत्व हे आहे की गरजांची पूर्तता करणाऱ्या दोन व्यक्तींना त्या गरजाव्यक्तिरिक्त इतर गरजा पूर्ण करण्याची गरज नसते.उदाहरण एका स्त्रीचे दोन पुरुषांची असलेले नातेसंबंध. यात एकामध्ये समजा आई, गुरु, मादी आणि पालक असण्याच्या तिच्या भूमिकांना प्रतिसाद मिळतो तर दुसरीकडे सखी, शिष्य, मुलगी या भूमिकांना प्रतिसाद मिळतो. हे जोपर्यंत एकमेकांना विचारत नाही तोवर कसला प्रश्न नसतो परंतु एकाच वेळी दोन्ही पुरुषांना समजा, गुरु व्हावेसे वाटले वा नर म्हणून दोघांच्याही अपेक्षा तिच्याकडे रोखल्या गेल्या तर ताण निर्माण होतात. हे अनेक भूमिकांच्या बाबतीत जर वारंवार होत होऊ लागले, तर ताण निर्माण

होतात. हे अनेक भूमिकांच्या बाबतीत जर वारंवार होऊ लागले, तर ताण अखेर सांगोपांग विचार करून त्या व्यक्तीला एका नातेसंबंधाची निवड करावी लागते."[१४] असे मेघना पेठे म्हणतात.

मेघना पेठे यांनी फक्त पती-पत्नीच्या संघर्षाचे चित्रण केलेले नाही परंतु मुलगा-आई भाऊ- बहिण अश्या प्रकारे स्त्री पुरुष नाते संबंधाचे चित्रण केलेले आहे त्याचप्रमाणें मोनिका गजेंद्रगडकर यांनी स्त्री-पुरुष नाते चित्रीत करत असताना पती-पत्नी,आई-वडील, भाऊ बहीण यांच्यामध्ये असणाऱ्या नातेसंबंधाचे सुद्धा चित्रण केलेले आहे. मेघना पेठेनी नातेसंबंध व त्याचबरोबर स्त्री जाणिवांचा थेटपणे शोध घेतला आहे तर मोनिका गजेंद्रगडकर यांनी नातेसंबंधामुळे दुरावलेल्या व्यक्तींचे त्यांच्या कथेतून चित्रण केलेले आहे.

मेघना पेठे यांच्या कथेतील स्त्रिया आर्थिक दृष्ट्या स्वातंत्र्य असलेली आणि बदलते सामाजिक वास्तव यांचे भान असणारी व सामाजिक बदलांना सामोरे जाणारी आहे तर मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतून मध्यमवर्गीय कुटुंबव्यवस्था दिसून येते. कुटुंबामध्ये झालेले अंतर्बाह्य बदल, माणसांचे वागणे, नातेसंबंध या सर्वांतून दिसते अशा बदलत्या कुटुंब व्यवस्थांचे चित्रण लेखिकेने आपल्या कथातून केले आहे.

### २.३.२ कथेतील समाजवास्तव चित्रणामधील साम्यभेद

मेघना पेठे आपल्या कथेतून विविध समस्यांचा वेध घेताना दिसते. मोनिका गजेंद्रगडकर यांनी शहरी मध्यमवर्गीय कुटुंबाचे चित्रण केलेले आहे. मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथा महानगरीय वास्तव चित्रीत करणाऱ्या आहेत. मेघना पेठे यांच्या कथांमधील स्त्रिया सुशिक्षित, नोकरी करणाऱ्या आणि महानगरीय वास्तवाशी जोडलेल्या आहेत.

सहजीवन, घरापासून दुरावलेली, आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र अशा वेगवेगळया विषयांच्या आधार घेऊन मेघना पेठेनी लेखन केलेले आहे तर कुटुंब पद्धती, यातून आलेला एकटेपणा स्वार्थामुळे निर्माण झालेला दुरावा याची मांडणी त्या आपल्या कथांमधून करतात. धर्मावरील आत्यंतिक श्रद्धेमुळे एखादी व्यक्ती कोणत्या थराला जाऊ शकते याचे चित्रण मोनिका गजेंद्रगडकर गडकर यांनी केला आहे.

### समारोप

प्रस्तुत प्रकरणात मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या आशय सूत्राचा विस्ताराने विचार केलेला आहे. महानगरीय जाणीव त्यांच्या लेखनातून आढळतात. महानगरीय जीवनातले ताण तणाव त्यांच्या कथांमधून दिसून येतात. मध्यमवर्गीय स्त्रियांचे शोषण, पुरुष प्रधान संस्कृती, स्त्रीचे दुय्यम स्थान , एकत्र कुटुंब व्यवस्था, यातून आलेला एकाकीपणा, स्वार्थामुळे निर्माण झालेला दुरावा याची मांडणी त्या आपल्या कथांमधून करतात.

**निष्कर्ष**

१. पुरुषांचे गुण स्व केंद्री किंवा समाज केंद्री असतात तर स्त्रीचे गुण कुटुंबकेंद्री व पुरुष केंद्रीत असतात.
२. मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर आपल्या कथांमधून शहरी आधुनिक जीवन चित्रित करताना दिसतात.

**संदर्भ**


**१.** पेठे मेघना 'हंस अकेला' प्रकाशक दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन प्रा. लि. १०२५, सदाशिव पेठ पुणे – ४११०३० फोन – (०२०) २४४७३४५९ फॅक्स : २४४३३७१९ E-mail : rajhansprakashan1@gmail.com Website : www.rajhansprakashan.com (पृष्ठ ११८)

**२.** पेठे मेघना 'हंस अकेला' प्रकाशक दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन प्रा. लि. १०२५, सदाशिव पेठ पुणे – ४११०३० फोन – (०२०) २४४७३४५९ फॅक्स : २४४३३७१९ E-mail : rajhansprakashan1@gmail.com Website : www.rajhansprakashan.com (पृष्ठ ११८)

**३.** पेठे मेघना 'हंस अकेला' प्रकाशक दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन प्रा. लि. १०२५, सदाशिव पेठ पुणे – ४११०३० फोन – (०२०) २४४७३४५९ फॅक्स : २४४३३७१९ E-mail : rajhansprakashan1@gmail.com Website : www.rajhansprakashan.com (पृष्ठ ७९)

४. पेठे मेघना ‘आंधळयाच्या गायी’ प्रकाशक दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन १०२५, सदाशिव पेठ पुणे- ४११०३०.(पृ. १००)

५. पेठे मेघना ‘हंस अकेला’ प्रकाशक दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन प्रा. लि. १०२५, सदाशिव पेठ पुणे – ४११०३० फोन – (०२०) २४४७३४५९ फॅक्स : २४४३३७१९ E-mail : rajhansprakashan1@gmail.com Website : www.rajhansprakashan.com (पृ ४)

६. पेठे मेघना ‘हंस अकेला’ प्रकाशक दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन प्रा. लि. १०२५, सदाशिव पेठ पुणे – ४११०३० फोन – (०२०) २४४७३४५९ फॅक्स : २४४३३७१९ E

७. पेठे मेघना ‘आंधळयाच्या गायी’ प्रकाशक दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन १०२५, सदाशिव पेठ पुणे- ४११०३०.(पृ. ३८)

८. पेठे मेघना ‘आंधळयाच्या गायी’ प्रकाशक दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन १०२५, सदाशिव पेठ पुणे- ४११०३०.(पृ. १००)

९. पेठे मेघना ‘हंस अकेला’ प्रकाशक दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन प्रा. लि. १०२५, सदाशिव पेठ पुणे – ४११०३० फोन – (०२०) २४४७३४५९ फॅक्स : २४४३३७१९ E-mail : rajhansprakashan1@gmail.com Website : www.rajhansprakashan.com (पृष्ठ ६५,६६)

१०. पेठे मेघना ‘हंस अकेला’ प्रकाशक दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन प्रा. लि. १०२५, सदाशिव पेठ पुणे – ४११०३० फोन – (०२०) २४४७३४५९ फॅक्स : २४४३३७१९ E-mail : rajhansprakashan1@gmail.com Website : www.rajhansprakashan.com (हंस अकेला पृष्ठ ८५)

११. पेठे मेघना ‘आंधळयाच्या गायी’ प्रकाशक दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन १०२५, सदाशिव पेठ पुणे- ४११०३०.(पृ. ८९)

१२. पेठे मेघना ‘हंस अकेला’ प्रकाशक दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन प्रा. लि. १०२५, सदाशिव पेठ पुणे – ४११०३० फोन – (०२०) २४४७३४५९ फॅक्स : २४४३३७१९ E-mail :

rajhansprakashan1@gmail.com Website : www.rajhansprakashan.com (पृष्ठ १२५,१२६)

**१३**.लांडे सुमती – "स्त्री-पुरुष नातेसंबंध" प्रकाशक : सुमती लांडे शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स नं. ९०, वॉर्ड ७, श्रीरामपूर – ४१३७०९. फोन : ०२४२२-२१०४२५, मोबा. : ९८२२२१५०९ (पृ ८३)

**१४**.लांडे सुमती – "स्त्री-पुरुष नातेसंबंध" प्रकाशक : सुमती लांडे शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स नं. ९०, वॉर्ड ७, श्रीरामपूर – ४१३७०९. फोन : ०२४२२-२१०४२५, मोबा. : ९८२२२१५०९ (पृ ८५)

# प्रकरण ३

## मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या लेखनातून दिसून येणारा स्त्रीवाद व स्त्री जाणिवांचा तौलनिक अभ्यास

# मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या लेखनातून दिसून येणारा स्त्रीवाद व स्त्री जाणिवांचा तौलनिक अभ्यास

**प्रास्ताविक**

'स्त्रीवाद' ही व्यापक अशी संकल्पना आहे. स्त्रियांवर होणारा अन्याय,अत्याचार याला विरोध करण्यासाठी स्त्रीवाद या संकल्पनेचा विकास झाला. राजकीय विचार प्रणाली म्हणून या संकल्पनेला पाहिले जाते. स्त्रीवादाचे स्वरूप स्पष्ट करत असताना डॉक्टर मंगला वरखडे म्हणतात "पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रियांना मिळालेल्या दुय्यम स्थानाचा प्रतिवाद करणे आणि सामाजिक, राजकीय व आर्थिक सत्तास्थानात पुरूषांच्या बरोबरीने स्थान प्राप्त होण्यासाठीची चळवळ हे स्त्रीवादी चळवळीचे स्वरूप आहे."[१] १९६० नंतरच्या स्त्रियांच्या कथालेखनामध्ये प्रिया तेंडुलकर, वसुधा पाटील, सरीता पदकी, मेघना पेठे, सानिया व मेघना पेठे यांनी महत्त्वपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण कथालेखन केले. त्यांच्या कथेतील निरनिराळ्या प्रसंगातून नायिका व तीचे व्यक्तीगत जीवनचित्रण येते. स्त्री जीवनातील विविध नात्यांचा शोध त्यांची कथा घेताना दिसून येतात.

भारतीय स्त्रीला कित्येक शतकांपासून दुय्यम स्थान दिले जायचे. आपला नवरा म्हणजे परमेश्वर आणि त्या परमेश्वराची सेवा हाच आपला पत्नीधर्म असे तिला सांगितले जायचे मग तो नवरा कितीही वाईट असला तरी चालेल परंतु त्याची सेवा बायकोने तो परमेश्वर आहे हेच समजून करावी लागायची. "एकीकडे स्त्रीला दुर्गा, कालिका, जगदंबा असे शक्तिवान देवतांचे स्थान असले तरी ते दिशाभूल करणारे आहे. 'चूल आणि मूल' यांच्या पलीकडे स्त्रियांना पारंपरिक समाजव्यवस्थेत दुसरे कुठले स्थान असण्याचे कारणच नाही असा सर्वसाधारण समज आहे."[२]

१९७५ ते १९८५ या दशकात स्त्रियांच्या साहित्यातून नव्या जाणीवा व्यक्त होऊ लागल्या. स्त्रीवादी साहित्य लिहिणाऱ्या लेखिकांचा एक गट जरी नसला तरी या काळातील स्त्रियांच्या लेखनातून 'स्त्रीवादी जाणिवा' आढळतात. या काळातील स्त्री ही शिक्षण घेऊ लागली. पुरुषांसारखी बाहेर जाऊन काम करायला लागली. तर १९९० नंतरचा काळ आहे तो स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा करणार आहेत.

प्रस्तुत तिसऱ्या प्रकरणात मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या लेखनातून दिसून येणारा स्त्रीवाद व स्त्री जाणिवांचा तौलनिक अभ्यास करण्यात येणार आहे. या प्रकरणात मेघना पेठे यांच्या कथेतून दिसून येणाऱ्या स्त्री जाणिवांचे स्वरूप व मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथातून दिसून येणाऱ्या स्त्री जाणिवांचे स्वरूप स्पष्ट करून मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथेतून स्त्रीवाद व स्त्री जाणिवांचे साम्यभेद स्पष्ट केले जाणार आहेत.

### ३.१ मेघना पेठे यांच्या कथेतील स्त्रीवाद व स्त्री जाणिवांचे स्वरूप

'समुद्र चाहुकडे पाणी' ही कथा हंस अकेला या कथासंग्रहातील आहे. या कथेची नायिका जी आहे ती आर्थिक दृष्टया स्वावलंबी आहे. स्वतःचे वर्णन करत असताना ती तिच्या शब्दात म्हणते की "३० पूर्ण झालेली, बिन लग्नाची नाही, तर बिनपुरुषाची अभोग स्त्री" असे ती वर्णन करते. स्त्रियांच्या आधुनिकतेबद्दल, विवाह संस्थेबद्दल त्यांच्या जीवनानुभव बद्दल मेघना पेठेच्या कथा आहे. या कथेची नायिका आहे ती बिनविवाहित आहे आणि तिला नेरूरकरा बद्दल आकर्षण वाटते. स्त्रीला झालेली एकाकीपणाची जाणीव या कथेतून दिसून येते. ती एकटी राहत असल्या कारणाने तीच्यावर टोमणे मारले जातात. उदा.

"तू एकटी राहतेस. काळजी घे. अर्थात आम्ही आहो म्हणा."[३]

या कथेत नायिकेला झालेली एकाकीपणा त्याचबरोबर पाठकच्या बायकोला सहन करावा लागणारा अत्याचार दिसून येतो. ज्यावेळी पाठक आपल्या बायकोला मारतो त्यावेळी त्याला विचारायला कोणीच येत नाही मोठमोठ्याने ती रडते परंतु बाहेर राहून सर्व लोक ते ऐकतात. आर्थिक परिस्थिती चांगली नसल्या कारणाने पाठकच्या बायकोला विवाहबाह्य संबंध ठेवावे लागतात व ते पाठक स्वीकार करतो परंतु कॉलनीतल्या लोकांना आवडत नसल्याकारणाने त्यांना कॉलनीतून बाहेर काढण्याचा निर्णय घेतला जातो. कॉलनीतील लोक म्हणतात की, "अरे, आम्हालाही बायका, बहिणी आहेत तिच्याकडे जाणारी रंडीबाज उद्या आमची दारं वाजवतील. जेंटलमेन लोकांची ही कॉलनी आहे."[४] असे पाठकच्या बायको संदर्भात म्हटले जाते. अविवाहित स्त्रीने संबंध ठेवले तर ते लोकांना चालतात परंतु विवाहीत स्त्रीने विवाहबाह्य संबंध ठेवले तर ते नियमाविरुद्ध असतात असे मानले जाते. आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याकारणाने पाठक व

पाठकच्या बायकोला हार खावी लागते. प्रत्येक व्यक्तीच आयुष्य परिस्थितीनुसार घडत असतं. स्त्रीला होणारा एकाकीपणा, स्त्री एकटी राहिल्या कारणाने तिच्यावर संशय घेतला जातो त्याचप्रमाणे स्त्रीवर झालेला अन्याय-अत्याचार, परिस्थिती चांगली नसल्या कारणाने स्त्रीला ठेवावे लागणारे विवाहबाह्य संबंध.

या सर्वांचे मेघना पेठेंनी उत्कृष्ट प्रमाणे आपल्या कथेत मांडणी केली आहे. व स्त्रीचे प्रश्न आपल्या कथातून मांडले आहे .या कथेतून स्त्री जाणीवा व्यक्त होताना दिसतात. कोल्ह्याचे लगीन या कथेमध्ये मंजुळाबाई नवरा कामाला न गेल्या कारणाने दुसऱ्यांच्या घरी भांडी घासायला जाते. नवरा अपंग असल्यामुळे तिला शरीर सुख मिळणार नाही याची जाणीव तिला असते. आर्थिक दृष्ट्या परिस्थिती चांगली नसल्याकारणाने तिला काम करावं लागतं. व ती अनिरुद्धाच्या घरी व दुसऱ्यांच्या घरी भांडी घासायला जाते. अनिरुद्धाच्या घरी तिला आपुलकी मिळते. तिला शरीर सुखाची आस असते व ती एक दिवस ब्ल्यू फिल्मच्या निमित्ताने एकत्र येतात. मंजुळाबाईला आशुतोषच्या स्पर्शाने पुरुषी वासना मिळते.

'होआवे लागे' या कथेमध्ये केसकर जी आहे ती कुरूप आहे. ती काळी असल्याकारणाने आईला सुद्धा ती नकोशी असणारी अशी मुलगी आहे. ऑफिस मधला वर्तक तिला कोकिळा म्हणतो परंतु ते ती स्वीकार करते कारण ती वर्तकामुळे गर्भवती असते हे जेव्हा वर्तकला कळत त्यावेळी तो हार्टअटॅक येऊन मरतो. ती एकटी पडते. शेवटी एका पायाने अपंग असलेला गिजरे तिच्याशी लग्न करायला व तिचं मूल स्वीकारायला तयार होतो.

'सि सॉ' या कथेमध्ये माई हे मुख्य पात्र. आई वडील नसल्याकारणाने ती मामांकडे राहते व मामाकडे राहिल्याने सगळ्यांना  सुख मिळत नाही. तिला आपले दुख कोणाला तरी सांगावेसे वाटते परंतु ती ते सांगू शकत नाही. लग्न झाल्यावर तरी तिला वाटतं की ती सुखात असणार परंतु लग्ना नंतर तिचा नवरा अमेरिकेला राहतो व तो माईला तिथे राहायला बोलावतो परंतु इथे नानाची तब्येत ठीक नसल्याकारणाने तिला इथेच राहावे लागते. व आयुष्यात सुख मिळण्यासाठी ती नानांना चार दिवस गोळ्या देत नाही व नानाचा मृत्यू होतो. तिला असं वाटतं की आता तरी तिच्या आयुष्यात सुख येणार परंतु तिला अशी बातमी ऐकायला येते की तिचा आशु मरण पावला आहे. तिच्या आयुष्यात कधीच सुख आलेला दिसूनच येत नाही.

स्त्रीला झालेल्या एकेकी पणाची जाणीव या कथेत आलेली आहे. लग्ना अगोदर किंवा लग्नानंतरही तिच्या आयुष्यात दुःखच दुःख आहे. मंजूच्या आयुष्याचे दुःखाचे  चित्रण मेघना पेठेनी उत्कृष्ट प्रमाणे या कथेत मांडलेले आहे.

'छाया माया काया' या कथेमध्ये विभा आहे ती सगळं सहन करून राहणारी आहे. विभाचा जो नवरा आहे तो त्याच्या चुलत बहिणीसोबत विवाहबाह्य संबंध ठेवतो. विभा सगळं सहन करून गप्प राहते. विभा एकटेपणा सहन करून राहते. विभाला झालेल्या एकटेपणाचे चित्रण या कथेत आलेले आहे. मुलं असून सुद्धा तिला कोणीच काही विचारत नाही सर्व आप-आपल्या कामात व्यस्त आहेत. विभाला झालेला एकटेपणा व तिला झालेले दुःख या कथेतून दिसून येते.

'अठरावा उंट' या कथेत सुद्धा स्त्रीला झालेले एकाकीपणा दिसून येते. नवऱ्याला आपली पत्नी पुढे यावी असं वाटत नाही. तो आपल्या पत्नीला वेळ तर देतच नाही. घरातला एक आपण पाळीव प्राणी आहे असं तिला वाटतं. ती आई वडिलांच्या इच्छेनुसार लग्न झालेली होती परंतु लग्न होऊन सुद्धा तिला एकाकी जीवन जगावं लागतं कारण कामामुळे नवरा बाहेर जातो. ती गर्भवती असते त्यावेळी सुद्धा तिचा नवरा तिला तिच्यासोबत नसतो. एक दिवस आबांनी तिला नाटकात काम करण्यासाठी संधी दिली जाते. सुजाता आघाडीची अभिनेत्री बनवून स्वतःला सिद्ध करते परंतु त्यावेळी संजीवला वाटतं की आताही मला सोडून जाईल की काय. शेवटी तिला असं वाटतं की ज्या दिवशी लग्नाला बारा वर्षे पूर्ण झाली म्हणून पार्टी दिली जाईल त्यावेळी मी सांगेन की हे लग्न मोडलं मला फुकटचा देखावा करायचा नाही. यावरून असं कळतं की तीने आई वडिलांच्या परवानगीनुसार लग्न केलं आहे आणि आता लग्न करून सुद्धा ती सुखी नाही म्हणून ती त्याच्यापासून सुद्धा दूर जाऊ इच्छिते. तिला एकाकीपणाची जाणीव होताना या कथेत दिसते.

'सहोदरा' ही कथा एका बहिणीने आपल्या भावाची सांगितलेली साहोदरा आहे. मध्यमवर्गीय कुटुंबात एका भाऊ आणि बहिणीला घरामधून दिलेल्या असमान वागणूकीचे चित्रण आहे. घरातील मुलालात वंशाचा दिवा असा मागवला जातो. या कथेमध्ये भाऊ आदीलला कायम वरचे स्थान आणि नायिकेला केला सतत दुय्यम स्थान असे चित्रण नायिकेने या कथेतून सांगितले आहे. मुलगी असली तर ती

फक्त घरातलं काम आणि मुलगा असला तर तो वंशाचा दिवा त्यांने कुठली चूक केली सुद्धा तर त्याकडे दुर्लक्ष केले जायचे अशी या कथेची मांडणी केली आहे.

मेघना पेठे यांच्या कथांमधून अनेक समस्याचे अत्यंत वास्तवदर्शी चित्रण झालेले आहे. मेघना पेठेंनी आपल्या कथांमधून मांडलेल्या समस्या या स्त्रीविषयक आहेत व अगदी सर्वसामान्य स्त्रीच्या समस्या आहेत. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीच्या वाट्याला येणारा अपमान, स्त्रीचे दुःख, शरीर सुखाच्या जाणिवा व गरजा, नातेसंबंधातून उभे राहणारे प्रश्न, आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याकारणाने स्त्रीला ठेवावे लागणारे विवाहबाह्य संबंध, स्त्रीला कुटुंबात मिळालेले स्थान या जीवनाच्या विविध पैलूंना स्पर्श करणारे चित्रण आपल्या कथेतून मेघना पेठेनी यांनी केलेले आहे. असमाधानी अशी मेघनापेठेच्या कथांमधील पात्रे आहे. त्यांच्या जीवनात समस्या आहे. स्त्रीच्या समस्या या व्यवहारिक जाणीव आणि पारंपारिक आहे त्याचप्रमाणे कधीकधी संवेदनशील मनाच्या कोपऱ्यात तळाशी आहे.

### ३.२ मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतील स्त्रीवाद व स्त्री जाणिवांचे स्वरूप

मोनिका गजेंद्र गडकर आपल्या कथेतून मानवी नात्यांचा वेगवेगळया शक्यतांचा शोध घेतात. मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथेतील पात्रे आहे ती वेगवेगळया स्वरूपाची, वेगवेगळया स्वभावाची, वैशिष्ट्यपूर्ण अशी आहे. स्त्रीचे जीवन, भावभावनांना मोनिका गजेंद्रगडकर आपल्या कथेतून मांडत आहे. शहरी परिसरात वावरणाऱ्या स्त्रीचे चित्रण ती आपल्या कथेतून करते. स्त्रीचे मानसिक व शारीरिक पातळीवरचे व्यवहार याचे चित्रण ती आपल्या कथेतून रेखाटतात. स्त्रियांचे प्रश्न, अडचणी, आपल्या कथांमधून मांडतात. शारीरिक गरजेमुळे निर्माण झालेले शरीर संबंध, मुलगीची आई  अनैतिक वागल्यामुळे घर  सोडणारी मुलगी, याचे चित्रण मोनिका गजेंद्र गडकर आपल्या कथांमध्ये करतात.

स्त्री जीवनाचे चित्रण बहुतांशी कथा मध्ये मोनिका गजेंद्रगडकर करतात. वेगवेगळी स्त्री रूपे म्हणजेच आई, बहीण, मुलगी, प्रेयसी याचे चित्र मोनिका गजेंद्र गडकर आपल्या कथन मध्ये रेखाटतात. स्त्री आपल्या नवऱ्याचे विवाहबाह्य संबंध सहन करते याचे चित्रण ती आपल्या कथांमधून करतात. उदा.

'देणं' या कथांमध्ये आलेली स्त्री आपल्या नवऱ्याचं विवाहबाह्य संबंध आहे हे माहित असून सुद्धा ती गप्प राहते. ती समजूदारपणे वागते. एका स्त्रीचा सोशिकपणा या कथेतून दिसून येतो. जन्म या कथेत सुद्धा जे नलूच्या बाबतीत घडतं तेच जन्म या कथेतील बाईच्या बाबतीत घडतं. सर्व गोष्टी माहित असून सुद्धा त्याच्या बद्दल वाच्यता संपूर्ण कथेमध्ये कुठेच केलेली नाही.

मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथा स्त्रीवादी नसून त्या कथामध्ये स्त्रियांना आलेले आत्मभान आले असुन कोणत्याही बाबतीत अपमान किंवा अन्याय सहन न करणाऱ्या अशा त्या आहेत. मोनिका गजेंद्रगडकरांच्या कथेत ज्या स्त्रिया आलेले आहेत त्या समजपणे जबाबदाऱ्या पेलणाऱ्या आहेत. स्त्रियांनी विचार न करताना घेतलेले निर्णय स्त्रियांच्या बऱ्याचवेळी  अंगलट ही येतात याचे चित्रण त्यांनी आपल्या कथांमधून केले आहेत. मुलगी असली तरी तिला मिळालेले कुटुंबामध्ये स्थान व आई-वडिलांमध्ये असलेले नाते याच्यात फरक असतो. भारतीय वंशाची मुलगी जेव्हा परदेशात जाऊन स्थिर होते व तेव्हा तिला झालेली परवड, तिच्या वाटेल वाटूयाला येणाऱ्या समस्या, तिचे एकाकीपण, आई-वडिलांच्या निर्णयाविरुद्ध जाऊन ती लग्न करणे याचे चित्रण मोनिका गजेंद्र गडकर आपल्या 'वंश' व 'अनोळखी' या दोन्ही कथांमध्ये केलेले आहे. वंश कथेमध्ये ज्योतिका जी असते तिला दोन पातळ्यांवर संघर्ष झालेला दिसून येतो. जेव्हा ज्योतिका आपल्या मुलाला परदेशातून भारतात घेऊन येते त्यावेळी तो मुलगा अमेरिकेतील हा वंश किंवा वंशद्वेषाचा विचार आपल्या मुलाच्या मनात येऊ नये म्हणून तिने केलेला संघर्ष व अखेरीस जेव्हा आपल्या मुलाला ती त्याच्या बापाला भेटवते त्यावेळी ज्याची भीती तिला होती तेच घडतं. जेव्हा ती त्याला आपल्या बाबांच्या घरी घेऊन जाते त्यावेळी तिचा मुलगा आपल्या बाबाच्या कुटुंबाला काही क्षणात आपलंसं वाटून घेतो. हा ज्योतिकाने केलेला दुसरा संघर्ष इथे दिसून येतो. ना या कथेमधील स्त्री जी आहे ती आईपासून दुरावलेली व तिच्या प्रेमासाठी आसुसलेली आहे. स्त्री म्हणून तिच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणारी व त्याचा सन्मान करणारी आहे. 'रेणू' या कथेमध्ये जी स्त्री आलेली आहे ती अन्यायाला तोंड देऊन स्त्री स्वातंत्र्याला पुरस्कार करणारी आहे. कुटुंबातील सर्वात जबाबदाऱ्या पेलणाऱ्या रेणूला मुलगी म्हणून कमी लेखले जाते. परंतु ती परिस्थितीवर मात करून जास्त काळ ते सहन करत नाही. स्त्रीला झालेले दुःख या कथेतून दिसून येते.

घरातील जबाबदाऱ्या पेलून सुद्धा रेणू मुलगी असल्या कारणाने तिला आई कमी लेखते याचे चित्रण या कथेमध्ये रेखाटलेले आहे.

मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथेतून प्रेयसीची विविध रूपे व्यक्त झालेली आहे. आधुनिक युगात प्रेम आणि नातेसंबंध ती फसवे झालेले आहे याचे याचे चित्रण निर्मला,वनिता, मालविका, अंजू, निर्मला, ज्योतीका, सायरा इत्यादी व्यक्तिचित्रणातून होतो. पुरुषांच्या प्रेमाच्या संकुचित विचारामुळे अन्यायित झालेली, प्रेमासाठी आसुसलेली, प्रेमातून विश्व निर्माण करणारी अशी स्त्रीपात्रे आलेली आहे. 'जन्म', 'अनोळखी' अशा वेगवेगळ्या कथांमधून असं दिसून येते की स्त्री लग्नाअगोदरच पुरुषाशी संबंध ठेवते व ती गर्भवती होते व ती गर्भपात न करता ती स्वतंत्रपणे त्या मुलाला मोठा करण्याचा निर्णय घेते. महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्या मुलाचा बाबा कोण हे माहीत नसताना सुद्धा ती आपल्या मुलाला जन्म देऊ इच्छिते. तीने घेतलेला हा निर्णय आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी असल्याकारणाने घेतलेला आहे. या तिन्ही कथेतील स्त्रिया ज्या आहेत त्या कोणाच्या दबावाखाली न राहता त्यांनी स्वतः निर्णय घेणाऱ्या आहेत. मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथा मधील पात्रे बंडखोरी, नियमांना झुंजारून देणाऱ्या अशी आहेत. स्वतंत्रपण जपू पाहणारी अशी ही स्त्री पात्रे आहेत.

मोनिका गजेंद्र गडकर यांच्या चारही कथासंग्रहात येणारी आई ही व्यक्तिरेखा कुटुंबात प्रमुख म्हणून येते. 'अनोळखी' या कथेमध्ये ताराबाई आपल्या मुलांना आपल्या कुटुंबाशी बांधून ठेवते. ताराबाई ची मुलगी अंजू ही देखील आईच आहे. फ्री रिलेशनशिप म्हणून ती आपल्या मित्रासोबत संबंध ठेवते. दोन पिढ्यात निर्माण होणारे अनैतिक संस्कृतिक अंतराचे चित्रण या कथेतून दिसून येते. स्वातंत्र्याच्या नावाखाली चाललेले लैंगिक विचार यातील पोकळपण याचे  चित्रण या कथेत केलेले आहे. परिस्थितीमुळे हतबल झालेली आई व पाश्चात्य संस्कृतीच्या दबावात आलेली निना याचे चित्रण आणि या कथेत आलेले आहे.

'नाळ' या कथेतील सुमित्रेला पत्नी म्हणून जो नवऱ्याकडून सहन करावा लागणारा शारीरिक व मानसिक अत्याचार  त्याचे वर्णन या कथेत आलेले आहे. यामुळेच ती पतीकडून दूर जाते परंतु तिला तिच्या मुलाकडून दुरावा सहन करावा लागतो व तो दुरावा कमी करण्यासाठी तिने केलेली खटपट , व मुलाच्या

प्रेमासाठी ती आसुसलेली याचे चित्रण मोनिका गडकरांनी केलेले आहे. अशाच प्रकारे मुलीचा अपघात झाल्यामुळे तिला गमावलेली अर्थ या कथेमधील वीणा. या दोन्ही कथेमध्ये आई म्हणून स्त्रीच्या वाट्याला आलेले दुःख सांगितलेले आहे. आपल्या प्रेमातून कुटुंब जोडणारी अशा आईचे या कथांमध्ये चित्रण आलेले आहे.

'श्रद्धा' या कथेमध्ये हिंदू यशोदा मुस्लिम सय्यदशी लग्न करते. तिचा मुलगा धर्माच्या कट्टर विचारांच्या आहारी जातो. या गोष्टी यशोदेला जाणवल्यावर ती त्याला अटकाव करते. ती सर्व सहन करून राहते परंतु जेव्हा परिस्थिती मर्यादेच्या बाहेर येते त्यावेळी ती घर सोडून जाते.

### ३.३ मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतील स्त्रीवाद व स्त्रीजाणीवांमध्ये साम्यभेद

मेघना पेठेनी स्त्रीयांना आलेल्या वेगवेगळया समस्यावर लेखन केलेले आहे. मेघना पेठेंच्या कथेतील स्त्रिया आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी आहेत. मेघना पेठेंच्या कथा स्त्रीला झालेल्या एकाकीपणेवर, स्त्रीला मिळालेले दुय्यम स्थान, शरीर सुखाची आस, कुटुंबापासून दुरावलेल्या, परिस्थितीने आलेली हतबलता, स्त्रीला आलेले प्रश्न, स्त्री पुरुषांमध्ये आलेले संघर्ष, मुक्त होण्याच्या आकांक्षा इत्यादी अशा वेगवेगळया विषयांवर त्यांनी आपल्या कथा रेखाटलेल्या आहेत. मोनिका गजेंद्र गडकर आपल्या कथांमधून स्त्रीचे प्रश्न मांडताना दिसतात. वेगवेगळया स्त्रीची रूपे मोनिका गजेंद्र गडकर आपल्या कथेंमधून करतात उदा. आई, बहीण, प्रेयसी, मुलगी.

मेघना पेठेंच्या कथांमध्ये ज्या स्त्रिया आलेल्या आहेत त्या परिस्थितीला हतबलता आल्यामुळे विवाहबाह्य संबंध ठेवताना दिसतात. परंतु मोनिका गजेंद्रगडकरी यांच्या कथांमध्ये ज्या स्त्रिया आलेल्या आहे त्या विवाहा अगोदर पुरुषाशी संबंध ठेवतात व गर्भवती होतात व जे त्यांच्या पोटात मूल असतं ते कोणाच असतं ते त्यांना माहीत नसतं तरी असताना त्या गर्भपात न करता मुलाला जन्म देऊ इच्छितात. मोनिका गजेंद्र गडकरांच्या कथांमध्ये महानगरातले वास्तव चित्रित केलेले आहे. पूर्वीच्या काळी जेव्हा स्त्री लग्न होण्या अगोदर गर्भवती व्हायची त्यावेळी अशा संबंधांना असनैतिक म्हटले जायचे व त्या स्त्रीला वाईट नजरेने

पाहिली जायचे. परंतु आता स्त्रीचा स्वतःकडे पाहण्याचा निर्णय बदलला आहे म्हणून त्या अशा निर्णयाकडे पोहोचू लागल्या आहेत.

मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथांमधून अनेक समस्यांचे वास्तवदर्शी चित्रण झालेले आहे. स्त्री विषयक समस्या त्यांनी आपल्या कथांमधून मांडलेल्या आहे. मेघना पेठे स्त्रीला केंद्रस्थानी ठेवून आपल्या कथा लिहितात तर मोनिका गजेंद्र गडकर ह्या स्त्री पुरुष नातेसंबंधाची चित्रण करताना दिसतात. स्त्री-पुरुषांना झालेल्या संघर्ष याचे उत्कृष्ट  चित्रण मोनिका गजेंद्र गडकर आपल्या कथांमध्ये करतात.

पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीच्या वाट्याला येणारे दुःख, स्त्रियांच्या गरजा त्यांच्या जाणीवा याचे उत्कृष्ट चित्रण मेघना पेठे आपल्या कथांमधून करतात. परिस्थितीत चांगली नसल्याकारणाने स्त्रीला ठेवावे लागणारे विवाहबाह्य संबंध व तिला सहन करावा लागणारा शारीरिक व मानसिक अत्याचार याचे चित्रण मेघना पेठे यांनी आपल्या कथांमधून केलेला आहे. मेघना पेठेच्या कथांमध्ये जी पात्रे आहेत ती असमाधानी अशी आहेत त्यांच्या जीवनामध्ये अनेक अशा समस्या येतात. आजूबाजूला अनेक लोक असून सुद्धा स्त्रीच्या वाट्याला येणारे एकटेपण हे मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथेचे वैशिष्ट्य आहे.

मेघना पेठेच्या कथातील स्त्री पात्रे आहेत ती वैचारिक दृष्ट्या ही स्वातंत्र्याला महत्त्व देणारी, सामाजिक वास्तव याचे भान असणारी, व बदलांना सामोरे जाणारी, स्वतःचे असे स्वतंत्र जपणारी अशी आहेत. त्याचप्रमाणे मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतील स्त्रीपात्रे प्रामाणिक राहून स्वतःचा असा सयंत सातत्याने जपणारी, वेगवेगळ्या अनुभवांना सामोरे जाणारी व जाणिवांची सूक्ष्म सखोल रूप शोधणारी अशी आहेत.

मेघना पेठेंच्या कथांमधील  स्त्रियांनी लग्न, संसार, मुले ही पारंपारिक चौकट मोडून आपल्या ठायी नांदणाऱ्या आदीम प्रेरणांना स्वीकारलेले आहे. तर मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथांमधून येणारे स्त्रिया कुटुंब संस्थेला एकत्रित बांधून ठेवताना दिसतात.

मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथा स्त्री पुरुष संबंधाच्या मीतित नाही तर स्त्री आणि धर्म, स्त्री आणि कला, स्त्री आणि तिचे शरीर, स्त्री आणि समाज यांच्यातील देखील  परस्पर नाते आहे. मोनिका गजेंद्र गडकर

यांच्या ‘भूप’ या कथासंग्रहातील कथा माणसांमधल्या नात्यांचा, त्यांच्या मानसिक आंदोलनांचा, अत्यंत तरलतेने वेध घेणाऱ्या आहेत. तर ‘आर्त’ या कथासंग्रहातील कथा अधिक सूक्ष्म, वैविध्यपूर्ण, प्रगल्भ, तितकेच अंतर्मुख करणाऱ्या अशा आहेत.

मानवी नातेसंबंधातही सतत झिरपत राहणारी एकटेपणाची जाणीव याचा शोध धिटाईने मेघना पेठेंनी शोध घेतलेला आहे. मेघना पेठे यांच्या कथांमध्ये पात्र शरीर मनाचा वेध घेणारी रोकठोक शैली वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

**समारोप**

स्त्रीयांच्या मानसिकतेमध्ये झालेले बदल अत्यंत व गर्दीतही स्त्रियांना झालेला एकाकीपणा याचे चित्रण मेघना पेठेंच्या कथांमध्ये झालेला आहे. मेघना पेठे यांच्या कथांमधून अनेक समस्याचे अत्यंत वास्तवदर्शी चित्रण झालेले आहे. मोनिका गजेंद्र गडकर आपल्या कथेतून मानवी नात्यांचा वेगवेगळया शक्यतांचा शोध घेतात. मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथेतील पात्रे वेगवेगळया स्वरूपाची, वेगवेगळया स्वभावाची आहे. स्त्रीचे जीवन, भावभावनांना मोनिका गजेंद्रगडकर आपल्या कथेतून मांडत आहे. महानगरीय जीवनाचे अत्यंत वास्तवदर्शी चित्रण मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर आपल्या कथन मधून करतात.

**निष्कर्ष**

१. मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथा स्त्रीवादी नसून त्या कथामध्ये स्त्रियांना आलेले आत्मभान, कोणत्याही बाबतीत अपमान किंवा अन्याय सहन न करणाऱ्या अशा आहे.
२. मेघना पेठेच्या कथा मध्ये स्त्रीच्या वाट्याला अनेक दुःखे आली असली तरी या दुखाला सामोरे जाऊन तक्रार न करता जीवन जगणारी अशी पात्रे आहे.
३. शरीर सुखाची गरज पूर्ण करत असताना ती मनाची मूलभूत गरज आहे ही वृत्ती मेघना पेठेंच्या कथातील व्यक्तीं रेखांमध्ये दिसते.
४. मेघना पेठेच्या कथातील स्त्री पात्रीची आहे ती वैचारिक दृष्ट्या ही स्वातंत्र्याला महत्त्व देणारी आहे.

**संदर्भ**


१. वरखेडे, मंगला : 'स्त्रीवादी समीक्षाः संकल्पना व उपयोजन' का.स.वाणी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, प्रथम आवृत्ती, १९९९, पृष्ठ क्र.१.

२. धोंगडे, आश्विनी : 'स्त्रीवादी समीक्षा संकल्पना आणि स्वरूप', दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९९३, पृष्ठ क्र. ३

३. पेठे मेघना 'हंस अकेला' प्रकाशक दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन प्रा. लि. १०२५, सदाशिव पेठ पुणे – ४११०३० फोन – (०२०) २४४७३४५९ फॅक्स : २४४३३७१९ E-mail : rajhansprakashan1@gmail.com Website : www.rajhansprakashan.com (पृ १८)

४. पेठे मेघना 'हंस अकेला' प्रकाशक दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन प्रा. लि. १०२५, सदाशिव पेठ पुणे – ४११०३० फोन – (०२०) २४४७३४५९ फॅक्स : २४४३३७१९ E-mail : rajhansprakashan1@gmail.com Website : www.rajhansprakashan.com. (पृ १८)

# प्रकरण ४

# मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेचे तौलनिक दृष्टीने भाषिक वैशिष्ट्यामधील साम्यभेद

# मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेचे तौलनिक दृष्टीने भाषिक वैशिष्ट्यामधील साम्यभेद

**प्रास्ताविक**

"मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर यांच्या लेखनातून दिसून येणारा स्त्रीवाद व स्त्री जाणिवांचा तौलनिक अभ्यास" या अनुषंगाने पूर्वी विचार केलेला आहे. मेघना पेठेनी व मोनिका गजेंद्र गडकरी यांनी "स्त्रीवादी जाणिवांचे"लेखन केलेले आढळते. मेघना पेठे यांच्या कथांमधून अनेक समस्याचे अत्यंत वास्तवदर्शी चित्रण झालेले आहेत. मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथा स्त्रीवादी नसून त्या कथामध्ये स्त्रियांना आलेले आत्मभान, कोणत्याही बाबतीत अपमान किंवा अन्याय सहन न करणाऱ्या अशा आहेत.

१९६० नंतर कथालेखन करणाऱ्या स्त्रिया म्हणजे मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर आहे. स्त्री-पुरुष नातेसंबंध याचे धाडसपणे वेध घेणाऱ्या त्यांच्या कथा आहे. स्त्रियांचे लेखन या कालखंडात वैशिष्ट्यपूर्ण आहेत. नवे विषय, स्त्री-पुरुष नाते संबंध, व कथेची मांडणी हे वैशिष्ट्य त्यांच्या लेखनातून दिसून येते. त्यामूळे वाचक त्यांच्या कथांकडे आत्कृष्ट होतो. मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर यांनी भिन्न भिन्न आशयाच्या वैशिष्ट्यपूर्ण कथा लिहिल्या. स्त्रीच्या वाट्याला येणारी अनेक दुखी असली तरी मेघना पेठेच्या कथांमधील पात्रे सामोरे जाऊन तक्रार न करता आपल आयुष्य जगताना दिसतात.

प्रस्तुत प्रकरणात मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेचे तौलनिक दृष्टीने भाषिक वैशिष्ट्यांमधील साम्यभेद करण्याचे ठरविले आहे. त्यामधे मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर कथेतील निवेदन शैली मधील साम्यभेद, मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतील भाषाशैली मधील साम्यभेद व  मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतील वातावरण निर्मितीमधील साम्यभेद करण्याचे ठरविले आहे.

**४. मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेचे तौलनिक दृष्टिने भाषिक वैशिष्ट्यामधील साम्यभेद.**

### ४.१ मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतील निवेदन शैलिमधील साम्यभेद

निवेदन हे वर्णन, भाषा, संवाद व कथन या घटकांमध्ये आकारलेले आहे. निवेदक हा पात्रांच्या वृत्तीचे, वातावरण प्रसंग अशा तपशिलाचे निवेदन करत असतो. यांना सुत्रबद्धरित्या जोडण्याचे काम होत असते. निवेदन पद्धती हे प्रामुख्याने दोन प्रकारे केले जाते. प्रथम पुरुषी निवेदन व तृतीय पुरुषी निवेदन. प्रथम पुरुषी निवेदनामध्ये मी च्या भाषेत निवेदन केले जाते व ते प्रथम पुरुषी असते कथेच्या बाहेरचे एखादे पात्र कल्पित करून ज्यावेळी निवेदन केले जाते त्याला तृतीय पुरुषी निवेदन असे म्हटले जाते. निवेदकाला सर्व माहित असतं त्यावेळी तो बारकाईने सांगत असतो त्याला तृतीय पुरुष निवेदन पद्धती म्हणतात. कथा निवेदक असतो तो पात्र प्रसंगाचे वर्णन करतो तर त्या प्रसंगाचे नाट्यात्मक दर्शन घडवितो व कधीकधी पत्राच्या अनुभवाचे कथन करतो. यादृष्टीने मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांनी आपल्या कथासंग्रहातून निवेदन शैलीचा कथांमध्ये कशाप्रकारे वापर केला आहे याचा साम्यभेद करावयाचा आहे.

निवेदनाच्या कार्या विषयी सुधा जोशी लिहितात की “निवेदकाच्या दृष्टिकोणामागे लेखकाचा विशिष्ट कलाहेतू असतो. या कलाहेतूनुसार लेखक, निवेदक पात्राच्या दृष्टिकोणातून कथात्म साहित्यकृतीतील घटनाप्रसंग, पात्रांच्या कृतिउक्ती इत्यादींची संघटना करीत असतो. एका अथनितत्त्वतः कथाकादंबरीतील समग्र भावविश्वाचे सूत्रचालन लेखक करीत असतो.”[१]

मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर यांनी आपल्या कथासंग्रहात दोन निवेदन पद्धतीचा वापर केलेला आहे. मेघना पेठे व मोनिका गडकर यांनी प्रथम पुरुषी निवेदन व तृतीय पुरुषी निवेदन पद्धतीचा वापर केलेला आहे. मेघना पेठेनी निवेदन पद्धतीमध्ये मी या शब्दाचा वापर करून निवेदन केले आहे तर कधी निवेदन करण्यासाठी एखादे पात्र निर्माण केले आहे. मोनिका गजेंद्र गडकर विविध घटनांना एकत्र करून निवेदना द्वारे कथेला एकसूत्रता प्राप्त करतात. कथेमध्ये घटनावरती त्या भाष्य करताना दिसतात. मेघना पेठेच्या लेखनाची शैली आशयानुसार निवेदनाचा वापर करताना दिसते.

मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथा मध्ये प्रथम पुरुषी व तृतीय पुरूषी निवेदन दोन्ही पद्धतीचा वापर झालेला आहे म्हणून निवेदनामध्ये वेगळेपणा दिसतो. मेघना पेठाच्या ‘समुद्र चाहूकडे पाणी’,

'एक ननैतिक बघ्या' व 'सहोदरा' या कथातून प्रथम पुरुषी निवेदनाचा वापर केलेला आहे. 'समुद्र चाहूकडे पाणी' या कथेतून आसपासचं वर्णन तपशील पणे केलेल दिसून येत त्यामुळे निवेदनाला चिंतनशीलता प्राप्त झालेली दिसून येते. 'एक ननैतिक बघ्या' या कथेमध्ये कुत्र्याला उद्देशून असलेले निवेदन संपूर्ण कथेमध्ये आढळते. उदा.

"सापडलास तेव्हा रस्त्याच्या कडेला भुकेला, मलुल पडून होतास. पिवळत रंगाचं हाडकलेलं केविलवाण पिल्लू."[२]

'सहोदरा' या कथेमध्ये विविध विचार रंग यावर लेखिकेने दृष्टीक्षेप टाकलेला आहे म्हणून प्रथम पुरुषी निवेदन पद्धतीचा वापर केलेला आहे. प्रमुख पात्राचा उपयोग मेघना पेठेनी केलेला आढळतो. वेगवेगळ्या भावभावना आणि जाणीवांचे शब्द रूप देण्यासाठी मेघना पेठेनी प्रथम पुरुष निवेदन पद्धति केलेली आहे. मोनिका गजेंद्र गडकर यांच्या श्रद्धा, संक्रमण, रूटस, अर्थ, वंश, फ्लेमिंगो, व्रण या कथा प्रथम पुरुषी निवेदन पद्धतीने आहे. श्रद्धा या कथेमध्ये आईच्या निवेदनातून दोन मुलांमध्ये होणारे बदलांचे चित्रण केलेले आहे. मोनिका गजेंद्र गडकर कथा लिहित असताना त्यांनी आईच्या माध्यमातून या कथेचे निवेदन केले आहे. ती एकाच घरात वाढणाऱ्या मुलाचे वर्णन करते पण त्याच्यात विरोधी स्वभाव विचार त्यांच्या जगण्यात आईला दिसून येणारे स्वभाव ती आईच्या माध्यमातून निवेदन करते. मोनिका गजेंद्र गडकर आपल्या कथेत प्रथम पुरुष निवेदन करते परंतु त्यांनी या कथेत संवादाचा वापर देखील केलेला आहे. परंतु त्या संक्रमण या कथेमध्ये संपूर्ण प्रथम पुरुषी निवेदन करते या कथेत रेणू ही एकटीच निवेदक आहे व ती कथा सांगते नात्यांमध्ये झालेले ताण-तणावती स्पष्ट करते. त्याचप्रमाणे रूटस या कथेमध्ये सुद्धा अशाच प्रकारचे प्रथम पुरुष निवेदन केलेले आहे. मेघना पेठेनी आपल्या कथेमध्ये एकाच पात्राच्या माध्यमातून प्रथम पुरुषी निवेदन केलेले आहे परंतु मोनिका गजेंद्र गडकर यांनी प्रथम पुरूषी निवेदन करत असताना काही वेळा संवादाचा सुद्धा वापर केलेला आहे. मोनिका गजेंद्रगडकर यांनी निवेदकाला बाजूला सारून 'सारांश' ही कथा स्पष्टीकरणात्मक लिहिली पाहिजे असे वाटते.

मेघना पेठेच्या ‘एक दिवस स्ट्र चा’, ‘कोल्ह्याचं लगीन’, ‘होआवे लागे’, ‘स्मरणाचा उत्सव जागून’, ‘सी सॉ’, ‘छाया माया काया’, ‘आए कुछ अब्र’, ‘अठरावा उंट’, ‘आस्था आणि गवारीची भाजी’, त्याचप्रमाणे मोनिका गजेंद्रगडकर यांच्या ‘देण’, ‘आधार’, ‘धर्म’ अशा काही कथांमधून तृतीय पुरुषी निवेदन शैलीचा वापर केलेला आहे.

मेघना पेठेच्या ‘एक दिवस स्ट्र चा’ या कथेत निवेदन करत असताना त्याचे वर्तमान काळ व भूतकाळ मागे पुढे होत राहते. या कथेमध्ये निवेदकाचे नाव काहीही असू परंतु त्याला त्यांनी स्ट्र असे म्हटले आहे. या कथेमध्ये निवेदक नाट्यसृष्टीत काम करणारा आहे. म्हणून त्यात नाटकाच्या संदर्भातील शब्दांचा वापर केलेला आहे ‘शिवाजी मंदिर’ ‘दीनानाथ’ अशा प्रकारचे निवेदन या कथेमध्ये केलेले आहे. ‘सी सॉ’ या कथेत आईच्या बालपणापासून ते वृद्ध वयापर्यंतचा प्रवास निवेदकाने साकारला आहे. ‘छाया माया काया’ या कथेचे निवेदन विभा या प्रमुख पात्राबरोबर इतरही व्यक्ती रेखाचे चित्रण येते. कथानकाचा अभिवाज्य भाग म्हणून या कथेचे निवेदन केलेले आहे. उद.

“ती आठवत राहिली. नाकातोंडात पाणी जात असताना वेडेवाकडे पाय मारीत, कधी रोरावत्या पाण्याबरोबर, कधी पाण्याविरुद्ध, कधी तरंगत, कधी पोहत अखेर एकदा किनाऱ्याला लागलेल्या माणसानं, काठावरून प्रवाह निरखावा, तसा अगीताचा मागोवा घेत राहिली.”[३]

‘अठरावा उंट’ या कथेतही मेघना पेठेनी तृतीयपुरुषी निवेदना बरोबर आत्मनिवेदनाचा वापर केलेला दिसून येतो. उदा.

“आपण ‘संजीव’शी लग्न केलं. संजीव नावाचं जे एक भलबुरं रसायन होतं, किंवा असेल असा आपला अंदाज होता त्याच्याशी”[४] अशा प्रकारे आत्मनिवेदनाचा वापर केलेला दिसतो.

अनिरुद्ध या व्यक्तिरेखाचा उपयोग करून मिथिलाच्या संदर्भातील घटनांचे निवेदन आस्था व गवारीची भाजी क्या कथेत केलेले आहे. उदा.

“सोबतीची भीती वाटते. सोबतीची सवय जडली तर... ती दारूच्याही पेक्षा जड जाईल सोडवायला.”[५]अशाप्रकारे मिथिलाचे एकटेपण व्यक्त करताना दिसते.

मोनिका गजेंद्र गडकर यांच्या 'देणं' या कथेमध्ये छोट्या प्रसंगावरचे निवेदन केलेले आहे.उदा.

"गजानन आणि निर्मला रिक्षा मिळेपर्यंत चालतच निघाले. काही ठिकाणी गडद झाडीमुळं वाटांचा अंदाजही येत नव्हता. त्या झाडीचा एक प्रकारचा हिरवा वास बटाटे उकडत लावल्यासारखा येत होता."[६] झाडीच्या वासाला बटाट्याची उपमा दिलेली आहे यावरून कळते कि ती गृहिणी आहे. त्याचप्रमाणे मोनिका गजेंद्रगडकर यांनी अर्थ या कथेतून मतिमंद मुलाचे चित्रण केलेले आहे. त्याच्या मानसिक अवस्थाचे चित्रण त्या करतात. त्यांच्या वागण्याचे शरीराचे चित्रण त्या तृतीय पुरुषी निवेदन पद्धतीतून करतात.

अशाप्रकारे मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांनी प्रथम पुरुषी व तृतीय पुरूषी निवेदन शैलीचा वापर आपल्या कथांमधून केलेला आहे. मेघना पेठेनी व मोनिका गजेंद्रगडकर यांनी मी या पात्राशी संबंध ठेवून लेखन केलेले आहेत तर कधी निवेदनासाठी एखाद्या पात्रांचा वापर केलेला आहे. मेघना पेठे यांनी कधी 'मी' शी निवेदन केले आहे. पात्रांच्या मनातील कोलाहल निवेदनातून अधिक स्पष्ट झालेली दिसते. सुखी दिसणारी पात्रे आतून किती एकटी असतात ती निवेदनाच्या माध्यमातून आपल्याला स्पष्ट होते. मेघना पेठेनी निवेदनासाठी प्रमाण भाषेचा वापर केलेला आहे परंतु त्यात हिंदी मराठी शब्दांचा वापर झालेला आहे. मेघना पेठेच्या कथा मधून काव्यमय निवेदन केलेले दिसून येते. मेघना पेठेच्या कथा खोलवर विचार करणाऱ्या आहे. परंतु मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथातील निवेदन एक मार्ग आहे.

## ४.२ मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथेतील भाषा शैलीमधील साम्यभेद

कथेमध्ये भाषा ही महत्वाची असते. परिचय करून देणे, कथानक प्रवाहित ठेवणे, सरळ भाषेत आपला आशय व्यक्त करणे हे भाषेतून साधले जाते. नवीनता आणण्यासाठी लेखक प्रयोग करत असतो.भाषेत येणाऱ्या नावीन्यतेची कारणमीमांसा करताना भालचंद्र नेमाडे म्हणतात, "भाषेत उपलब्ध असलेली निरनिराळ्या बोलीभाषांमधील रूपे, परक्या भाषांतून उसनी घेतलेली रूपे जुन्या काळात वापरली गेलेली, पण नंतर वापरातून नाहिशी झालेली रूपे, व्याकरणाचे नियम बाजूला सारून नव्याने बनवलेली रूपे, ह्या सर्व प्रकारांनी साहित्याच्या भाषेला नवता आणता येते."[७] नवीनपणा आणण्यासाठी लेखक भाषेची

मोडतोड करत असतो. कलाकार कथा लेखनासाठी विशिष्ट भाषेची निवड करत असतो. व तो त्याचप्रमाणे विशिष्ट रीतीने भाषेचा वापर करत असतो.

मेघना पेठेच्या कथेमधील भाषा ही प्रमाणभाषा आहे त्यामध्ये इंग्रजी, हिंदी भाषेचा वापर केलेला आहे. आटोपशीर असं कथेचा भाषिक अवकाश असतो. विशिष्ट भाषा रूपाची निवड कथा विश्वाच्या निर्मितीसाठी केली जाते. विशिष्ट रीतीने भाषेचा वापर केला जातो. मेघना पेठे प्रमाणेच मोनिका गजेंद्रगडकरांनी आपल्या कथेतून जास्त प्रमाणात हिंदी व इंग्रजी भाषेचा वापर केलेला दिसून येतो. मेघना पेठेंनी काव्यमय व नाट्यमय व सहज सोप्या भाषेत निवेदन केलेले आहे. व हे त्यांच्या कथालेखनाचे वैशिष्ट्य म्हणता येईल. लेखकाला हवा असलेला आशय व्यक्त करण्यासाठी भाषेची योजना जाणीवपूर्वक लेखक करत असतो. स्वतःच्या अनुभवातून लेखक स्वतःची अशी भाषा निर्माण करत असतो. भावनिक विश्व उलगडून दाखविणे या घटकांमधून लेखक प्रयत्न करत असतो व ते लेखकाने योजिलेल्या भाषेवर अवलंबून असते. सुसंगत भाषेचा वापर केल्याने कथाही परिणामकारक ठरते भाषेचा विचारपूर्वक वापर केलेला मेघना पेठेच्या कथा मधून दिसून येतो. त्यांनी खास भाषा वापरून कथालेखन केलेले आहे. मेघना पेठे म्हणतात, “आता आशयच अगदी निराळा आहे तर त्यानं आपला वेगळा आवाज शोधला, वेगळी लय शोधली, वेगळा पोत शोधला तर ते आवश्यकच आहे. पण तो काही प्रयोग करायचा म्हणून नाही ते आपलं आपण सगळ जमून आलय.”[८] कथेच्या आशयामध्ये वेगळेपणा असल्यामुळे भाषेचा वैविध्यपूर्ण वापर मेघना पेठेंनी केलेला आहे. मेघना पेठेंनी परकीय शब्दांचा वापर करून त्यांच्या लेखनामध्ये नवीनपणा आणलेला आहे. उदा.

‘चार्नी रोडला क्रीम सेंटरमध्ये लस्सी पिताना ही मिथिला पी. जे. सांगत हसत होती. पण बिल देऊन निघताना तिनं आपली बाही खेचून, पुन्हा आपल्याला बसवलं आणि म्हणाली, “मी सहसंपादक झाले अन्या. Do you think this is success?’

“yes, of coures… sort of… if you think so….” आपण प्रामाणिकपणे तिला सांगितलं. “You won’t hold it against me?”[९] अशी मेघना पेठेनी इंग्रजी व मराठी मिश्रित भाषा त्यांनी वापरलेली

आहे. उर्दू गझलांचा वापर सुद्धा मेघना पेठेंनी आपल्या कथामध्ये केलेला आहे."अब न वो मै हूँ, न वो तू है, न वो माजी है फराज जैसे दो साए तमन्ना के सराबोंमे मिलें"[१०] प्रियंकवदाच्या आयुष्यातील एकाकीपणा त्यांनी या गझलातून अभिव्यक्त केलेला आहे.

मोनिका गजेंद्रगडकर यांनी भूप, आर्त, शिल्प, त्रीपर्ण कथासंग्रहात त्यांनी साध्या सोप्या भाषेचा वापर केलेला आहे. त्रिपर्ण या कथासंग्रहात त्यांनी परदेशाचे चित्रण केलेले आहे. भूप या कथासंग्रहात तुटकपणे वावरणाऱ्या व्यक्तिरेखा उभ्या करण्यासाठी मोनिका गजेंद्र गडकरांनी त्याच प्रकारचे संवाद व निवेदन तंत्र वापलेले दिसते. उदा.

"मेरी फार तुटक आहे- कोरडी. बाई असूनही ओलावा नाही तिच्यात. मला सारखा आधार हवा असायचा लहानसहान गोष्टींतही, आणि ती तटस्थ असायची. साधं-साधंही आमचं जमायचं नाही. अखेर संपवून टाकलं तिने मी...." श्रीदादा थांबतच नव्हता बोलायचा. मला आता जरा भीती वाटू लागली त्याची. परत याला डिप्रेशनचा ॲटॅक तर येणार नाही?

"श्रीदादा"[११]

आर्त या कथासंग्रहात संगीत क्षेत्रातील कुचबलेल्या व्यक्तिरेखा त्यात येतात. या कथासंग्रहाचे सुद्धा त्याचप्रमाणे संवाद व निवेदनातून वेगळेपण दिसतो. मोनिका गजेंद्रगडकर आपल्या कथातून अनुभवांना भिडणारी, अर्थवाही भाषा त्या वापरतात. उदा.

"देवूऽ...ऐक... मी...मा... मा...तुला... तुला पेढा देऊ?"[१२]

"नाही...न...नऽ को... नको..आई..."[१३]

"आज नंदलाल सखी। प्रेम मादक पिये

संग ललना लिये। जमुना तीर रे चरन

फूली केसर कमल। मालती सघन बन

मंद सुगंध सीतल। समीरे बरन..."[१४](१२८)

"इतने जो बन पर मान न करिये

डरिये प्रभुसे आज आली

जो कोई आवै अपने घरवा

थासो गरव न किजिए..."[१५](१५१)

"या शरीराचा होत गेलेला हा अंधार...

ठिबकत आहेत थेंब त्यातून काळयाच अश्रूचे

लिंपलेल्या उद्ध्वस्तपणाच्या भिंतींना तडे पडून

मनातले एकटेपणाचे कढ बाहेर येतायत तेही काळोखाचेच...

अंधारा एकटेपणा? की एकटेपणाचाच हा घनदाट काळोख."[१६]

मोनिका गजेंद्रगडकर यांनी कथांमध्ये इंग्रजी वाक्यांचा वापर देखील केला आहे. उदा.

"Oh! What is this? So many gifts?"

"This is Dad's world, Now Dad is with me."

"Yes dear! That's great!" जेसीने तिचा अंगठा वर केला.

And Mama...one more thing I want to tell you, I gave promise to Aaji and Ajoba..."[१७]

Your missing Dad? Is it?"[१८]

एकंदरीत भाषाशैलीचा विचार केला तर मेघना पेठेंनी प्रमाण मराठी भाषा वापरलेली आहे व ती वाचकाला प्रभावी वाटते. त्यांनी काव्यात्मक दृष्टीने माणसाच्या एकटेपणावर लेखन केले आहे. मेघना पेठेंच्या लेखनात महानगरीय जीवनातली भाषा वापरलेली आहे व त्याचप्रमाणे उर्दू गझलांचा देखील वापर

केलेला आहे. मोनिका गजेंद्रगडकर यांनी एकदम साधी सोपी भाषा वापरलेली आहे व त्यांनी सर्वसामान्य वाचकांना समजणार एवढ्या सोप्या भाषेतून लेखन केलेले आहे. मोनिका गजेंद्र गडकर यांचा त्रिपर्ण हा कथासंग्रह परदेशातले चित्रण करणारा आहे. मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथांमधून महानगरीय जाणिवा दिसून येतात व त्याचप्रमाणे महानगरीय देशातले शब्द त्यांच्या लेखनातून दिसून येतात.

**४.३ मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथेतील वातावरण निर्मितीतील साम्य भेद**

वातावरण निर्मिती म्हणजे प्रसंगानुरुप परिस्थितीचे वर्णन करणे. उदा. सजावट, सनई इत्यादी.विशिष्ट भौगोलिक, सांस्कृतिक व सामाजिक परिसरात कथा ही घडत असते. यामुळेच वातावरण निर्माण होत असते. पात्र निर्मितीसाठी वातावरण हे गरजेचे ठरत असते. मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेत महानगरीय वातावरण चित्रित झालेले आहे. आशयाशी महानगरीय वातावरणाचा सहसंबंध जोडलेला आहे. मेघना पेठेच्या कथातून महानगरीय वातावरण पुढील प्रमाणे व्यक्त होताना दिसते.उदा.

"चौदाव्या मजल्यावरून लॉंग शॉटमध्ये दिसणारा समुद्रकिनारा, नि त्यावरून सरकणारी टिंबासारखी माणसं, सोंगट्यासारखी वाहनांची रांग, जाहिरातींचे लाल, पिवळे, निळे बोर्ड, जणू निरनिराळ्या रंगाच्या ज्वाळांनी त्याला वेढल आहे."[१८]महानगरीय गर्दीमध्ये माणसं 'टिंबासारखी' म्हणजेच शुल्लक आशी वाटतात. एका माणसाचे दुसऱ्या माणसाशी असलेले यंत्रवत नाते अप्रत्यक्षरीत्या शब्दबद्ध झालेली दिसते. मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर यांच्या लेखनातून वातावरण निर्मितीचे वर्णन करत असताना महानगरीय वातावरण दिसून येते.

मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर कथा लेखनामध्ये भाषेचे व शहरी वातावरणाचे नाते दिसून येते. शहरातील रस्ते, समुद्रकिनारे, वाहने, चाळी, बहुमजली घर, विद्यापीठ, मोठमोठ्या कंपन्या, याचे चित्रण आलेले दिसून येते.उदा.

"एकदा पाच पंचवीसची विरार चुकली, की झालं.... बट्ट्याबोळ ! पुढे सतरा मिनिटं गाडीच नव्हती आणि नंतरची गाडी म्हणजे... किडामुंगीसारखी माणसं जमतात तिच्यासाठी."[१९]

"केवढी, किती वाहनं... त्यांचे आकार नि आवाज... त्या वाहनांतली नि रस्त्यावरची किती किती तरीच माणसं.... त्यांचे रंग, कपडे, चेहरे, शैली, वेग आणि हेतू... प्रत्येकाचा निराळा... डोळ्यापुढे सतत बदलतं, गतिमान चित्र."[२०]

महानगरातली गर्दी आणि वाहनांचे वेगवेगळे आवाज ऐकून गजबजणारे वाटले असले तरी प्रत्येक माणूस किंवा प्रत्येक माणसाचा विचार दुसऱ्या माणसापेक्षा वेगळा असतो.

मोनिका गजेंद्रगडकरांनी उत्तम प्रमाणे आपल्या कथांमधून वातावरणनिर्मिती साधली आहे. निसर्ग, त्याचे रंग, झाडं पानं-फुलं, आणि संगीत यांचे तपशील, माणूस, त्याचा परिसर हॉस्पिटल, घरं, समारंभ, या सगळयांच्या वर्णनात अस्सलता आहे. थेट अभिव्यक्ती आणि अलंकारणाचा मुळीच सोस न बाळगणारी भाषा कथांच्या आशयाचा सांभाळ करणारी आहे.

व्यक्तीच्या भोवतालची सामाजिक पार्श्वभूमी बदलल्यामुळे त्याच्या जीवनात कसा बदल होतो याचे चित्रण मेघना पेठेंच्या 'एक ननैतिक बघ्या' या कथेमध्ये आलेले आहे. नाट्यसृष्टीचे वातावरण 'एक दिवस स्ट्र चा' या कथेमध्ये आलेले आहे. पती-पत्नी मधील संघर्षाचे वातावरण 'अठरावा उंट' या कथेमध्ये आलेले आहे. मेघना पेठेच्या कथांमध्ये जास्तीत जास्त महानगरीय जीवनाचे वातावरण आलेले आहे. मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथांमध्ये परदेशाचे चित्रण आलेले आहे त्याचप्रमाणे नातेसंबंधाचे, धर्माचे इत्यादी विषयांचे चित्रण आलेले आहे. मोनिका गजेंद्र गडकरांनी परदेशात राहून तिथले वातावरण पाहून त्यांनी 'त्रीपर्ण' हा कथासंग्रह लिहिला आहे. मेघना पेठे व मोनिका गजेंद्र कडकर या आधुनिक काळातल्या लेखिका असल्यामुळे त्यांच्या कथांमधून जास्तीत जास्त प्रमाणात महानगरीय जीवनाचे वातावरण दिसून येते.

मेघना पेठे यांच्या कथालेखनातील भाषेचे आणि शहरी वातावरणाचे अविभाज्य नाते आहे. वातावरण निर्मितीमागे कलावंताची वेगळी दृष्टी असल्यामुळे हेतूनुरूप निर्मिती झालेली असते.मेघना पेठे यांच्या कथालेखनातील भाषेचे आणि शहरी वातावरणाचे अविभाज्य नाते आहे. मोनिका गजेंद्रगडकर

यांच्या कथांमध्ये उत्तम वातावरणनिर्मिती साधली आहे. निसर्ग, त्याचे रंग, झाडं पानं-फुलं, आणि संगीत यांचे तपशील, माणूस, त्याचा परिसर हॉस्पिटल, घरं, समारंभ, या सगळयांच्या वर्णनात अस्सलता आहे.

**समारोप**

मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतील वैशिष्ट्य म्हणत असताना कथेचे आकृतीबंध हे महत्त्वाचे ठरते. त्यांच्या कथा या सुरुवात मध्य व शेवट अशा पद्धतीने केलेल्या आहे. शेवट हा काही वेळा कथेच्या सुरुवातीला येतो.उदा. संक्रमण. मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांनी महानगरीय जीवन आपल्या कथांतून मांडलेले आहे. मेघना पेठेच्या काही कथा दीर्घ आहेत परंतु मोनिका गजेंद्र गडकरांच्या जास्तीत जास्त कथा दीर्घ स्वरूपाच्या आहेत. त्यांच्या कथा महानगरीय वातावरणाचा आकार घेते. मेघना पेठेच्या कथांमध्ये काव्यात्मकता आलेली आहे. मेघना पेठेच्या कथांची शीर्षके वेगळी असली  तरी कथा स्पष्ट होते. मोनिका गजेंद्र गडकऱ्यांच्या कथा सरळ आणि सोप्या भाषेत आहेत व वाचकाला आकर्षित करणाऱ्या अशा आहेत.

**निष्कर्ष**

1. मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथांमध्ये महानगरीय जीवनाची पार्श्वभूमी त्यांच्या लेखनात दिसते.
2. महानगरातील कुटुंब संस्थातील वास्तव मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर आपल्या कथांमधून स्पष्ट करताना दिसतात.
3. कथानक, व्यक्तिरेखा, निवेदन, वातावरण या मूल घटकाच्या सहाय्याने मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकरानी आपल्या कथा लिहिलेले आहे.
4. कुटुंबापासून तुटलेल्या व्यक्ती रेखांचे चित्रण मेघना पेठेनी केलेले आहे तर मोनिका गजेंद्रगडकरांनी कुटुंब व्यवस्थेतले नातेसंबंधाचे चित्रण केलेले आहे.

**संदर्भ**

१.	जोशी सुधा २००० कथा: संकल्पना व समीक्षा, मुंबई मौज प्रकाशन

२. पेठे मेघना ‘आंधळयाच्या गायी’ प्रकाशक दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन १०२५, सदाशिव पेठ पुणे- ४११०३०.(पृष्ठ १)

३. पेठे मेघना ‘हंस अकेला’ प्रकाशक दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन प्रा. लि. १०२५, सदाशिव पेठ पुणे – ४११०३० फोन – (०२०) २४४७३४५९ फॅक्स : २४४३३७१९ E-mail : rajhansprakashan1@gmail.com Website : www.rajhansprakashan.com (‘हंस अकेला’, (पृ. १५२)

४. पेठे मेघना ‘आंधळयाच्या गायी’ प्रकाशक दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन १०२५, सदाशिव पेठ पुणे- ४११०३० (पृ. ५४)

५. पेठे मेघना ‘आंधळयाच्या गायी’ प्रकाशक दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन १०२५, सदाशिव पेठ पुणे- ४११०३० (पृ.११५)

६. गजेंद्रगडकर मोनिका ‘भूप’ प्रकाशक संजय वि० भागवत, मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, गिरगाव, मुंबई ४०० ००४ (पृ.११)

७. नेमाडे भालचंद्र ‘ साहित्याची भाषा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद दि आ १९९८ पृ १७

८. पेठे मेघना : ‘लिहिणं ही माझी आंतररिक गरज आहे’, ‘दर्शन’ दिवाळी २००५, पृ. ८६. मुलाखतकार – राजू देसले.

९. पेठे मेघना ‘आंधळयाच्या गायी’ प्रकाशक दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन १०२५, सदाशिव पेठ पुणे- ४११०३० ( पृ. १४०)

१०. पेठे मेघना ‘हंस अकेला’ प्रकाशक दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन प्रा. लि. १०२५, सदाशिव पेठ पुणे – ४११०३० फोन – (०२०) २४४७३४५९ फॅक्स : २४४३३७१९ E-mail : rajhansprakashan1@gmail.com Website : www.rajhansprakashan.com (पृ. ४०)

११. गजेंद्रगडकर मोनिका ‘भूप’ प्रकाशक संजय वि० भागवत, मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, गिरगाव, ममुंबई ४०० ००४ (पृ.७९)

१२. गजेंद्रगडकर मोनिका 'आर्त' प्रकाशक संजय वि० भागवत मौज प्रकाशन गृह खटाववाडी, गिरगाव मुंबई ४००००४ (पृ ८०)

१३. गजेंद्रगडकर मोनिका 'आर्त' प्रकाशक संजय वि० भागवत मौज प्रकाशन गृह खटाववाडी, गिरगाव मुंबई ४००००४ (पृ ८०)

१४. गजेंद्रगडकर मोनिका 'भूप' प्रकाशक संजय वि० भागवत, मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, गिरगाव, मुंबई ४०० ००४ (पृ १२८)

१५. गजेंद्रगडकर मोनिका 'भूप' प्रकाशक संजय वि० भागवत, मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, गिरगाव, मुंबई ४०० ००४ (पृ. १५१)

१६. गजेंद्रगडकर मोनिका 'त्रिपर्ण' प्रकशक/मुद्रक मौज प्रकाशन गृह युनिट नं.५,७,८, पहिला मजला, म्युनिसिपल इंडस्ट्रिअल इस्टेट, वी. पी. रोड, विलेपार्ले (प.), मुंबई ४०००५६ ईमेल: moujprakashan@gmail.com (पृ.१०३)

१७. गजेंद्रगडकर मोनिका 'त्रिपर्ण' प्रकशक/मुद्रक मौज प्रकाशन गृह युनिट नं.५,७,८, पहिला मजला, म्युनिसिपल इंडस्ट्रिअल इस्टेट, वी. पी. रोड, विलेपार्ले (प.), मुंबई ४०००५६ ईमेल: moujprakashan@gmail.com (पृ.८१)

१८. गजेंद्रगडकर मोनिका 'त्रिपर्ण' प्रकशक/मुद्रक मौज प्रकाशन गृह युनिट नं.५,७,८, पहिला मजला, म्युनिसिपल इंडस्ट्रिअल इस्टेट, वी. पी. रोड, विलेपार्ले (प.), मुंबई ४०००५६ ईमेल: moujprakashan@gmail.com (पृ.६५)

१९. पेठे मेघना 'आंधळयाच्या गायी' प्रकाशक दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन १०२५, सदाशिव पेठ पुणे- ४११०३० (पृ.११९)

२०. पेठे मेघना 'हंस अकेला' प्रकाशक दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन प्रा. लि. १०२५, सदाशिव पेठ पुणे – ४११०३० फोन – (०२०) २४४७३४५९ फॅक्स : २४४३३७१९ E-mail : rajhansprakashan1@gmail.com Website : www.rajhansprakashan.com (पृ. १२३)

# प्रकरण ५

# निष्कर्ष समारोप

# निष्कर्ष समारोप

## समारोप

प्रस्तुत अभ्यासात “मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथांचा तौलनिक अभ्यास” वरील चार प्रकरणांमधून करण्यात आलेला आहे. पहिल्या प्रकरणामध्ये तौलनिक साहित्याभ्यासाची संकल्पना व स्वरूप स्पष्ट केले आहे. संकल्पना व स्वरूप स्पष्ट करत असताना त्यामध्ये तौलनिक साहित्याभ्यासाचा इतिहास स्पष्ट करून तौलनिक साहित्याभ्यास संदर्भात वेगवेगळे संप्रदाय सांगितले आहेत.त्याचप्रमाणे तौलनिक साहित्याच्या वेगवेगळ्या व्याख्या सांगून तौलनिक साहित्याभ्यास वेगवेगळ्या मुद्द्यांच्या आधारे कसा केला जातो हे स्पष्ट केले आहे .अशा प्रकारे उपप्रकार तयार करून तौलनिक साहित्याभ्यासा विषयी पहिल्या प्रकरणाची मांडणी केलेली आहे.

दुसऱ्या प्रकरणांमध्ये ‘मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथांचा आशयनिष्ट तौलनिक अभ्यास’ करण्यात आलेला आहे. मेघना पेठे यांच्या कथांचा आशय स्पष्ट करत असताना वेगवेगळ्या मुद्द्यांच्या आधारे  आशय मांडण्यात आलेला आहे. उदा. एकटेपणाची जाणीव, स्त्रीचे दुय्यम स्थान, घरापासून दुरावलेली, कुरूप दिसणाऱ्या स्त्रिया, मानवी सहवासाची आस,शरीर सुखाची आस. व त्याचप्रमाणे स्त्री-पुरुष नातेसंबंधाचे चित्रण व समाज वास्तवाचा  वेध घेण्यात आलेला आहे. मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथाचा आशय स्पष्ट करत असताना सुद्धा वेगवेगळ्या मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करण्यात आलेला आहे. उदा. स्त्रीला झालेली कुचंबणा व कुटुंब जीवनाचे चित्रण. त्याचप्रमाणे स्त्री पुरुष नातेसंबंधाचे चित्रण व समाज वास्तवाचा वेध घेण्यात आलेला आहे. शेवटी मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर या दोन्ही कथांच्या आशयाचा साम्य भेद, स्त्री-पुरुष नाते संबंधातील चित्रणात साम्य भेद व कथेमधील समाजवास्तव चित्रणामधील साम्य भेद केलेला आहे.

तिसऱ्या प्रकरणात ‘मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या लेखनातून दिसून येणारा स्त्रीवाद व स्त्री जाणिवांचा तौलनिक अभ्यास’ करण्यात आलेला आहे. या प्रकरणांमध्ये मेघना पेठे यांच्या कथातून दिसून येणारा स्त्रीवाद व स्त्री जाणीवा व मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथांतून दिसून येणारा स्त्रीवाद व स्त्री

जाणिवा व शेवटी मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर या दोन्ही लेखिकांच्या कथातून दिसून येणारा स्त्रीवाद व स्त्री जाणिवा मध्ये साम्यभेद केलेला आहे.

चौथ्या प्रकरणात 'मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेचे तौलनिक दृष्टीने भाषिक वैशिष्ट्या मधील साम्य भेद' करण्यात आलेला आहे. या प्रकरणांमध्ये मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतील निवेदन शैलीमध्ये साम्य भेद, भाषाशैली मधील साम्यभेद व वातावरण निर्मितीतील साम्यभेद करण्यात आलेला आहे. पाचव्या प्रकरणात समारोप व निष्कर्ष मांडण्यात आलेला आहेत. मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर या साठोत्तरी काळातल्या महत्त्वाच्या लेखिका आहेत. मेघना पेठेच्या कथांचा अभ्यास करत असताना हंस अकेला व आंधळयांच्या गाई या कथासंग्रहांचा आधार घेतलेला आहे व मोनिका गजेंद्रगडकर या लेखिकाच्या कथांचा अभ्यास करत असताना भूप, आर्त, शिल्प व त्रीपर्ण या कथा संग्रहाचा आधार घेतलेला आहे. १९६० नंतरच्या कालखंडात मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकरांनी कथालेखन केलेले आहे व त्या महत्त्वाच्या लेखिका आहे. या कथा लेखिकांनी स्त्री प्रश्नांचा वेध घेतलेला आहे.

**निष्कर्ष**

1. मेघना पेठेंनी हंस अकेला, आंधळयांच्या गाई हे दोन कथासंग्रह व नातीचरामी ही कादंबरी लिहिली आहे. त्याचबरोबर त्यांनी एकांकिका, कविता असे अनेक साहित्याचे प्रकार हाताळलेले आहेत.
2. मोनिका गजेंद्रगडकर यांनी भूप, आर्त, शिल्प व त्रिपर्ण हे चार कथासंग्रह , उगम कादंबरी व शब्दांचा झुला ललित लेख हे साहित्यप्रकार लिहिले आहेत.
3. आधुनिक काळातील एक महत्त्वाची अभ्यास पद्धती म्हणून तौलनिक साहित्याभ्यासाकडे पाहिले जाते.
4. तौलनिक साहित्य म्हणजे एका पेक्षा अधिक साहित्याची कालखंडाच्या आधारे, विषयाच्या आधारे, शैलीच्या आधारे, आशयाच्या आधारे, कथानकाच्या आधारे करण्यात येणारी तुलना.

5. प्रस्तुत अभ्यासात मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथांचा तौलनिक अभ्यास केला आहे.
6. मध्यमवर्गीय जीवनातील माणसांना होणारा ताण-टणाव व त्यामुळे नातेसंबंधांमध्ये होणारा दुरावा याचे चित्रण मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांनी आपल्या कथांमधून केलेले आहे.
7. समकालीन कालखंडातल्या स्त्रिया कथा हा साहित्यप्रकार कसा हाताळतात याचा अभ्यास केला आहे.
8. वर वरच्या समाधानाने वाट्याला आलेला एकाकीपण व निमूटपणे जगणारी माणसं याचे चित्रण मेघना पेठेंनी आपल्या कथन मधून केलेले आहे . उदा.' छाया माया काया' या कथा कथेमधील विभा. भौतिक सुखात राहूनही मानवाची असलेली एकाकीपणा या कथेमधून दिसून येते. एकाकीपणाची जाणीव हे मेघना पेठेंच्या कथाचे महत्त्वाचे असे सूत्र आहे.
9. पुरुषप्रधान संस्थेमुळे स्त्रीला पुढे येऊ दिले जात नाही. 'अठरावा उंट' या कथेमध्ये सुजाताला नाट्य अभिनय करण्याचे गुण असूनही तिला घरी बसवले जायचे कारण पुरुषांना स्त्री ही पुढे गेलीच नको असते. मेघना पीठे यांच्या कथांमधून 'स्त्रीचे दुय्यम स्थान' हे आशय सूत्र महत्त्वाचे ठरते.
10. मेघना पेठेंच्या कथांमध्ये काही पात्रे घरापासून दुरावलेली आहेत. आपलं नाटकामध्ये नाव करण्यासाठी, वडिलांचे विचार न पटल्यामुळे, अशा वेगवेगळया कारणांमुळे घरापासून दुरावलेली अशी पात्रे मेघना पेठेंच्या कथांमध्ये आलेली आहे. घरापासून दुरावलेली हे सुद्धा महत्त्वाचे असे आशयसूत्र मेघना पेठेंच्या कथांमधून दिसून येतात.
11. अन्न, वस्त्र, निवारा याचबरोबर "शरीर सुखाची आस" ही सुद्धा मानवाची मूलभूत गरज आहे. ही सहज प्रवृत्ती आहे. 'समुद्र चाहूकडे पाणी',' छाया माया काया'अशा अनेक कथांमधून स्त्रीला पुरुषी अंगाचे आकर्षण झालेले दिसून येते. मेघना पेठे यांच्या बहुतांशी कथा "शरीर सुखाची आस" या आशय सूत्रावर आधारलेल्या आहे.
12. स्त्री पुरुष नातेसंबंधाची चित्रण करत असताना मेघना पेठे पती-पत्नीच्या संघर्षाचे चित्रण करत नाही तर भाऊ बहिणीच्या संघर्षाचे देखील चित्रण करताना दिसतात.

13. बहुतांशी कथा लेखिकांनी आपण स्त्री आहोत या जाणिवेतून कथा लिहिली आहे परंतु मेघना पेठे यांनी आपण माणूस आहोत याचे भान ठेवून कथा लिहिल्या आहेत.
14. समाज वास्तवाचा वेध घेत असताना मेघना पेठेंच्या कथांमधून त्यांनी महानगरीय जाणिवेचा सूक्ष्म निरीक्षण केल्यामुळे त्यांच्या लेखनात वास्तवता आढळते.
15. समाज चौकटीत राहून सुद्धा माणूस दुकटा होत नाही आणि समाज चौकटी मोडून सुद्धा माणूस एकाकीपणा सहन करू शकत नाही या वास्तवाचे भान निघण्यापेक्षा आपल्या कथांमधून मांडतात.
16. मोनिका गजेंद्र गडकरी यांचे महत्त्वाचे 'स्त्रीला झालेली कुचंबणा' हे आशय सूत्र आहे. स्त्रीची कुचंबना ही शारीरिक व मानसिक पातळीवर झालेली दिसून येते. उदाहरण श्रद्धा, नातं, संक्रमण या कथा. श्रद्धा या कथेमध्ये धार्मिकतेच्या नावाखाली यशोदा बळी पडताना दिसते. संक्रमण या कथेमध्ये नायीकेला आईकडून कुचंबांना सहन करावा लागतो.
17. 'कुटुंब जीवनाचे चित्रण' या आशया अतिरिक्त कुटुंब संस्थेचे चित्रण मोनिका गजेंद्र गडकर यांनी केलेले आहे. फ्लेमिंग, वंश , शरीर अशा वेगवेगळया कथांमधून कुटुंब जीवनाचे चित्रण केलेले आहे.
18. मोनिका गजेंद्रगडकर व्यक्तीमधील नातेसंबंध नातेसंबंधामुळेच दुरावले तर त्याचमुळे साधलेले आहे.
19. मोनिका गजेंद्गडकर आधुनिक नातेसंबंधाची चित्रण करत असताना स्त्री-पुरुष नाते स्त्री-पुरुष नाते संबंध अतिशय सखोलपणे हाताळलेला आहे.
20. मोनिका गजेंद्र गडकर आपल्या कथेमधून स्त्री-पुरुष नाते संबंध चित्रीत करत असताना पती-पत्नीचेच संबंध चित्रीत करत नाही तर आई-वडील, बहिण भाऊ यांच्यामध्ये असणारे सुद्धा नातेसंबंध चित्रित करतात.
21. मोनिका गजेंद्रगडकर समाज वास्तवाचा वेध घेत असताना कुटुंबातील ताण-टणाव व त्यांना आलेले समस्या याची चित्रण करतात.
22. पुरुष सत्ता व्यवस्था व स्त्रियांनी केलेले शोषण अशी वास्तव दर्शवणारी विविध रूपे मोनिका गजेंद्र गडकर आपल्या कथांमधून करतात.

23. मेघना पेठे यांच्या कथांमधून आढळणाऱ्या बहुतेक स्त्रिया स्वतंत्र वृत्तीच्या आहे व त्या कोणाच्या बंधनात राहत नाही त्या एकट्या राहतात तर मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथांमध्ये आलेल्या स्त्रिया या कुटुंबात राहणारे आहे. कुटुंबात राहून त्यांना झालेली कुचंबणा मोनिका गजेंद्र गडकरांच्या कथामधून दिसून येते.
24. मेघना पेठे यांच्या कथेतील स्त्रिया आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी दिसून येतात तर मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथातून दिसून येणाऱ्या स्त्रिया कुटुंब व्यवस्थेमुळे कुचंबणा सहन करत असताना दिसतात.
25. मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतून महानगरीय वास्तव चित्रित केलेले आहे.
26. आयुष्यामध्ये कितीही दुख आले तरी त्याला सामोरे जाऊन कोणतीही तक्रार न करता जगणे हे पेठेंच्या कथेचे वैशिष्ट्य आहे.
27. स्त्रीवादी साहित्य लिहिणाऱ्या स्त्रियांचा एक गट जरी नसला तरी १९६० नंतर स्त्रियांच्या कथातून 'स्त्रीवादी जाणिवा' आढळतात.
28. मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांनी स्त्रियांना आलेल्या वेगवेगळया समस्या वर लेखन केलेले आहे.
29. मेघना पेठेंच्या कथांमध्ये ज्या स्त्रिया आलेल्या आहेत त्या परिस्थितीला हतबलता आल्यामुळे विवाहबाह्य संबंध ठेवताना दिसतात.
30. मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथांमध्ये ज्या स्त्रिया आलेले आहेत त्या विवाह अगोदर संबंध ठेवून गर्भवती होतात व मुलाचा वडील कोण आहे हे देखील त्यांना माहित नसतं तरी सुद्धा त्या गर्भपात न करता मुलाला जन्म देऊ इच्छितात.
31. मेघना पेठेंनी स्त्रीला केंद्रस्थानी ठेवून लेखन केलेले आहे तर मोनिका गजेंद्र गडकरांनी कुटुंब व्यवस्थेची चित्रण केलेले आहे.
32. मेघना पेठेंच्या कथांमध्ये स्त्रिया आलेल्या आहे त्या लग्न, संसार, मुले ही चौकट मोडून त्या स्वतंत्रपणे निर्णय घेणाऱ्या आहे.

33. मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथांमध्ये या स्त्रिया आलेल्या आहेत त्या कुटुंब संस्थेला एकत्रित बांधून ठेवणाऱ्या आहेत.
34. अत्यंत गर्दीतही स्त्रीला झालेल्या एकाकीपणाचे उत्कृष्ट चित्रण मेघना पेठेंनी आपल्या कथांमधून केलेले आहे.
35. स्त्रियांच्या वाट्याला कितीही दुःख आली तरी ती सामोरे जाऊन तक्रार न करता जीवन जगणारी अशी पात्रे मेघनापतींच्या कथांमधून दिसून येतात.
36. मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांनी आपल्या कथांमध्ये प्रथम पुरुषी व तृतीय पुरुषी निवेदन पद्धतीचा वापर केलेला आहे.
37. मेघना पेठेंनी 'मी' या शब्दाचा वापर करून निवेदन केले आहे तर काही वेळा एक पात्र निवडून त्याच्याद्वारे निवेदन केलेले आहे.
38. मेघना पेठेंनी आपल्या कथांमध्ये प्रमाण मराठी भाषेचा वापर केलेला आहे. अतिशय गांभीर्याने त्या भाषेचा वापर करताना दिसतात.त्यांनी काव्यात्मक दृष्टीने लेखन केलेले आहे. त्यांच्या निवेदनामध्ये उर्दू, मराठी, हिंदी अशा भाषाही आलेल्या आहे.
39. मोनिका गजेंद्र गडकर यांनी आपल्या कथा सोप्या भाषेत लिहिल्या आहे. त्यांच्या कथा सर्वसामान्य वाचकाला समजणार अशा प्रकारे लिहिल्या गेल्या आहेत.
40. मेघना पेठे व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथांमध्ये महानगरीय वातावरण चित्रित झालेले आहे.
41. महानगरातली गर्दी, वाहनांचे वेगवेगळ्या आवाज, मोठमोठ्या कंपन्या, रेल्वे, चाळी याचे चित्र वेगळया पेठे व मोनिका गजेंद्र गडकर यांच्या कथांमध्ये झालेले आहे.
42. कुटुंबापासून तुटलेल्या व्यक्तींचे चित्रण मोनिका गडकरी यांच्या कथांमधून झालेले दिसते.
43. कथानक, वातावरण, निवेदन शैली, भाषाशैली, व्यक्तिरेखा अशा वेगवेगळ्या घटकांच्या आधारे मेघना पेठे व मोनिका गजेंद्र गडकर यांनी लेखन केलेले आहे.

44. मोनिका गजेंद्र गडकर यांनी आपल्या पहिल्याच कथासंग्रहाला ‘भूप’ हे नाव दिलेले आहे. या शब्दाचा अर्थ  म्हणजे तो एक संगीताचा राग आहे. मोनिका गजेंद्र गडकरांना संगीताची खूप आवड होती त्यामुळे कदाचित त्यांनी त्या कथासंग्रहाला ‘भूप’ हे नाव दिलं आहे.
45. मोनिका गजेंद्र गडकर यांच्या दुसऱ्या कथासंग्रहाचे नाव‘आर्त’ आहे. ‘आर्त’ या शब्दाचा अर्थ आतून आलेल्या करून रसपूर्ण स्वर, उत्कट इच्छा असा आहे.
46. बेलाची पाने तीन दिसली तरी मूळ एकच असतं त्याचप्रमाणे भारतीय माणूस आणि पाश्चात्य माणूस यांचे प्रश्न जरी वेगळे असले तरी त्याकडे बघण्याचा माणूस म्हणून जो दृष्टिकोन आहे तो या तीनही कथांमधून कसा एकाच धाग्यात गुंफला गेलेला आहे म्हणून या कथासंग्रहाला ‘त्रिपर्ण’ असे नाव दिलेले आहे. त्याचे तीनही धागे गुंफटलेले आहे. त्रिपर्णाचा देठ हा एक आहे.
47. शिल्प म्हणजे एक मूर्ती. मोनिका गजेंद्र गडकरांनी शिल्प हे कथासंग्रहाला नाव खूप विचारपूर्वक दिलेले आहे असे वाटते.
48. मेघना पेठेच्या ‘हंस अकेला’ या शीर्षकाचा अर्थ एकटेपणाचा संदर्भ स्पष्ट करताना दिसतो.
49. मेघना पेठेच्या ‘आंधळ्यांच्या गायी’ या शीर्षकाचा अर्थ असा दिसून येतो की माणसाच्या आयुष्यात खूप दुःख असून सुद्धा माणूस जगत राहतो याचे चित्रण या संग्रहातल्या कथांमधून दिसून येते.
50. मेघना पेठेंच्या कथातील भाषा पात्रानुसार बदललेली दिसून येते. सामान्य माणसाला त्यांच्या कथेचा अर्थ कळत नाही त्यामुळे कथा पुन्हा पुन्हा वाचावी लागते.
51. मोनिका गजेंद्रगडकरांनी आपल्या कथेमध्ये एकदम साधी सोपी भाषा वापरलेली आहे व ती सहजपणे सर्वसामान्य वाचकांना समजते.
52. मेघना पेठेंच्या कथेंची शीर्षके वेगळी असली तरी त्यांच्या कथांचा सार स्पष्ट होताना दिसतो.


# परिशिष्टे





मोनिका गजेंद्रगडकर





मेघना पेठे



हंस अकेला
मेघना पेठे
891.4631PET/Han
Goa University Library
185094


आंधळ्याच्या गायी...
मेघना पेठे
891.4631 PET/And
GUL
109596
GUL


मोनिका गजेंद्रगडकर
शिल्प
Goa University Library
142090


आत
मोनिका
गजेंद्रगडकर
891.4631 GAJ/Aar
GUL
128856
GUL


भूप
891.4631 GAJ/Bho
GUL
128927
GUL


891.4631 GAJ/Tri
Goa University Library
182620
त्रिपर्ण
मोनिका गजेंद्रगडकर

# संदर्भसूची.

## आधारग्रंथ


१. पेठे मेघना 'हंस अकेला' प्रकाशक दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन प्रा. लि. १०२५, सदाशिव पेठ पुणे – ४११०३० फोन – (०२०) २४४७३४५९ फॅक्स : २४४३३७१९ E-mail : rajhansprakashan1@gmail.com Website : www.rajhansprakashan.com

२. पेठे मेघना 'आंधळयाच्या गायी' प्रकाशक दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन १०२५, सदाशिव पेठ पुणे- ४११०३०.

३. गजेंद्रगडकर मोनिका 'भूप' प्रकाशक संजय वि० भागवत, मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, गिरगाव, ममुंबई ४०० ००४

४. गजेंद्रगडकर मोनिका 'आर्त' प्रकाशक संजय वि० भागवत मौज प्रकाशन गृह खटाववाडी, गिरगाव मुंबई ४००००४

५. गजेंद्रगडकर मोनिका 'शिल्प' प्रकाशक संजय वि० भागवत मौज प्रकाशन गृह खटाववाडी, गिरगाव मुंबई ४०० ००४

६. गजेंद्रगडकर मोनिका 'त्रिपर्ण' प्रकशक/मुद्रक मौज प्रकाशन गृह युनिट नं.५,७,८, पहिला मजला, म्युनिसिपल इंडस्ट्रिअल इस्टेट, वी. पी. रोड, विलेपार्ले (प.), मुंबई ४०००५६ ईमेल: moujprakashan@gmail.com


## संदर्भग्रंथ


१. पाटील आनंद तौलनिक साहित्य नवे सिद्धांत आणि उपयोजन, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९८

२. बापट वसंत तौलनिक साहित्याभ्यास मौज प्रकाशन: २९२ पहिली आवृत्ती : सप्टेंबर, १९८१

३. चंद्रशेखर जहागिरदार, "तौलनिक साहित्यभ्यास तत्त्वे आणि दिशा," (प्रा. म. द. हातकणंगलेकर गौरव ग्रंथ), संपा. चंद्रशेखर जहागिरदार, कोल्हापूर, सौरभ प्रकाशन, १९९२

४. मिरजकर निशिकांत तौलनिक साहित्य अरुण पारगावकर, प्रतिमा प्रकाशन १३६२, सदाशिव पेठ, औदुंबर अपार्टमेंट नवा विष्णुमंदिर चौकाजवळ, पुणे – ४११०३० दूरध्वनी : ०२०-२४४७८९०८, मो. ९८५०९५०७०४

५. अडसूळ प्रा. श्रीकृष्ण आनंदपर्व तौलनिक साहित्य आणि संस्कृती समीक्षा प्रकाशक:आनंद ग्रंथसागर प्रकाशन ८९, गीतानंद, अरूणोदय हौ. सोसायटी, शाहू पार्क, राजेंद्रनगरजवळ, कोल्हापूर-४१६००४ मो. ९४०४१४०९९५

६. प्रभुदेसाई डॉ. वि. वा. आजचे मराठी साहित्य प्रकाशन भा. ल. कुलकर्णी साहित्य प्रसार केंद्र, सीलावडीं, नागपूर १२

७. डॉ.वा.पु. गिंडे ‘शेक्सपिअर आणि मराठी नाटक तौलनिक साहित्याभ्यास प्रकाशक: शब्दालय प्रकाशन रामपूर

८. लांडे सुमती – स्त्री-पुरुष नातेसंबंध प्रकाशक : सुमती लांडे शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स नं. ९०, वॉर्ड ७, श्रीरामपूर – ४१३७०९. फोन : ०२४२२-२१०४२५, मोबा. : ९८२२२१५०९ पृ (८३, ८५)

९. जोशी सुधा २००० कथा: संकल्पना व समीक्षा, मुंबई मौज प्रकाशन

१०. नेमाडे भालचंद्र ‘ साहित्याची भाषा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद दि आ १९९८

११. पेठे मेघना : ‘लिहिणं ही माझी आंतररिक गरज आहे’, ‘दर्शन’ दिवाळी २००५, पृ. ८६. मुलाखतकार – राजू देसले.